
साप्ताहिक

# माणूस

१ डिसेंबर ८४ / २ रुपये



## प्रादेशिक पक्ष हाच पर्याय

# मराठवाडा

प्राध्यापक, लेखक, कार्यकर्ते, राजकारणी यांच्या परखड मुलाखती

## धुमसती राजधानी

साप्ताहिक

# माणूस

वर्ष : चोविसावे

अंक : सत्ताविसावा

१ डिसेंबर १९८४

किंमत : दोन रुपये

संपादक

श्री. ग. माजगावकर

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

मेधा राजहंस

वार्षिक वर्गणी

साठ रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

: पत्ता :

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ४११ ०३०

दूरध्वनी : ४४३४५९

मुखपृष्ठ

सुरेश नावडकर

## टोपी गंमतीची

जांभळया रंगाची
सोन्या झाकांची
विविध अंगांची
मोर–पिसांची
टोपी देवाची,
वासुदेवाची
मोठ्या गंमतीची !
न्हाई मागायची
न्हाई द्यायाची ।। १ ।।

१ ला :
शुभ्र वर्णाची
धवल क्रांतीची
आस शुचितेची
कास सत्याची
विश्वशांतीची
गांधी बाप्पाची
टोपी ही माझी
हाय का घेयाची;
हाय का द्यायाची
टोपी मज तुमची ?

वासुदेव :
तुमच्या टोपीची
कथा न्यारी जी,
किती पिडितांच्या
भग्न भावाची;
पुंड पुढाऱ्यांच्या
दंडेलशाहीची
सत्ता लालसेची,
साठेबाजांच्या
काळया पैशाची
भट्टीवाल्यांच्या
हीन मस्तीची
मायबहिणींच्या
लाज लुटण्याची
टोपी ही तुमची
न्हाई घ्यायाची,
न्हाई घ्यायाची,
न्हाई द्यायाची
टोपी ही माझी ।। २ ।।

२ रा :
केशरी रंगाची
असीम त्यागाची
खऱ्या अस्मितेची
भारतमातेच्या
वीर पुत्रांची
खूण ही साची
टोपी ही माझी
न्हाई का लेवायची ?

वासुदेव :
रजपूत रमणींच्या
जित्या जोहाराची
प्रतापसिंहाच्या
हळदीघाटाची
शिवाजीरायाच्या
जीवनगाथेची,
जीवन मरणाच्या
अर्थलाभाची
विश्वधर्माची
मानवजातीच्या
बंधुभावाची
टोपी खुणेची
जरी ही साची,
न्हाई पेलायची
न्हाई घ्यायाची
टोपी देवाची ।। ३ ।।

३ रा :
लाल रंगाची
लाल क्रांतीची
प्राची–सूर्याची
नव्या नांदीची
खूण ही साची
टोपी ही माझी
हाय का घेयाची;
हाय का द्यायाची
टोपी मग तुमची ?

वासुदेव :
लाख मजुरांच्या
विफल आशेची
स्टालीन–माओच्या,
कम्युनिस्टांच्या
क्रूर हत्येची
स्वातंत्र्यदेवीच्या
गळचेपीची
टोपी रक्ताची
न्हाई घ्यायाची,
न्हाई घ्यायाची ।। ४ ।।

मोरपिसांची
टोपी गंमतीची
वासुदेवाची
गाणी गायाची
मुक्त छंदात,
मुक्त बंधात
खुशाल गायाची
कथा–कवनात
उषा रंगायची
टोपी ही माझी
लई गमतीची
न्हाई द्यायाची
न्हाई द्यायाची ।। ५ ।।

–अरविंद किणीकर
सोलापूर

# निवडणुकांच्या तोंडावर : मुक्काम औरंगाबाद

**सत्ताधाऱ्यांची आपसातली लाथाळी सुरूच आहेत आणि विरोधकांची गंमतच आहे. जनता, भाजप, काँ. ( एस. ) तिघांनाही आपलं काम फार मोठं आहे असं वाटतं. भाजपला आपण ग्रामीण भागात पसरल्याचं जाणवतं, मात्र काँग्रेस ( एस ) समोर ते नांगी टाकून आहेत !**

**मुलाखती–संकलन : संजय संगवई**

शहर–ए–औरंगाबाद... अनेक तऱ्हेच्या वस्तींचं मिश्रण, अनेक पक्ष, गट, संघटना, अनेक मारामाऱ्या... आणि आता तर निवडणुका येऊन ठेपल्या. विरोधी पक्षांचं काही जमत नाही अन् सत्ताधाऱ्यांची आपसातील लाथाळी सुरू असा प्रकार.

एकोणीस नोव्हेंबरच्या संध्याकाळी तर काँग्रेस (आय्) व (एस्) वाले कोणीच शहरात नाहीत. सगळे दिल्ली किंवा मुंबईला ! औरंगाबादचे आताचे खासदार काझी सलीम हे खरं तर निवडणूक लढविणार नाहीत; पण त्यांच्या घरनं कळलं की, साब दिल्ली गए।

मराठवाड्यातल्या कोणत्याही जागेपेक्षा औरंगाबादसाठी जास्त साठमाऱ्या. मात्र या वेळी गंमतच आहे– राज्याचे गृह-निर्माण राज्यमंत्री अब्दुल अझीम यांना तिकिट देऊन दिल्लीला परस्पर कटवण्याचा बूट निघाला. अझीमसाहेब ती माळ पाहून घाबरतात. राज्यात खाऊन–पिऊन सुखी आहेत. वर गेल्यावर काय लाभ होणार? जिल्ह्यातले हेवीवेट माणिकदादा पालोदकर हे वसंतदादांचे पक्षकार; पण माणिकदादाही वरती जायला नाखुष. तिकडे बाळासाहेब पवार यांनाही खासदारकी-तले वैय्यर्थ समजत आहे. ते काही प्रयत्न करीत नाहीत. त्यामुळे शहरातल्या काँग्रेस (आय्) गटांना मान्य नसलेले रफिकभाई झकेरिया यांचं छान साधलंय. उगीच कुठे तरी कैरोनि राजदूत म्हणून जाण्याऐवजी केंद्रीय मंत्रिमंडळात जायची संधी काय वाईट, म्हणून त्यांनी अगदी टॉप लेव्हल-पासून औरंगाबादसाठी प्रयत्न केले. हा मजकूर हाती पडेपर्यंत त्यांची उमेदवारीही जाहीर झाली असेल !

विरोधकाची तर गंमतच आहे. जनता, भाजप, काँ. (एस्) तिघांनाही आपले फार मोठे काम आहे असे वाटते. विशेषत: अनेक वेळा आपटलेल्या जनतापक्षाला फारच वाटते ! भाजप-लाही आपण ग्रामीण भागात पसरल्याचे जाणवते. मात्र काँग्रेस (एस्) समोर ते नांगी टाकून आहेत.

असा सर्वत्र शंका–अफवा–विश्वसनीय बातमी–फोन–विचारविनिमय–दिल्लीदौरा यांचा धुरळा उडाला आहे. आपल्या घरचंच कार्य असल्यासारखं प्रत्येकजण निवडणूक–उमेदवारीशिवाय दुसरं काहीच बोलत नाही.

अशा वेळी थोडीफार अंधारात, थंड डोक्यानं विचार करणारी चार–दोन मंडळी गाठली. प्रकाश देशमुख व सदाशिव खंडाळकर हे शहरातले पत्रकार होतेच. प्रत्येक माणसानं आपल्यापरीने निवडणुकांचा अर्थ लावलेला आहे. प्रत्येकाला ते निराळ्या दृष्टीने महत्त्वाचं वाटत आहे. बोचरा उपहास, खिजविणारा सिनिसिझम ही मराठवाड्याची वैशिष्ट्ये या माणसातही होतीच. एका दिवसात जेवढी मंडळी भेटली तेवढ्यांशी हा एक संवाद...

## कम्युनिस्ट–भाजप हेच वैचारिक पक्ष –गोविंदभाई श्रॉफ

मराठवाडा–औरंगाबाद म्हटलं की, गोविंदभाई श्रॉफ हे नाव हटकून आठवणार. हैदराबाद मुक्तिसंग्राम, मराठवाडा विकास आंदोलन, रेल्वे–रुंदीकरण आंदोलन व आताचा दांडेकर समितीचा अहवाल या सर्वांशी गोविंदभाई निगडित आहेत. आज ते कोणत्याही पक्षात नाहीत. सर्वच पक्षांविषयी ते तेवढ्याच अलिप्ततेनं बोलतात. मात्र त्यांचं विवेचन हे थोडं आदर्शवादाकडे झुकत राहतं. प्रत्यक्ष व्याव-हारिक बोलण्यापेक्षा तात्त्विक विवेचनाकडे त्यांचा कल आहे.

निवडणुकांसंबंधी बोलताना, 'इंदिरा फॅक्टर' हा अपरिहार्य आहे. त्याबद्दल ते म्हणाले की, ही बुद्धीने बघायची गोष्ट नाही. आपल्या पूर्वीच्या काही धारणांचा, जुन्या संदर्भांचा प्रश्न आहे. अशा घटकांचा संदर्भ विचारांशी नसतो. मग त्याला आपण Hero–worship, अव-

तारपरपरा किंवा अजून काही म्हणा. विरोधी पक्षांबाबत ते पूर्णच उदासीन व निराश होते.

कम्युनिस्ट, भाजप (संघ) सोडता इथल्या कोणत्याच पक्षाला वैचारिक पाया आणि कार्यकर्त्यांचा संच नाही. ते नसले तर पक्ष सत्तेवर आले तरी परिवर्तन करू शकणार नाहीत. या विरोधी पक्षांना सत्ताधारी पक्षाला शिव्या देण्याशिवाय स्वतःचं असं काही नाही. असे पक्ष सत्तेवर आले तरी काय होणार? असा निष्कर्ष काढून भाईजी पुढे म्हणाले,

आपण लोकशाहीच अत्यंत चुकीच्या पद्धतीने राबवतो आहोत. या प्रक्रियेतून एक राष्ट्र निर्माण होण्याऐवजी विघटनवादी शक्ती व मूल्येच अधिक बळकट होत आहेत. निवडणुकांतील संघर्षसुद्धा याच शक्तींना बळकटी देत आहेत.

खरं तर स्वातंत्र्यचळवळीच्या काळात जी मूल्ये पुढे आली, त्यांचा आपल्या लोकशाहीने स्वीकार करायला पाहिजे होता. एक राष्ट्राच्या कल्पनेला धरून राजकीय बांधणी झालीच नाही. मुळात काही एक निश्चित योजना आखून राजकीय प्रक्रिया सुरू केली गेली नाही. त्याउलट आपोआप जे काही तयार झाले त्यातूनच आजची स्थिती आली आहे. योजनाबद्ध रीतीने भावी विश्वाची मूल्ये तयारच केली गेली नाहीत.

स्वातंत्र्यलढ्यापूर्वीची जाती, धर्म, प्रांत यांचीच आजचे पक्ष जोपासना करत आहेत. सर्वच राष्ट्रीयनेते यासाठी जबाबदार आहेत. उमेदवाराच्या निवडीपासून ते प्रचारापर्यंत सर्वत्र याच पुराणमूल्यांचा विचार होत आहे. या नेतृत्वाने हे सर्व बदलण्याची प्रक्रिया कुठे तरी सुरू केली पाहिजे आणि आज असा वैचारिक पाया असलेले पक्ष भाजप आणि कम्युनिस्टांखेरीज नाहीत.'

या निवडणुकीत शेतकरी-संघटनेसारख्या एक कार्यक्रम घेऊन चालणाऱ्या गटाबद्दल गोविंदभाई अनुकूल बोलले. त्यांचं एक निश्चित ध्येय आहे आणि लोकांनाही ते पटत आहे असे ते म्हणाले.

भाईजी मराठवाडा विकास आंदोलनाचे एक मुख्य सूत्रधार आहेत. कृतिसमितीचे ते प्रमुख आहेत. या वेळी शेतकरी संघटनेने आपल्या मागण्यांसाठी गावबंदीसारख्या कार्यक्रमातून जसा पुढाऱ्यांवर दबाव आणण्याचे ठरविले, तसं मराठवाड्याच्या मागण्यांबाबत काही करणार का, त्यावर त्यांनी नकारार्थी उत्तर दिलं. मराठवाड्याचा विकास वैधानिक विकास मंडळ, रेल्वेरुंदीकरण यांचा issue करायचा विचार नाही. ही एक संधी आहे. मात्र तो आमचा मार्ग नाही, तशी इच्छा नाही आणि शक्तीही नाही. निवडणुका आल्याने आता सर्वच जण त्यावर बोलतील, आश्वासने देतील; पण त्याचे प्रत्यक्षात काय होईल ते सांगता येत नाही. आम्ही आमच्या वेगळ्या मार्गाने प्रयत्न करीत राहू.

---

## भाजपची भूमिका हटवादी नाही —हरिभाऊ बागडे

'इतर पक्षांमध्ये आपलेच लोक पाडण्याची वृत्ती आहे. आमची वृत्ती पाडापाडीची नाही. आम्ही काम केलं असेल, जिथे खात्री असेल त्याच जागा मागितल्या. मात्र याबाबत आम्ही हटवादी नाही. समझोता होऊन जर जागा दुसऱ्या विरोधी पक्षाला गेली तर त्याच्याविरुद्ध उमेदवार उभं करणं दूरच. आम्ही त्याच्या विजयासाठी झटू.' भारतीय जनता पक्षाचे औरंगाबाद जिल्हा चिटणीस हरिभाऊ बागडे मोठ्या ठामपणे पण खालच्या पट्टीत हे सांगत होते.

मराठवाड्यात भाजपच्या कार्यकर्त्यांमध्ये ग्रामीण भागातल्या कार्यकर्त्यांची संख्या लक्षणीय आहे. सध्याचे आमदार गोपीनाथराव मुंढे, सूर्यभान वहाडणे, माजी खासदार पुंडलीकराव दानवे ही त्यातील प्रमुख नावे.

या निवडणुकीत भाजपने मराठवाड्यातल्या तीन जागांवर हक्क सांगितला आहे : जालना, औरंगाबाद व बीड. मात्र या सर्वच जागा मिळाव्यात असा हट्ट नाही. कोणत्याही दोन जागा मिळाव्यात अशी आमची इच्छा असल्याचे हरिभाऊ सांगत होते. भाजपने आपल्या ताकदीपेक्षा जास्त जागा मागून कधीच अडवणूक केली नाही हे सांगताना ते म्हणाले,

'आरंभी जनतापक्षाने महाराष्ट्रातील ४८ जागांपैकी ४१ जागांसाठी आग्रह धरला आहे. अहो, ठाण्याची जागासुद्धा ते मागत होते. पुण्याची जागा खरं तर आमचीच आहे. भाजपने सर्वप्रथम २२ जागांची मागणी केली. आमचं काम, आम्हाला पडलेली मते यांच्या आधारावर ही मागणी आहे. आताच्या परिस्थितीत एकूण १४ जागांवर उमेदवार उभे करण्याचा आमचा निर्णय झालेला आहे.'

प्रश्न : भाजप इतर विरोधी पक्षांना मदत न करता तोंडघशी पाडतो असा आरोप त्यांच्याकडून-विशेषतः जनता पक्षाकडून-केला जातो.

यावर हरिभाऊ शांतच असतात. मात्र शेजारी बसलेले शहर भाजपचे मुख्य शालिग्राम बसैये (बंधु) एकदम म्हणतात, 'पार खोटं आहे हे. याची किती उदाहरणे देऊ?' पहिली बाब म्हणजे, या विरोधकांत मुळातच ताकद नाही. आमच्या पाठिंब्यावरच ते मतं मिळवतात. १९७८ च्या विधानसभा-निवडणुकीत औरंगाबादेहून काशिनाथ नावंदर उभे राहिले. त्या वेळी त्यांना २७ हजार मतं पडली. नंतरच्या (१९८०) विधानसभा-निवडणुकीत भाजप, जनता वेगळे झाले. त्या वेळी मी भाजपतर्फे उभा होतो. मला १७ हजार मतं मिळाली, तर जनताला फक्त ८०० मतं मिळाली. मग मागच्या वेळची २७ हजार मतं कुणाची होती? एकदा निर्णय झाला की, कुठलाही पक्षपात न ठेवता आम्ही झटतो. आमच्याविरुद्ध बोलणाऱ्या समाजवादी उमेदवाराच्या प्रचाराची मीस्वतः सर्व जबाबदारी पाहत होतो.

यावर हरिभाऊ म्हणाले, 'त्याउलट या लोकांचं आहे.' पैठणचं उदाहरण देऊन त्यांनी जनतावाल्यांनी भाजपविरुद्ध उमेदवार कसा कायम ठेवला ते सांगितलं.

मराठवाड्यातील स्थितीबद्दल बोलताना त्यांनी आपला संघर्ष कांग्रेस (एस्) शी नाही, जनताशी आहे असं सांगितलं. कांग्रेस (एस) चं तिथं काम आहे ते त्यांनी मान्यच केले. मात्र मागितलेल्या तिन्ही जागांवर जिंकायची खात्री असल्याचे ते म्हणाले.

ग्रामीण भागातील भाजपच्या कामाबद्दल बोलताना हरिभाऊ बागडेंनी हा पक्ष ब्राह्मणांचा किंवा शेटजी-भटजी यांचा नसल्याचे

स्पष्टच केले. ग्रामीण भागात सर्वच थरांतून आपणास पाठिंबा मिळत आहे. सध्याचा सुशिक्षित मतदार आता अधिक विचारी आहे असे सांगून ते म्हणतात, 'अशा मतदारांची आम्ही आता नोंदणी सुरू केली आहे. हा बहुसंख्य मतदार कॉंग्रेस (आय्) विरोधी आहे. भाऊ थोरात, दानवे, मुंढे यांच्यासारखे आमचे कार्यकर्ते आहेत. आमच्या ताब्यात ज्या सोसायट्या आहेत त्यातून लोकांना प्रत्यक्ष फायदा मिळवून देतो– सचोटीचा कारभार करतो. भाजपने गेल्या वर्षी दुष्काळाच्या वातावरणात पाणीपरिषद घेतली. नुकतीच मुंबईला सरपंचांचा राज्यव्यापी मेळावा घेतला.

'एक सांगतो, भाजपचा ग्रामीण भागातला कार्यकर्ता गरीब आहे. प्रकाशझोतापासून दूर आहे. आमचा सरपंच देखील फाटक्या कपड्यांनिशी मजुरीला जातो. आम्ही ग्रामीण भागात अशा लोकांमधून येत आहोत.'

शेतकरी संघटनेबद्दल विचारता ते म्हणाले, त्यात अनेक पक्षांचे लोक आहेत. खरं तर शेतकरी संघटनेची जी भूमिका आता आहे ती आमची आधीपासूनच मागणी आहे.

एवढी सगळी तयारी असूनही या निवडणुकीत 'इंदिरा गांधींची हत्या' या एकाच विषयामुळे प्रचंड फरक पडेल. त्या वेळी विरोधकांची भूमिका काय राहील यासंबंधी बागडे म्हणाले, 'इंदिराजींच्या मृत्यूमुळे ग्रामीण भागात सहानुभूती आहे. मात्र त्याचा फायदा कसा घ्यायचा ते कॉं. (आय्) पक्षाच्या प्रचारतंत्रावर अवलंबून राहील. ते जर जीपमध्ये फोटो ठेवून रडारड करणार असतील तर आम्हालासुद्धा आमची बाजू मांडावी लागेल. हे सर्व कुणामुळे घडलं? पंजाब–भिंडरांवाले त्याचा परिपाक–हे सर्व लोकांना समजावून दिलं पाहिजे.

मुख्य म्हणजे या सर्व काळातील ग्रामीण भागातील, शेतीचे झालेले नुकसान हा आमचा मुद्दा राहील. लोकांचा या गोष्टीशी जास्त जवळचा संबंध आहे. इंदिराजींच्या मृत्यूचे ते भांडवल करणार असतील तर आमच्यापाशी उत्तर आहेच.

## दलितांची कोणतीच ठाम भूमिका नाही –डॉ. गंगाधर पानतावणे

'इंदिरा गांधींचा मृत्यू ज्या तऱ्हेने झाला त्यामुळे निवडणुकीवर त्याचा परिणाम होणारच. त्यांचा मृत्यू नेहमीप्रमाणे झाला असता तर फारसं काही घडलं नसतं. हत्येनंतर लगेच निवडणुका जाहीर केल्या. कोणत्याही पक्षाने असंच केलं असतं.' मराठवाडा विद्यापीठाच्या मराठी विभागातील प्रसिद्ध व ज्येष्ठ दलितसाहित्यिक डॉ. गंगाधर पानतावणे म्हणाले.

एक गोष्ट निश्चित आहे. आपल्या बुद्धिजीवींचं बाजूला ठेवा; पण इथल्या सामान्य लोकांना इंदिरा गांधी आपल्या वाटतात. बाईंच्या हत्येचं वृत्त ऐकताच, आमची भाजीवालीबाई मारेकऱ्यांना आणि आम्हालाही शिव्या देऊ लागली. बाईंमुळे आम्ही ही जिंदगी जगतो असं ती म्हणाली आणि हाच वर्ग फार मोठा आहे.

सामान्य लोकांना जाहीरनामे, कार्यक्रम, ध्येय यांच्याशी काही कर्तव्य नाही. त्यांना प्रत्यक्ष फळं दिसली पाहिजेत. ते आतापर्यंत इंदिराजी देत होत्या. विरोधी पक्षांनी तसं काहीच केलं नाही.

आपल्याकडे विभूतिपूजेची मानसिकता आहे म्हणून हा प्रकार आहे का?

पानतावणे : एक स्पष्ट व्हावं, सत्तेत असणाऱ्यांची आणि सत्तेत नसणारांची विभूतिपूजा यात मोठं अंतर आहे. म. गांधी, आंबेडकर, जयप्रकाश नारायण यांसारख्या नेत्यांचीसुद्धा विभूतिपूजा झाली. मात्र त्यांच्याकडे एक मिशन होतं. त्यांनी आपल्या तत्त्वज्ञानाने, कार्याने त्या त्या वेळी लोकांना संघटित केलं. इंदिरा गांधींसारख्या सत्तेवरील नेत्यांनी सत्ता असल्याने लोकांना दृश्य लाभ दिले म्हणून ही विभूतिपूजा !

राजीव गांधींबद्दल पानतावणे खूपच चांगलं बोलले. 'इंदिराबाईंनंतर सत्ता संभाळायची इतरांची आकांक्षा असेलच. मात्र त्यानंतर परिस्थितीच अशी होती की, पक्षाच्या दृष्टीने राजीव गांधीच पंतप्रधानपदासाठी उपयुक्त होता. राजीवमध्ये हा सर्वांना घेऊन चालण्याचा व समंजसपणाचा गुण आहे. त्यामुळे त्याचे नेतृत्व महत्त्वाचे ठरेल. त्यामुळे सध्याच्या परिस्थितीत अनेक बदल होतील.

प्रश्न : विरोधी पक्षांना एकत्र का येता येऊ नये? लोकांच्या, विशेषतः दलितांच्या त्यांच्याबाबत काय भूमिका आहेत?

पानतावणे : विरोधकांत एकसूत्रता नाही आणि मुख्य म्हणजे त्यांनी लोकांना काही दिलंच नाही. बुद्धिजीवी, वैचारिक पातळीवर विचारप्रणालींचा विरोध ठीक आहे. मात्र सामान्यांना प्रत्यक्ष कार्य पाहिजे आहे.

वस्तुतः रिपब्लिकन, पँथर, कम्युनिस्ट पक्ष असे शोषितांच्या बाजूने लढणारे अनेक गट–पक्ष आहेत. मात्र त्यांच्यात लोकांना एक करायची व त्यांना सामूहिक लाभ मिळवून द्यायची पात्रता नाही. दलित समाजातील पक्ष–गटांनी आपसातच लाथाळी करून व्यक्तीच्या स्वार्थासाठी आपापल्या नावांचे पक्ष काढले. प्रत्येकाने सत्ताधारी गटाशी जवळीक केली.

**गोविंदभाई श्रॉफ, हरिभाऊ बागडे, गंगाधर पानतावणे, कॉ. चौधरी, भालचंद्र नेमाडे, डॉ. शाकीर, कुमुद रांगणेकर यांच्या मुलाखती.**

म्हणून आज निवडणुकांत दलितांना कोणतीच भूमिका नाही. रिपब्लिकन, दलितपँथर, नवे गट कोणालाही काहीही निश्चित भूमिका नाही. जो लाभ मिळवून देईल त्याला ते मत देतील.

प्रश्न : अगदी भाजपकडे ही लाभ देण्याची भूमिका आली तरी ?

पानतावणे : साहजिकच. आज दलितसमाज डॉ. आंबेडकरांच्या प्रेरणेवर एकत्र येऊन संघर्षच करू शकत नाही. एका निष्ठेतून आलेले कोणतेही नेतृत्व सध्या नाही. सगळ्यांचीच ही स्थिती आहे. गीताबाई गायकवाड यांचे विधानच बघा.

प्रश्न : नुकतंच बाबासाहेबांचं नाव घेऊन प्रकाश आंबेडकर पुढे येत आहेत, निवडणुका लढविणार असं म्हणतात.

पानतावणे : त्यांचीसुद्धा हीच स्थिती आहे. आता हेच बघा. आंबेडकरांच्या घराण्यातील प्रकाश आंबेडकर व इंदिरा गांधींच्या घरातील राजीव गांधी. मात्र आज दलित समाज राजीव गांधींना मानतो. प्रकाश आंबेडकरमागे कोण आहे ? इंदिराबाईंनी अनेक कार्यक्रमांतून आपल्या कल्याणासाठी काही केलं असं दलित समाजाला वाटतं.

## समझोता होऊनही विरोधक पडतील
## – कॉ. चंद्रगुप्त चौधरी

आगामी निवडणुका निर्णायक नाहीत. त्यात आपल्या नेहमीच्या समस्यांचे उत्तर मिळणार नाही हे निश्चित. या वेळी विरोधक बहुतेक ठिकाणी एकास–एक उमेदवार उभे करण्यात यशस्वी होतील. मात्र ते पडणारच. कॉंग्रेस परत जिवंत होईल आणि ज्या विरोधकांना कार्यक्रम आहे त्यांचीच छाप पडेल.' असं ज्येष्ठ कम्युनिस्ट (CPI) नेते चंद्रगुप्त चौधरींना वाटतं. औरंगाबादच्या सार्वजनिक जीवनात चंद्रगुप्तजींचं वेगळं स्थान आहे. या निवडणुकीवर इंदिरा गांधींच्या मृत्यूची गहरी छाप पडणार असं सांगताना त्यांनी एक महत्त्वाचा मुद्दा मांडला.

'राष्ट्रीयत्व आणि सामाजिक समतेसाठी प्रयत्न या दोन आधारांवर निवडणूक जिंकण्याची धमक असलेले पक्षच पर्याय म्हणून उभे राहू शकतील. असा मेळ सध्या कोणत्याच पक्षात नाही. भाजपला अशी राष्ट्रीयतेची प्रतिमा आहे; पण तो पक्ष शोषितांचा नाही. सामाजिक भान नाही. डाव्यांना हा सामाजिक आशय आहे. underdog साठी लढणारे अशी प्रतिमा आहे. मात्र खरे–खोटे जे काय असेल, त्यांच्या राष्ट्रीयतेविषयी खात्री नाही.'

आणि या निवडणुकीतून सत्ता बदलेल असं नाही. एकास–एक उमेदवार उभे करण्याच्या आधारावर युती उभी करण्याचा विरोधकांचा प्रयत्न व्यर्थ आहे. निवडणुकीत लोक याला महत्त्व देत नाहीत धोरणांवर पर्याय असेल तरच त्याला अर्थ आहे. देशातील प्रमुख पक्ष–प्रवाह कोणते हे कळण्यासाठीच या निवडणुकीचा उपयोग आहे !'

इंदिरा गांधींच्या मृत्यूबद्दल बोलताना कॉ. चौधरींनी त्याचं वेगळं राजकीय विश्लेषण केलं 'ज्या पद्धतीनं, ज्या कारणांसाठी Cause साठी त्यांचा बळी गेला त्याचा लोकांवर प्रभाव आहे. इंदिराजी गेल्या म्हणून केवळ भावनिक सहानुभूती असेल असं म्हणणं म्हणजे मतदारांचं अवमूल्यन करण्यासारखं आहे. पंजाब व इतर प्रश्नात राष्ट्रीयऐक्य ठेवण्याचा प्रयत्न करताना त्यांना मृत्यू आला. She paid price for her defiance imperialist powers भारताला स्वावलंबी, स्वतंत्र व स्वाभिमानी बनवणाऱ्या धोरणांमुळे त्यांना मृत्यू आला. हा प्रश्न व्यक्तीचा नाही. लोकांच्या मनात त्यांच्या मृत्यूबद्दल हा संदर्भ आहे. त्यामुळे इंदिरा गांधींना सध्या विरोध करणं म्हणजे फुटीरवाद सांगणं असं होऊन बसेल. त्यांच्या प्रतिकूल गोष्टी सध्या मागे पडतील. लोकांना या वेळी फुटीर–तेढ निर्माण करणारे भाजपसारखे पक्ष नको– ते पकडच घेऊ शकणार नाहीत.'

अगदी सी. पी. आय्.च्या दृष्टीनुसार थोडेफार डांगेवादाकडे झुकणारे हे विवेचन होते. मी म्हणालो, 'या वेळी विरोधी पक्षांनी काय भूमिका घ्यावी ? कारण त्यांना निवडणूक तर लढवायची आहे.'

चौधरी : इंदिराजींचा मृत्यू हा आंतरराष्ट्रीय कट होता. याला नाकारणारे विरोधक लोकांना पटणारच नाहीत. त्यांचे बलिदान राष्ट्रैक्याच्या प्रश्नावर झाले या बाबीवर निवडणुका लढवायच्याच नाहीत. आमचा मतभेद आहे हे राष्ट्र एक कसे ठेवावे याबाबत. फुटीरवादाचा विरोध करायचा तर सामान्यांचे अधिकात अधिक हित व्हायला पाहिजे, तिथे आर्थिक–सामाजिक धोरण चुकले हा विरोधकांचा मुद्दा असावा. आज मतदार फक्त एवढाच विचार करणार आहे पाच वर्षांचा विचार तो करणार नाही.

प्रश्न : हे आपल्या मतदाराच्या कमी प्रतीच्या राजकीय जागरूकतेचे ( weak political culture ) आणि अपरिपक्वतेचे लक्षण नाही का ?

चौधरी : मतदार इंदिरा गांधी या मुद्द्यापेक्षा राष्ट्रीय ऐक्य डोळ्यांसमोर ठेवून या वेळी मतदान करेल. यावरून तो अपरिपक्व म्हणता येईल ?

### भाजपचा दावा खोटा

विरोधकांच्या युतीबद्दल चंद्रगुप्त चौधरी निराश आहेतच. त्यातही त्यातील पक्षांच्या आपापल्या बलाबद्दल साशंक आहेत.

भाजपच्या शक्तीबद्दल त्यांनी जबरदस्त शंका घेतली, '**BJP claims to be second in run. But it is not even fourth. Take it from me.** अहो, दक्षिणेत भाजप कुठे आहे ? तिथे आंध्रात रामाराव यांच्या कृपेने त्याला काही जागा मिळतील. बिहार, ओरिसा, बंगाल, पूर्व–ईशान्येची राज्ये, इथे भाजपची काय शक्ती आहे ? उत्तरप्रदेशाचा पश्चिम भाग, हरयाणा, राजस्थान व मध्यप्रदेश इथेच तो पक्ष प्रभावी आहे. मात्र तिथे वाटेकरीही अनेक आहेत. चरणसिंग, जनता, बहुगुणा असे अनेक.

दुसरी बाब म्हणजे, या वेळी निवडणुका राष्ट्रीय ऐक्याच्या प्रश्नांवरच लढवल्या जाणार आहेत. भाजपवर फुटीरतेचा, राष्ट्रीय ऐक्याला तडा लावण्याचा धब्बा आहे. हिंदूंची मते ही भाजपची शक्ती. मात्र या वेळी इंदिरा गांधींच्या चालींनी जम्मू–पंजाबसह सर्व

हिंदू मते काँग्रेस (आय) लाच जातील. पुण्यातलं देवरसांचं वक्तव्य, नानाजींचं पत्रक ही स्वत:ची मते नाहीत. हिंदूंचे रक्षण करणारा भाजप हा पक्ष नाही असं संघालाही वाटत आहे.'

भारतात इतरत्र विरोधकांचं सांगायचं झाल्यास कर्नाटक-बिहार या प्रांतात जनताचा बेस आहे. कर्पूरी ठाकूरसारख्या लोहियावादी प्रतिमा असणाऱ्या गटाचा तेथील निम्नवर्गावर प्रभाव आहे. उत्तर-प्रदेशात चरणसिंग आहे.

मी : जाट मतांची खात्री ?

चौधरी : मुळीच नाही. भारतातील मतदार जातींवर मतं देतात हा सर्वेक्षणवाल्यांचा, राजकीय पंडितांचा सिद्धांतच खोटा आहे. लोक आपल्या हितसंबंधांच्या प्रतिनिधींना मत देतात. जातींवर ते संघटना बांधतील, सवलती मागतील, मान्यामान्या करतील; पण मतं मात्र देत नाहीत.'

जनता पक्षातील मोरारजी व फर्नांडिस गटावर तर चंद्रगुप्त चौधरी यांनी कडाडून टीकाच केली, 'विकासासाठी परदेशी मदत घेताना देश लाचार करायची त्यांची भूमिका आहे, असे त्यांच्यातील काही श्रीमंत (मोरारजी) व उतावीळ (जॉर्ज) लोकांना वाटते' असे सांगून त्यांनी सीमेन्स प्रकरणाचा दाखला दिला.

काँग्रेसबद्दल तर चौधरीजींनी नेहमीची सी. पी. आय. मांडणी केली.

'इथल्या राजकीय क्षेत्रात औद्योगिक भांडवलदार व ग्रामीण भांडवलदार यांचा संघर्ष चालू आहे. चरणसिंग, शरद पवार, अकाली दल, शरद जोशी हे या ग्रामीण श्रीमंत जमीनदारांचे प्रतिनिधी आहेत.

काँग्रेस (आय) ही भांडवलदारांचे प्रतिनिधित्व करते. मात्र त्यात उद्योगपतींना पहिले स्थान आहे. त्यांना दुखवून ग्रामीण भांडवलदारांचं हित काँग्रेसला साधायचं नाही. काँग्रेसचा ग्रामीण भागातला आधार म्हणजे गरीब, अल्पशिक्षित यांचीच जास्त मते काँग्रेसला मिळतात त्यांच्यासाठी वीस-कलमी कार्यक्रम, संजय निराधार योजना वगैरे कार्यक्रम आहेत यामुळे व्यवस्थेत काहीच बदल होत नाही.

प्रश्न : बँकराष्ट्रीयीकरण वगैरेसारख्या धोरणांनी काँग्रेसनं, इंदिराबाईंनी आपण पुरोगामी, समाजवादी असल्याची प्रतिमा निर्माण केली होती. ते लोकांना apeal होत असेल.

चौधरी : मागास देशांमध्ये राष्ट्रीयीकरण केल्याने त्याचा भांडवलदारांनाच फायदा होतो. आपल्याकडेच बघा. खाजगी भांडवलदारांना परवडत नाही म्हणून पोलाद रेल्वे-कोळसा यांचे राष्ट्रीयीकरण केले. त्यांच्यापासून खाजगी उत्पादकांना फायदा होतो, मात्र हे कारखाने तोटयातच चालतात. आज आजारी गिरण्या सरकार ताब्यात घेते. त्यांची स्थिती चांगली करून त्या परत भांडवलदारांना परत करते. म्हणून काँग्रेसची धोरणे व कार्यक्रम भांडवलशाहीविरोधी नाहीतच.

म्हणून आज राष्ट्रीय ऐक्याला पोषक त्याचप्रमाणे एक निश्चित पर्यायी धोरण असलेला पक्ष पाहिजे. मागे सांगितल्याप्रमाणे तसा पक्षच अस्तित्वात नाही. शोषकांविरुद्ध व्यवहारी कार्यक्रम व विश्वासार्हता असलेल्या पक्षांचाच लोक पर्याय म्हणून विचार करतील.

असं आज काही नाही. त्यामुळे या निवडणुका १९७१ प्रमाणे फक्त तात्पुरत्या घटनांचे प्रतिबिंब असतील.

## सहकार्य देतो म्हणजे बावळटपणा नाही —कुमुद रांगणेकर

जेव्हा जेव्हा विरोधकांचा जागावाटपाचा समझोता झाला, त्या त्या वेळी भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांनी कोणीही उमेदवार असला तरी मनापासून सतत श्रम केले आहेत. अगदी आमचा उमेदवार समजून आणि आजही वेळ आली तर तसं करतील. मात्र आम्ही केवळ वापरले जाण्याइतके बावळट नाही ! तुम्ही आम्हाला वगळाल तर आम्ही गप्प बसून राहू हे शक्यच नाही. आम्ही एकटेसुद्धा लढू शकतो. तेवढी ताकद आहे आमच्यात !' भाजपच्या माजी आमदार कुमुदताई रांगणेकर सहजपणे बोलत होत्या. बाई विधान-परिषदेत होत्या. दुसऱ्या वेळी त्यांना पक्षाचे तिकिट दिले गेले नाही आता पक्षाच्या वर्तुळापासूनही त्या दूरच आहेत. खारांकुंवा भागात स्वत:चे टाइपरायटिंग इन्स्टिटयूट त्या चालवत आहेत.

भाजपचा नेहमीच जादा जागांचा दावा असतो; इतर विरोधी पक्षांना भाजप तोंडघशी पाडतो असे विरोधी पक्षांचे आरोप असतात असं सांगितल्यावर बाईंनी जोरदारच बाजू मांडायला सुरुवात केली.

'आमचं काम जिथं आहे, तिथं आम्ही जागा मागितल्या. आम्ही तीस जागा मागितल्या; पण त्याबाबत काही आग्रहही नाही. स्थानिक कार्यकर्त्यांच्या मागण्यात आणि राज्य-राष्ट्र पातळीवरील नेत्यांच्या दृष्टीत व विचारात फरक असतो हे खरंच आहे; पण आमची मागणी आमच्या कामावर आहे.

भाजप फक्त शहरी मध्यमवर्गातच मर्यादित नसून आता तो ग्रामीण भागात गेला आहे, असं सांगताना कुमुदताईंनी भाजपला काँग्रेसप्रमाणे अनेक भल्या-बुऱ्या मार्गांचा वापर करता येणं अशक्य नसल्याचे स्पष्ट केले; 'पण आम्ही ते केलं नाही, करणारही नाही. कारण आमचा तो उद्देशही नाही.'

नुकतंच नानाजींचं वक्तव्य प्रकाशित झालं. त्यावर त्या म्हणाल्या, 'ज्या दिवशी इंदिराजींची हत्या झाली त्या ३१ ऑक्टोबरला दिवसभर नानाजी आमच्याकडेच होते. इथूनच त्यांनी आपलं वक्तव्य प्रसिद्धीला दिलं होतं. ते आता त्याचा संदर्भ वगळून वापरलं जात आहे.'

इंदिरा गांधींच्या हत्येचा परिणाम शहरावर फारसा होणार नाही. कारण लोकांना निवडणुकांचं वेगळेपण माहीत आहे. 'ग्रामीण भागातील लोकांना फार तर ते बनवू शकतील' असे त्यांनी सांगितले.

# प्रादेशिक पक्षांचे संयुक्त सरकार हा पर्याय
## –डॉ. मोईन शाकीर

इंदिरा गांधी गेल्यानंतर एक प्रचंड व्यक्तिमत्त्व गेलं; पण त्याचबरोबर कॉंग्रेसची अवस्थाही आता बिकट झाली आहे. त्यांच्या मृत्यूच्या आधीच कधी नव्हे तेवढी कॉंग्रेस खिळखिळी झाली होती. आता राजीव गांधी आल्याने, अधिकच कमकुवतपणा येईल. या वेळी कॉंग्रेस-नेतृत्वाने श्रीमती गांधींच्या मार्गाने तरी जावे, नसता पूर्ण नष्ट तरी व्हावे असे दोनच पर्याय आहेत, असं मराठवाडा विभागाच्या राज्यशास्त्रविभागाचे प्रमुख व मार्क्सवादी अभ्यासक डॉ. मोईन शाकीर म्हणतात. एकदा का मार्क्सवादी संज्ञांच्या जंजाळात अडकायचे म्हटले की, काही गोष्टी ओढूनताणून बसवाव्या लागतात किंवा काहींचे अगदी सरधोपट स्पष्टीकरण (simplification) करता येते. तसे बऱ्याचदा त्यांच्या विधानात वाटते.

इंदिरा गांधींनी कॉंग्रेसच्या करून ठेवलेल्या स्थितीला अनुलक्षून बोलताना ते म्हणाले, 'सर्व राजकारण–पक्षच असा इंदिरानुवर्ती झाला होता की, त्या गेल्यानंतर एकही माणूस त्यांची जागा घ्यायला मिळू नये. ही त्या राजकीय पक्षाची दिवाळखोरीच आहे. इंदिरा गांधी Indian bourgoisie ( उच्चमध्यमवर्गीय ) वर्गाचे उत्कृष्ट प्रतिनिधी होत्या. त्यांच्यानंतर भारताच्या या 'बूर्ज्वा' वर्गात दुफळी माजणे अपरिहार्य आहे.'

इंदिराजींमळे भारतीय राजकारणाला जे एक वळण लागले, ते बदलेल काय? उदाहरणार्थ अधिकाधिक केंद्रीकरण, राज्य करण्याची / चालविण्याची पद्धती यात बदल होईल का?

या प्रश्नावर डॉ. शाकीर यांनी जरा संदिग्ध उत्तरे दिली. सध्याच्या केंद्रीकरणाच्या ( Centralization ) प्रवाहावर कोणताही परिणाम होणार नाही. असे सांगून राजीव गांधी स्वतः 'ॲसर्टिव्ह' वर्चस्ववादी नसला तरी त्याच्या बाजूचे लोक त्याला ॲसर्टिव्ह असे बनवतील असे त्यांनी स्पष्ट केले.

मात्र त्याचबरोबर हेसुद्धा सांगितले, 'आता सामर्थ्यवान सरकारऐवजी कमकुवत सरकारचा काळ आहे. शासनाच्या अधिकारकक्षा कमी होतील. राजीव गांधी तेवढे आकांक्षी नाहीत. इंदिरा गांधींना पराभूत करण्यापेक्षा राजीवला पराभूत करणे पक्षातील इतर श्रेष्ठींना सहज शक्य आहे.'

मी म्हटलं, 'ही व्यक्तिगत समीकरणं झाली. यापलीकडे राजकारणाची स्वतःची गती असते. त्यात काही फरक होईल का?

शाकीर: ही autonomy of Politics अस्तित्वात असते हे खरंच आहे. मात्र त्याला काही 'खेळाचे नियमही' असतात. ते व्यक्तिपरत्वे पाळले जातात.

डॉ. शाकीर यांनी आपल्या मार्क्सवादी सिद्धांताप्रमाणे याबाबत कॉंग्रेस व इतर पक्षांचा निकाल लावला. जमीनदारवर्गाकडे उत्तरेतील बहुतेक सर्व मते आहेत. १९७७ मध्ये इंदिरा गांधींच्या लोकवादी ( Populist ) धोरणांमुळे जमीनदार, मध्यम शेतकरी व मधल्या जाती जनताच्या बाजूने गेल्या. १९८० मध्ये हा जमीनदारवर्ग परत इंदिरा गांधींच्या बाजूने गेला. मध्यमवर्ग मात्र लोकदलाबरोबर राहिला. पंजाबात देखील हीच स्थिती आहे. जाट शिखांपैकी २० टक्के मोठे शेतकरी आहेत. ते मतदानावर–निवडणुकांवर प्रभाव पाडू शकतात.

आज या वर्गाला जवळ करणारा पक्ष निवडणुकांत जिंकू शकेल. त्यामुळे श्रीमती गांधींच्या मृत्यूमुळे उत्तरभारतातील मतदानावर काही परिणाम झाला तरी त्याचा जागांवर परिणाम होणार नाही.

विरोधी पक्षाच्या युतीबद्दल काही?

'आज विरोधी पक्षांची अवस्था परस्परांहून वैचारिकदृष्ट्या इतकी भिन्न आहे, की ते एकत्र येऊ शकत नाहीत. एकच असा राष्ट्रीय विरोधी पर्याय उभा राहू शकत नाही. त्यासाठी प्रत्येक राज्यातला प्रादेशिक पक्ष मिळून त्यांनी संयुक्त सरकार बनवावे. नाही तरी प्रत्येक विरोधी पक्षाचे अस्तित्व प्रादेशिकच आहे.' हा मुद्दा विशद करताना ते पुढे म्हणाले–

'भारतात बहुलवाद ( Pluralism ) असावा अशी मागणी तर मागील काळापासून चालू आहे. राज्यांना अधिक स्वायत्तता हवी अशी मागणी फारुख, एन. टी. आर., मार्क्सवादी करीतच आहेत आणि ही गोष्ट करावयासच हवी. मात्र श्रीमती गांधींनी प्रत्येक गोष्टीला व्यक्तिगत रंग दिला. आज देशाची स्थिती अशी आहे की, संयुक्त राष्ट्रीय सरकार आणणं आवश्यक आहे. विरोधक त्याच मार्गाने सत्तेवर आले. आज विरोधकांना प्रादेशिक पक्षाच्या स्वरूपातच अस्तित्व आणि संधी आहे. त्यातूनच राष्ट्रीय स्तरावरचं संयुक्त सरकार येईल.'

प्रश्न : पण कॉंग्रेस तर राष्ट्रीय पक्ष आहे. त्याच्याशी झुंज घ्यायची तर...

मोईन शाकीर : 'कॉंग्रेस कुठे राष्ट्रीय पक्ष आहे? केंद्रातील कॉंग्रेस व राज्यातील कॉंग्रेस यांच्यात काय साम्य आहे? Congress is basically conglomeration of regional parties. त्यात अनेक प्रादेशिक हितसंबंधांचा संघर्ष आहे. १९३७ पासूनच त्यात परस्परविरोधी प्रवृत्तींची adjustment होत आहे. अशा तऱ्हेचा मेळ घालण्याचा कोणत्याही विरोधी पक्षाला अनुभव नाही. अशा वेळी संयुक्त सरकार हा पर्याय ठरतो.

प्रश्न : आपल्या देशात अजून संपृक्त ( saturated ) अवस्थेतील समृद्ध स्थिती नाही. अशा विकसनशील देशातच पक्षांतर्गत मूलभूत वैचारिक मतभेद संभवू शकतात. मात्र अमेरिकेसारख्या 'सॅच्युरेटेड सोसायटी 'मध्ये बहुतेक सर्व राष्ट्रीय प्रश्नांवर व धोरणांवर एकमतच असते. अशा 'कन्सेन्सस पॉलिटी' मध्ये विरोधी पक्षांचा विरोध वरवरचा राजकीय गटबाजीच्या स्वरूपाचाच असतो. भारतात तशी स्थिती येणार का?

डॉ. शाकीर : भारतात तसं होणं शक्य नाही. कारण इथला समाजच एवढा विविधतापूर्ण आहे. त्याही पुढे अमेरिका–ब्रिटनमध्येही अनेक संघर्ष, विरोधाभास अजूनही आहेत. रिपब्लिकन व डेमॉक्रॅटसमध्ये मूलभूत विरोध आहे.

या सर्व विवेचनावरून भारतातल्या पक्षांच्या स्थितीकडे ते वळले.

भाजपच्या क्र. २ च्या दाव्याला त्यांनी आक्षेप घेतला नाही. कम्युनिस्टांच्या सामर्थ्याबद्दल बोलताना ते म्हणाले, ' जिथे त्यांना बऱ्यापैकी आशा आहेत तिथे निवडणुका घेतल्याच नाहीत. आसाम-पंजावमध्ये त्यांना चांगल्या आशा होत्या. याखेरीज केरळ, तामिळनाडू, आंध्र, बंगाल इथे त्यांचा प्रभाव आहेच. बिहारमध्ये जनता व कॉंग्रेस (आय) बरोबरीत आहेत.

महाराष्ट्रातील शेतकरीसंघटनेवर मात्र ते तुटूनच पडले.

' कॉंग्रेसचे अपयश म्हणजे शेतकरीसंघटनेचा उदय. मात्र हा गट एवढा बलवान नाही. कारण शरद जोशींना कोणीच आव्हान देत नाही. त्यांचा हा दबावगट आहे; पण चरणसिंगपेक्षा त्यांच्यात जास्त ताकद नाही.

शरद जोशींनी पुढे आणलेला मुद्दा खराच आहे; पण सरतेशेवटी ते प्रतिक्रियावादी (Reactionary) परिणती असलेले आंदोलन आहे. याबाबतची कारणमीमांसाही त्यांनी दिली.

जाता जाता त्यांनी इंदिरा गांधी व विरोधकांसंबंधी छान शेरे मारले. ' इंदिराबाईंनी राष्ट्रीय किंवा राज्यपातळीवर निवडणुका न ठेवता त्या मतदारसंघाच्या पातळीवर आणल्या.'

विरोधकांबाबत हे लोक असं वागताहेत की, जणू काही यांनीच श्रीमती गांधींची हत्या केली आहे.

## प्रादेशिक अस्मितेमध्ये गैर काय ?
## -भालचंद्र नेमाडे

भालचंद्र नेमाडे हा मराठी वाङ्मयसृष्टीतील एक टप्पा आहे. आतापर्यंत रोमँटिक, अ-वास्तव युगातून त्यांनी मराठी वाङ्मयाला बाहेर काढून objective reality मध्ये नेलं आहे. ' कोसला 'नंतरच्या त्यांच्या कादंबऱ्या वास्तव जीवनातील संघर्ष व वाद वेगळ्या तऱ्हेने चित्रित करणाऱ्या आहेत. राजकीय परिपक्वता असलेला मराठीतील एकमेव ललितलेखक म्हणून त्यांच्याशी निवडणूकसंबंधात बोललो. नेहमीचे विरोधी-पक्षयुती, कुणाला किती जागा, अंदाज यावर (अपेक्षेप्रमाणेच) नेमाडे बोलले नाहीत. त्याऐवजी डाचणाऱ्या सामाजिक व राजकीय प्रश्नांवर फार सलगीने ( passionately ) ते बोलले.

इंदिरा गांधींच्या मृत्यूचा त्यांनी वेगळा अर्थ लावला. ' बाईंनी लोकांची सहानुभूती मिळवली असं नाही, तर त्यांच्या प्रचंड सत्तेमुळे त्यांना मानलं गेलं. ही सत्तासुद्धा लोकांच्या इच्छेतून, अगतिकतेतून आपोआप मिळाली नाही. त्यांनी अनेक डावपेच खेळले. विरोधक कमकुवत होते म्हणून त्यांचे स्थान मोठे झाले.' त्यांच्या मृत्यूमुळे सत्ताधारी पक्षाला बायकांची वगैरे sympathy मिळेल या शब्दात त्यांनी हा विषय निकालात काढला. भालचंद्र नेमाडे यांची राजकारणावरची मतेही त्यांच्या साहित्यसमीक्षेसारखीच वेगळी स्पष्ट व मोकळी आहेत. निवडणुकांवर बोलतानाही त्यांनी नेतृत्व, जातवार संघटन, वृत्तपत्रे यांच्यावर विचार मांडले.

' आपल्याकडे निवडणुका झाल्या तरी लोकांचे खरे प्रश्न समोर येत नाहीत. कारण लोकांना नेतृत्व असं नाहीच. भाजप, सोशालिस्ट वगैरेंसारखे ब्राह्मणपक्ष खरे प्रश्न समोर येऊ देत नाहीत. मधल्या जातींना नेतृत्वच नाही. महाराष्ट्रापुरतं बोलायचं झाल्यास मराठा असा एकसंध समाज आणि त्याचं नेतृत्व नाही. मधल्या जाती तर परप्रांतीयांचंही उगीचच नेतृत्व स्वीकारतात.

ब्राह्मणसमाज आता राजकीय सत्तेबाहेर फेकला गेल्याने, शिक्षण, वाङ्मय या क्षेत्रातील ब्राह्मण आपल्याला पचतील अशी मूल्ये तयार करून त्यात इतर जातींच्या कार्यांना बसवू पाहतो आणि नंतर त्याला अनैतिक, मूल्यरहित म्हणून तुच्छ लेखतो. हे सांगतानाच नेमाडे म्हणाले-

' ब्राह्मणसमाज सत्तेशिवाय जगूच शकत नाही. कोणताही पक्ष असो, त्याने तिथे उडी घेतलीच. आज सत्तापदांपासून दूर गेलेला ब्राह्मणसमाज इंजिनिअरिंग, विज्ञान, उद्योग या क्षेत्रात गेला आहे. मात्र कुठल्याही क्षणी ते सत्तेवर येऊ शकतात.'

हे सांगताना त्यांनी डॉ. बारलिंगे यांचं उदाहरण दिलं. याबाबत निर्णय घेण्याचा ज्यांना अधिकार आहे, त्यांना फारसं कळत नाही, असं ते म्हणाले.

मात्र महाराष्ट्रात यशवंतराव चव्हाणांनी आपल्या जातीबाहेर पाहिले. चांगली माणसे टिपली.

आपल्याकडची नेतृत्वाची परंपरा व पद्धतीच सगळी आयात केलेली आहे, याविषयी नेमाडे मनापासून बोलले. ते म्हणाले, ' ब्रिटिश तसेच अजून इतर देशांपासून काही कारण नसताना आपण अनेक पद्धती व संस्था घेतल्या. ब्रिटिशांना गरज होती म्हणून त्यांनी वरतून निर्णय घेण्याची प्रक्रिया इथे रुजवली. आपल्याला त्याची गरज नाही. लोकशाही तुम्हाला पाहिजे असेल तर अगदी स्थानिक पातळीच्या नेतृत्वाकडून प्रादेशिक व राष्ट्रीय नेतृत्व तयार झाले पाहिजे.'

' प्रादेशिक अस्मिता पूर्ण वाढू देऊनच त्यातून जो काही राष्ट्रीय अस्मिता तयार होईल ती व्हावी. आज भारताच्या अनेक प्रांतांतून द्रमुक, तेलगूदेसम् अशासारखी अस्मिता तयार होत आहे. तिला सर्वप्रथम महत्त्व आहे. ती खरी लोकशाही आहे.

प्रादेशिक अस्मितेमुळे राष्ट्राला धोका निर्माण होतो वगैरे गोष्टींबद्दल कुठे काय सिद्ध झालंय् ? एकदम केंद्रीय हुकुमांमुळे तरी राष्ट्र एक राहिले आहे का ? प्रादेशिकवाद हीच खरी लोकशाही आहे. तुम्हाला लोकशाही पाहिजे असेल तर त्याचे परिणाम काय होतील ते बघा आणि पत्करा.'

प्रादेशिकवाद हा आपल्याकडे कूपमंडूक वृत्तीचा ठरूच शकत नाही असं नेमाडे जोरदारपणे सांगत होते. ' अहो, महाराष्ट्राच्या आकारात युरोपातले पाच-सहा देश बसतात. या प्रत्येकामध्ये वेगवेगळ्या विचारधारा आहेत. युरोकम्युनिझम, स्पॅनिश कम्युनिझम असे प्रकार आहेत. त्यात कोणालाच गैर वाटत नाही.

आपल्याकडच्या वैचारिक पक्षांनीही याचा विचार करायला हवा. प्रत्येक प्रदेशाच्या भिन्नतेनुसार पक्ष-विचार यांची योजना हवी. महाराष्ट्रीय कम्युनिझम असण्यात काय गैर आहे ? खरं तर याचा मार्क्सवाद्यांनी विचार करायला हवा. प्रत्येक भागातली संस्कृती, बंध, आणि लोकाचार वेगळे असतात, त्यानुसार पक्षबांधणी व वैचारिक

बदल असला पाहिजे; पण भारतातल्या मार्क्सवाद्यांना आंतरराष्ट्रीय कम्युनिझमसारख्या रोमँटिक कल्पनेने भारले आहे. सर्व भारतालाच काय, पण जगाला ते एका कल्पनेत बसवायला निघाले.'


या संघर्षातील माझे सर्वोच्च ध्येय ना गुलामी प्रथेला अभय देणे आहे ना तिचे उच्चाटन करणे आहे ते आहे देशाची अखंडता अबाधित ठेवणे. जर एकाही गुलामाला मुक्त न करता मी देशाची अखंडता राखू शकलो तर ते मी करेन. जर काही गुलामांची मुक्तता केल्याने आणि काहींना तसेच ठेवून देश अखंड ठेवता आला, तर ते मी करेन मी गुलामी प्रथेबाबत वा काळ्या वंशाच्या लोकांबाबत जे करतो ते देशाची अखंडता कायम रहावी यासाठीच करतो आणि त्याला विरोध करतो तो यासाठी की त्यामुळे देश अखंड रहायला साहाय्य होणार असते – **लिंकन**

**देशाचे विच्छेदन हेच पाप मानणाऱ्या**
**सर्वात महान राजकीय नेत्याची**
**संपूर्ण ओळख करून देणारा ग्रंथ.**

अब्राहम लिंकन

**फाळणी टाळणारा महापुरुष**



वि.ग.कानिटकर

**फाळणी एकदा झाली**
**पुनः होणार नाही ह्याची शाश्वती वाटावी**
**अशी परिस्थिती नाही.**
**प्रत्येकाने अभ्यासायला हवी अशी**
**लिंकनची राजकीय कहाणी.**

**भरपूर छायाचित्रांसह प्रकाशित होत असलेली**
**पहिली डिलक्स आवृत्ती.**
**मोठा क्राऊन आकार**
**पृष्ठे : सुमारे ४००**

**राजहंस प्रकाशन** १०२५ सदाशिव पेठ. पुणे. ४११ ०३०.


प्रादेशिक वादाच्या संदर्भात बोलताना त्यांनी आंध्र, तमिळनाडू-मधल्या प्रादेशिक पक्षांचा उल्लेख केला. महाराष्ट्रात ही भूमिका कोणता पक्ष घेऊ शकेल यावर त्यांनी शरद पवारांच्या काँग्रेस (एस) या नावाला अनुकूलता दर्शविली.

नेमाडयांच्या सांस्कृतिकवादाच्या आग्रहातून प्रादेशिकतेचे हे समर्थन आले. त्याच सुरात त्यांनी आयात केलेल्या राज्यपाल, राष्ट्रपती, विधानपरिषद–राज्यसभा यांसारख्या निरर्थक संस्थांविषयी आश्चर्य व्यक्त केले. ते म्हणाले, 'आपल्याला काय उपयोग आहे त्यांचा?' आता एक प्रयोग म्हणून हे सर्व रद्द करून आपल्या लोकांत रुजतील अशा पद्धती राबवल्या पाहिजेत आणि उत्क्रांत होत जाणाऱ्या प्रादेशिक पक्षांतून व अस्मितेतून पुढील व्यवस्था ठरेल.

'आजच्या निवडणुकांमधून नवीन आमदार, नवे नेते येत आहेत. गेल्या पिढीपेक्षा हे तरुण नेते फार हुशार, विचारी, संतुलित व कष्टाळ आहेत. त्यांना दृष्टी आहे. असे तरुण नेतृत्व सर्वच पक्षात आहे आणि त्यांच्याकडूनच हल्लीच्या या परकीय संस्था, संकल्पना बदलतील.

इथे दिल्ली–मुंबईच्या अनेक कायदेपंडितांना जुन्या राजकारण्यांचा दाखला देऊन मी म्हणालो, 'पूर्वीची नेतेमंडळी म्हणजे फार उच्च दर्जाची होती. Towering figures होत्या. आताचं नेतृत्व क्षुद्र आहे असे म्हणतात. त्यासाठी लोकप्रतिनिधींमध्ये अधिक क्षमता असावी म्हणून नानी पालखीवाल्यांसारखे लोक लोकप्रतिनिधींसाठी किमान शैक्षणिक पात्रता असावी असे सांगत आहेत!'

नेमाडे म्हणाले, 'त्या वेळचे नेते मोठे होते, खासदार म्हणजे अफलातून होते, संसदेत काही प्रतिष्ठा असे ही गोष्ट मला काही समजतच नाही. मोठी पुस्तकं वाचून इंग्रजांनी शिकवलेल्या भाषेत सहा–सहा तास भाषणं करणं म्हणजे काय मोठेपणा होतो? लोकप्रतिनिधींना किमान शैक्षणिक पात्रता असावी म्हणजे काय? भारताची एकूण शैक्षणिक पात्रता जी असेल तीच आमच्या प्रतिनिधींची असावी. फार उच्च शिक्षित पालखीवालासारखे लोक आंतरराष्ट्रीय राजकारणावर चार तास इंग्रजीत बोलतील; पण आमचा अडाणी खासदार तिथे गेला म्हणजे तो हुशार नसतो असं का मानायचं? अहो, ही अडाणी माणसंच फार चांगली, सुसंस्कृत असतात. लेबानममध्ये काय घडतं यावर चर्चा करण्याऐवजी ही माणसं म्हणतील, आमच्या गावाचा पाण्याचा प्रश्न सोडवा, रस्ते करा, त्यासाठी मेळावा घ्या. त्यांना आपल्या लोकांचे प्रश्न माहीत असतात. Education आणि Culture चा काही संबंध नाही असं माझं आता मतच झालं आहे.'


आजच्या काळाविषयी, माणसांविषयी किंवा सध्याच्या राजकीय घडामोडींविषयी आपण मुळीच निराश नाही हे सांगताना नेमाडे म्हणाले, 'या परकीय संस्था, नोकरशाही प्रथा यांच्याविरुद्धच आज देशातला असंतोष चालू आहे. आपण आधीच आपल्या देशाच्या संस्कृतीनुसार, गरजेनुसार काही बनवलं असतं तर ही वेळ आली नसती. मात्र आता हे बदलायची गरज वाटत आहे. लोकच त्याच्यासाठी पुढे येत आहेत. विशेषतः तरुण मुलं. त्यांच्याबद्दल तर मला खूपच आशा आहे.'

'हे आता बदलेल. गेल्या ३५–४० वर्षांत आपल्यात बराच बदल झाला. आता आपण जिल्ह्याच्या, जातीच्या बाहेर येत चाललो, हे या बदलाचेच लक्षण आहे. □

११, १२ व १३ जानेवारी १९८५ ला होणाऱ्या ६५ व्या अ. भा. मराठी नाट्यसंमेलनाचे अध्यक्ष म्हणून श्री. प्रभाकर पणशीकर यांची निवड झाली आहे. त्या निमित्त...

# वाद(ळ)ग्रस्त लोभस व्यक्तित्व प्रभाकर पणशीकर

वि. भा. देशपांडे



प्रभाकर पणशीकर हे नाव मी निदान वीस-पंचवीस वर्षे ऐकतो आहे. त्यांना रंगभूमीवर पाहतोय. सामान्यपणे लोक त्यांना पणशीकर म्हणूनच ओळखतात; पण रंगभूमीच्या क्षेत्रात किंवा अंतर्गत वर्तुळात ते 'पंत' या नावानंच ओळखले जातात. पंत आणि राव म्हटलं की, आपल्यापुढं एक भारदस्त, वयस्क, पोक्त असं व्यक्तित्व उभं राहतं. त्यामुळं जसा आदर वाढत जातो तसाच दुरावा किंवा अंतर निर्माण होण्याचीही भीती असते; पण या पंतांच्या अथवा प्रभाकरपंतांच्या संदर्भात तसं काही घडत नाही. वयपरत्वे, अनुभवपरत्वे आवश्यक तो पोक्तपणा त्यांच्याकडं जरूर आहे; पण त्यातून येणारं रुक्षपण, जुनाटपण मात्र बिलकुल नाही. त्यांना तुम्ही बोलताना, गप्पा मारताना जेव्हा पाहाल तेव्हा आपलं वय विसरून बोलणारी माणसं जी असतात त्यात त्यांची जमा होते.

खरं तर हे व्यक्तिमत्त्वच इतकं प्रसन्न, दिलखुलास आणि लोभस आहे की, कोणीही प्रथमदर्शनी यांच्या प्रेमात पडावं ! आपण जर त्यांचं बोलणं ऐकत राहिलो ( ऐकत राहण्याचा मोह आपल्याला होतोच आणि ऐकवण्याचा मोह त्यांनाही होत असतो.) तर किती वेळ गेला हे सहजासहजी लक्षात येत नाही. अशा अनेक गप्पांच्या बैठकी मी अनुभवल्या किंवा ऐकल्या आहेत त्यांच्या रसाळ वाणीतून येणारे शब्द केवळ दुसऱ्यावर छाप पाडण्यासाठी, आपलं महत्त्व सिद्ध करण्यासाठीच येतात असं नव्हे तर या माणसाजवळ सांगण्यासारखं इतकं उदंड आहे की, ते ऐकून आपणच स्तिमित होतो. चार–सहा महिन्यांपूर्वी काही कामानिमित्त ते माझ्या घरी आले होते. सकाळी १० च्या सुमाराला आमच्या गप्पा सुरू झाल्या. त्यात दुपारचे दोन कधी वाजले ते ध्यानातच आलं नाही. जेवणाचंही भान हरपवणारे अनुभव ते सांगत होते. त्यामुळंच या माणसाच्या घडण्याचं कुतूहल वाढत राहिलं, राहणार आहे !

व्युत्पन्न पंडिताच्या घराण्यात जन्मलेला हा मुलगा नट होईल, नाटक्यांच्या जगात आपला ठसा उमटवेल असं कोणालाही वाटलं नसेल ! उमेदवारीचा काळ मो. ग. रांगणेकरांच्या नाट्यनिकेतनसंस्थेत घालवला. तिथं शब्दशः पडेल ती कामं केली. नाटकातली आणि एरव्हीचीही ! त्या कामांमध्ये संस्थेच्या व्यवस्थापनाची कामं अधिक; पण कधी अशीही वेळ यायची की, एखाद्या प्रयोगात एखादा नट आलेला नसायचा, रांगणेकर या 'व्यवस्थापकाला' नाटकात उभं राहायला सांगायचे ! यातूनच तिथं 'देवाघरची माणसं, 'भटाला दिली ओसरी' 'भूमिकन्या सीता' ह्या नाटकांतून पणशीकर नावाचा नट अभिनयाचे धडे गिरवायला लागला. या रंगभूमीच्या उमेदवारीच्या काळात ज्यांच्या बरोबरीनं कामं करायला मिळाली किंवा राहायला मिळालं त्यामध्ये रांगणेकर हे प्रमुखपणानं होते, तशीच आणखीही काही मातब्बर मंडळी होती. उदाहरणार्थ ज्योत्स्नाबाई भोळे, पु. ल. देशपांडे, शाहू मोडक, कुसुम कुलकर्णी, परशुराम सामंत, प्रसाद सावकार, अरुण सरनाईक अशी किती तरी नावं सांगता येतील ! एका बाजूनं या सर्व कलाकारांच्या सहवासात राहून त्यांची पडद्यामागची व्यवस्था पाहायची आणि त्याच वेळी प्रसंग पडला तर त्यांच्या बरोबरीनं रंगमंचावर उभं राह्यचं ! या दोन्ही भूमिका ( नट आणि व्यवस्थापक) तितक्याच सहजतेनं करायला अंगी 'नाना कळा' असायलाच हव्यात. यातली प्रत्येक

भूमिका वठवताना उरलेल्या भूमिकेच्या संदर्भात 'मी तो नव्हेच' असंही मनात येऊन गेलं असणार! कदाचित 'तो मी नव्हेच'च्या पुढच्या यशकीर्तीची अंधुकशी पाऊलवाट इथंच आरंभित झाली असेल!

सामान्यतः असं म्हटलं जातं की, आयुष्याच्या प्रवासाला निघताना देवाच्या आळंदीला जायचं असं प्रत्येकाचं मनोगत ठरलेलं असतं; पण सर्वांना ते भाग्य लाभत नाही, बहुतांश मंडळींचा प्रवास अनिच्छेने का होईना चोराच्या आळंदीकडे दीर्घ काल चाललेला असतो; पण पणशीकरांच्या बाबतीत मजेशीर घडलं. ते नाटकाच्या क्षेत्रात व्यवस्थापक म्हणून आले, तेच आपण करावंसं त्यांना तेव्हा वाटलं; पण परिस्थितीनं नट बनवल्यावर त्याही वाटेने जात जात एक मोठा हमरस्ता त्यांनी निर्माण केला. ते उत्तम निर्माते, व्यवस्थापक म्हणून ख्यातकीर्त आहेतच; पण त्याहून किती तरी अधिक दशांगुळं ते नट म्हणून उरलेले आहेत. म्हणजे दोन्ही वाटांवर त्यांनी आपली मुद्रा प्रस्थापित केली. लाक्षणिक अर्थानं सांगायचं तर ते चोराच्या आणि देवाच्या अशा दोन्ही आळंदींच्या प्रवासात आहेत किंवा सान्निध्यात आहेत. आता त्यातली नेमकी आळंदी चोरांची कुठली आणि देवांची कुठली ते पणशीकरांनाच ठाऊक!

## नवीनतेचं आव्हान

नाट्यनिकेतननं केलेलं 'भटाला दिली ओसरी' हे नाटक पाहायला एकदा आचार्य अत्रे आले होते. तेव्हा भाषणाच्या ओघात ते म्हणाले, 'या संस्थेला मी माझं नवं नाटक देईन,' हा धागा रांगणेकरांनी पकडला आणि त्या काळात काझी खून खटला सर्वतोमुखी होता, त्यावर आचार्य अत्र्यांना नाटक लिहिण्याची विनंती केली. खरं तर रांगणेकरांनी त्याआधी काझीवर नाटकाची संहिता लिहिली होती; पण लेखनाची भट्टी जमली नाही. अत्र्यांसारखा जबरदस्त लेखणीचाच नाटककार हवा हे रांगणेकरांनी जाणून त्यांना विनंती केली. त्यांनी आपल्या तव्येतीनं, परिश्रमपूर्वक नाटक लिहून काढलं आणि नाव दिलं 'तो मी नव्हेच!'. नाटकाची संहिता तर तयार झाली; पण त्या वेळी रंगभूमीवर 'गतकालदृश्य' (फ्लॅश बॅक सीन) दाखवण्याचं तंत्र अवगत नव्हतं. अशा प्रकारच्या नाटकाला रंगमंच कसा असावा या संदर्भात चर्चा चालली असताना पणशीकरांना आठवलं की, 'टी हाउस ऑफ द ऑगस्ट' या इंग्रजी नाटकात एका वेगळ्या नेपथ्यतंत्राचा वापर केलेला आहे. रंगमंचाचे चार भाग त्या नाटकासाठी वापरले होते. आपणही अशीच काही युक्ती काढावी असं पणशीकरांनी ठरवलं. राजाराम चव्हाण, शामराव साळोखे आणि त्यांच्या सहकारी तंत्रज्ञांना हाताशी धरून कोल्हापूरला पहिला फिरता रंगमंच तयार केला. याआधी कलकत्ता आदी ठिकाणी फिरता रंगमंच वापरला जात होता; पण तो एकाच नाट्यगृहात पक्का केलेला असे. प्रत्येक प्रयोगाला वेगवेगळ्या गावात किंवा नाट्यगृहात नेण्याची कल्पना पणशीकरांचीच. जिद्द असली की, एखादी उत्तम निर्मिती कशी करवून घेता येते त्याचं ठळक उदाहरण म्हणजे हा फिरता रंगमंच! या फिरत्या रंगमंचावर 'तो मी नव्हेच' चा पहिला प्रयोग ८ ऑक्टोबर १९६२ ला नाट्यनिकेतननं केला. या रंगमंचानं आणि नाटकानं मराठी रंगभूमीत नवीन पर्व आरंभित केलं. अत्रे आणि रांगणेकरांचं या नाटकाच्या संदर्भात काहीबाही बिनसलं. हे नाटक अत्रे थिएटर्सकडं आलं. पुढं अत्रे आणि पणशीकरांचं नेमकं कुठं खटकलं कोण जाणे; पण पणशीकरांनी ती संस्था सोडून नवी संस्था स्थापन करण्याचा घाट घातला. त्यातूनच 'नाट्यसंपदा' या नाट्यसंस्थेची निर्मिती झाली– १९६३ साली! आरंभी या संस्थेचे तीन सूत्रधार होते. एक म्हणजे खुद्द पणशीकर, दुसरे मोहन वाघ आणि तिसरे वासुदेव कोल्हटकर. अंतर्गत मतभेदांमुळं त्यातले दोघेजण दूर गेले. मोहन वाघांनी 'चंद्रलेखा' नामक संस्था काढली. नाट्यसंपदेची सारी सूत्रं पणशीकरांकडं राहिली!

गेली कित्येक वर्षं ही सूत्रधाराची, निर्मात्याची भूमिका पणशीकर चोखपणानं बजावीत आहेत. या संस्थेनं आतापर्यंत तीस नाटकांचे प्रयोग मोठ्या प्रमाणात केले. या सर्व नाटकांचे प्रयोग पाच हजारांच्या घरात आहेत. त्यामध्ये एकट्या 'तो मी नव्हेच!' नाटकाचेच हजारभर प्रयोग आहेत. तसे त्या नाटकाचे एकूण प्रयोग पंधराशेच्यावर झाले. यामध्ये नाट्यसंपदेचा वाटा सिंहाचा आहे. उरलेल्या नाटकांपैकी काहींचा नुसता उल्लेख केला तरी नाट्यसंपदेच्या आणि पर्यायानं पणशीकरांच्या कर्तृत्वाचा आलेख सहजपणानं डोळ्यांपुढं येईल. अशी नाटकं म्हणजे 'अश्रूंची झाली फुले', 'गारंबीचा बापू', 'कट्यार काळजात घुसली', 'इथे ओशाळला मृत्यू', 'मला काही सांगायचंय', 'महाराणी पद्मिनी', 'बेइमान', 'थँक्यू मिस्टर ग्लाड', 'निष्पाप', 'पुत्रकामेष्टी' इत्यादी. याच्या जोडीला अशीही काही नाटकं पणशीकरांनी पेश केली की, त्यांचे प्रयोग खूपच मर्यादित झाले. अशांमध्ये 'मोहिनी', 'अमृत झाले जहराचे', 'म्हैस येता माझ्या घरा', 'वीज म्हणाली धरतीला', 'विकत घेतला न्याय', 'देव जागा आहे', 'अंधार माझा सोबती', 'प्रश्न थोडा नाजूक आहे', 'आनंद', 'तो राजहंस एक', 'तीन लाखांची गोष्ट', 'त्या कातरवेळी', 'तुझी वाट वेगळी' इत्यादी. या नाटकांच्या मालिकेत नवी–जुनी संगीत नाटकंही केली– 'मदनाची मंजिरी', 'सुवर्णतुला', 'संत तुकाराम', 'होनाजी बाळा' 'राजसंन्यास' वगैरे.

अशा या नाटकांनी–काहींनी शतकमहोत्सवी समारंभ पाहिले 'अश्रू', 'कट्यार' 'मला काही', 'तो मी', 'बेइमान', 'ग्लाड' इत्यादींनी किती तरी शतकांचे पल्ले गाठले. यातल्या काही नाटकांनी पणशीकरांना उदंड पैसा दिला, अमाप कीर्ती दिली हे तर खरंच; पण उरलेल्यांपैकी अनेक नाटकांमध्ये मिळवलेला पैसा घालवावा लागला हेही तितकंच खरंय! सावध हिशेबीपणा पणशीकरांकडं नाही. एखादं नवं नाटक त्यांच्याकडं आलं, कोणत्या ना कोणत्या कारणानं त्यांना ते आवडलं तर ते त्याचा प्रयोग करून पाहणार. कदाचित प्रयोगापूर्वी किंवा चार–दोन प्रयोगांनंतर असं लक्षात आलं की, व्यवसायासाठी या नाटकाचा उपयोग नाही तरी ते नाटक करून पाह्यचं ठरवलं म्हणजे ते होणारच. नवं आव्हान पेलणं, त्या निमित्तानं आर्थिक संकटांना आपणहून खुणावणं आणि आपल्या मस्तीत तो प्रयोग पेश करणं हा पणशीकरांचा स्वभाव आहे. केवळ व्यवसायाचीच गणितं बांधून सारा व्यवहार करायचा म्हटला असता किंवा एखाद्या नाटकाच्या अपयशानं नवीन नाटकं करायचीच नाहीत असं ठरवलं असतं, तर मग 'विकत घेतला न्याय' 'अंधार माझा सोबती', 'आनंद' 'पुत्रकामेष्टी,' 'निष्पाप' अशी काही वेगळ्या जातीची (म्हणजे विषयांवरची) नाटकं एकूणच व्यवसायात आली असती की नाही कोण जाणे? व्यवसायातलं नवीनतेचं आव्हान

आणि आवाहन आपण स्वीकारायच नाही तर मग कोणी ? असं पणशीकरांना नेहमीच वाटतं !

## वादग्रस्त–वादळग्रस्त

नाटकाच्या व्यवसायात सामान्यतः असा एक संकेत पूर्वापार चालत आलेला आहे की संस्थेचा मालक, निर्माता जर नट असेल (आणि तो बऱ्याचदा असतो) तर तो कोणतंही नाटक निवडताना स्वतःला मध्यवर्ती, महत्त्वाची भूमिका आहे की नाही याचा अंदाज घेऊनच नाटकाचा स्वीकार करतो. स्वतःपलीकडं जाऊन एखाद्या नाटकाचा विचार करणारे लोक फारच क्वचित असतात. महत्त्वाची भूमिका नसली तर निदान दिग्दर्शन तरी ! पणशीकरांनी त्यांच्या संस्थेच्या नाटकांत महत्त्वाच्या भूमिका जरूर केल्या; पण त्याचबरोबर अशीही काही महत्त्वाची नाटकं त्यांनी पेश केली की, त्यात ते कोठेही रंगमंचावर नव्हते. नेमक्या उदाहरणानं सांगायचं तर संगीत कट्यार काळजात घुसली हे दारव्हेकरांचं नाटक ! यामध्ये डॉ. वसंतराव देशपांडे, भार्गवराम, प्रसाद सावकार, शंकर घाणेकर आणि किती तरी नटमंडळी कामं करून गेली; पण त्यातल्या एकाही भूमिकेचा प्रथम किंवा नंतरही पणशीकरांनी विचार केला नाही. 'कट्यार'ला अमाप यश मिळाले. अशा यशात आपण एखाद्या भूमिकेत संगीत नाही तर निदान गद्य भूमिकेत तरी असावं असा मोह होणं स्वाभाविक होतं; पण तसं घडलं नाही. इथंच एक गोष्ट नोंदवावीशी वाटते ती म्हणजे, पणशीकर गद्य भूमिका करीत असले तरी त्यांना संगीताची जाण किंवा सूर–तालांचं भान विलक्षण आहे !

केवळ नवीन नाटकांचंच आव्हान पणशीकर पेलतात असं नाही तर आपल्या नाटकांमधून अनेक नव्या कलाकारांना संधी देणं हा त्यांचा एक आवडता छंद आहे ! अरुण सरनाईकला पणशीकरांनी 'भटाला दिली ओसरी' मध्ये प्रथम आणला. डॉ. श्रीराम लागू नाट्यव्यवसायात प्रथम आले ते नाट्यसंपदेनं केलेल्या 'इथं ओशाळला मृत्यू' या नाटकात संभाजीच्या भूमिकेत ! अगदी अलीकडचं उदाहरण द्यायचं तर ते 'निष्पाप' नाटकाचं. हे आव्हान विलक्षणच होतं ! दिलीप परदेशीचं हे नाटक. तो तसा व्यवसायात फारसा रुळलेला नाही. त्याचं नाटक घेऊन एकही नाववाला किंवा प्रथितयश कलाकार न घेता पणशीकरांनी त्यासाठी नवी 'टीम' उभी केली. एक जाहिरात देऊन नव्या होतकरू कलाकारांचे अर्ज मागवले. त्यांची वयानुरूप गटवारी करून जाणकारांकडून मुलाखती घेतल्या. त्यातल्या काहींची निवड केली. त्या निवडीतून 'निष्पाप'–नाट्य सुमन' संस्थेच्या सहयोगानं उभं राहिलं. दोन संस्थांचा हा योग पणशीकरांच्या संदर्भात बहुधा प्रथमच घडलेला असावा ! नवकलाकारांच्या निवडीतून हाताशी जे काही चांगले कलाकार आले त्यामध्ये नगरचा अनिल क्षीरसागर, वाईची सविता प्रभुणे ह्या दोघांनी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी 'निष्पाप'चे शंभर–सव्वाशे प्रयोग केले. या नवकलाकारांनी मिळवलेल्या यशानं अनेकांना उमेद आली असणार. मुंबईप्रमाणंच आता पुण्यातही नव्या कलाकारांना घेऊन पणशीकर नवीन नाटकाचा प्रयोग करू इच्छितात. केवळ पुण्याच्या कलाकारांसाठी नव्हे तर नगर, सोलापूर, कोल्हापूर अशा ठिकाणच्या कलाकारांना हाताशी धरून काही नवं, वेगळं करण्याचा मोठा घाट पणशीकर करीत आहेत. आपल्या संस्थेच्या नाटकाची सारी सूत्रं नव्यांच्या, तरुणांच्या हाती जावीत असं पणशीकरांना मनःपूर्वक वाटतं ! केवळ वाटतं असं नव्हे तर त्यासाठी ते किती प्रयत्नशील आहेत हे मी गेले काही महिने जवळून पाहतोय. हे केवळ स्वतःच्याच संस्थेसाठी ते करतात असं नाही, तर जर कोणी त्यांच्याकडं त्यांच्या नाटकासाठी कपडे, नेपथ्यादी गोष्टी मागायला आला तर पणशीकर ते सारं आग्रहानं, आनंदानं देतात. त्यांचा तसा त्या नाटकाशी संबंध नसतानाही ते मदतीला तत्पर असतात. अगदी नुकतंच आलेलं 'डोंगर म्हातारा झाला !' हे नाटक त्याचं उदाहरण आहे. नाट्यनिर्मितीसाठी जे जे म्हणून हवं असतं ते ते सारं या मंडळींना त्यांनी दिलं आणि उत्साहानं त्यांच्या प्रयोगांचं कौतुक केलं. असं जे काही चांगलं दिसेल, वाटेल त्याचं मनःपूर्वक जाहीर कौतुक करणं किंवा त्यात प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष सहभागी होणं हा पणशीकरांचा खास विशेष आहे. पणशीकरांनी 'तो मी नव्हेच'च्या वेळी जेव्हा नाट्यनिकेतन सोडलं तेव्हा लखोबा लोखंडेची भूमिका २८ प्रयोगांमध्ये आत्माराम भेंडे यांनी केली. तर ज्या वेळी अत्रे थिएटर्समध्येही पणशीकरांचे मतभेद झाले तेव्हा मधल्या काळात बापूराव माने यांनी १११ प्रयोगांत 'लखोबा' केला. पुन्हा ती भूमिका नाट्यसंपदेत स्वतः पणशीकरांकडं आली. मधल्या काळात भेंडे आणि माने यांनी 'लखोबा' केला म्हणून या नाटकाच्या प्रयोगांचं सातत्य टिकलं याचं भान पणशीकरांना होतं आणि आहे. म्हणूनच 'तो मी नव्हेच'च्या आठशेव्या प्रयोगाला त्यांनी भेंडे आणि माने यांचा जाहीर गौरव केला. रांगणेकरांशी मतभेद होऊनही त्यांचा गौरव केला. एका अर्थी रांगणेकरांनीच पहिल्या काळात पणशीकरांना घडवलं, त्याची जाण त्यांनी ठेवली. अशी कृतार्थ जाण दिवसेंदिवस दुर्मीळ होत चाललीय म्हणून असे प्रसंग आवर्जून सांगायचे. इतकं कशाला, 'इथं ओशाळला मृत्यू'मधलं संभाजीचं काम काशिनाथ घाणेकरांनी सोडल्यावर पणशीकरांनी मा. दत्तारामबापूंना संभाजी करण्याची विनंती केली. दत्तारामबापूंच्या विनयशील स्वभावाला नकार माहीत नव्हता. त्यांनी पणशीकरांची अडचण ओळखून मोजके–आवश्यक तेवढे प्रयोग केले. त्या दत्तारामबापूंचाही जाहीर गौरव पणशीकरांनी एका प्रयोगाच्या वेळी केला. आपल्या वेळेची नड या कलाकारानं भागवली ही भावना त्या गौरवामागं होती. नाट्यव्यवसायातल्या हिशोबी, मतलबी वातावरणात असं काही घडलं म्हणजे आगळंच वाटतं ! पणशीकर दिखाऊपणासाठी, प्रसिद्धीसाठी हे सारं करीत नाहीत, तर त्यांना ते 'आतून' जाणवत असावं. अन्यथा इतक्या सहजतेनं ते होणार नाही !

पणशीकरांचं व्यक्तित्व जसं लोभनीय आहे, तसंच ते वादग्रस्त आणि वादळग्रस्तही आहे. कधी व्यक्तींवरून, कधी प्रसंगांवरून तर कधी तत्त्वांवरून अनेक वाद आणि वादंग यांना ते सामोरे गेलेले आहेत. कधी हरले, कधी जिंकले. दोन्हीपैकी काही घडलं तरी संस्थाचालन आणि रंगभूमीविषयीची ओढ, निष्ठा कधी ढळली नाही एका अर्थी अनेक प्रसंगी हा माणूस स्थिरचित्त असाच राहिला आहे. नाट्यसंपदेच्या गाडीला अपघात होऊन लाख–दीड लाखाचं नुकसान

पृष्ठ ३१ वर

इंदिराजींच्या हत्येनंतर उसळलेली भीषण दंगल अजून धुमसतेच आहे. वर्तमानपत्रांतून–आकाशवाणी–दूरदर्शनवरून राजधानी शांत असल्याच्या बातम्या दिल्या जात असतानाच दिल्लीत मोठमोठ्या इमारती जळत होत्या. सडलेल्या आणि जळणाऱ्या प्रेतांचा वास कोंदला होता आणि लूटमारीत अनेक घरं रिकामी झाली होती.

दंगलीचा डोळ्यांनी पाहिलेला हा वृत्तांत. या लेखाचा पहिला भाग मागील आठवड्यात प्रसिद्ध झाला. हा पुढील भाग...

# हत्येनंतरच्या भीषण होळीत विद्रूप झालेली राजधानी

**दत्तप्रसाद दाभोळकर**

## सहा : सभ्यता–संस्कृतीचे वस्त्रहरण

आज सोमवार तारीख पाच नोव्हेंबर. सरकारी सूत्राप्रमाणे दिल्ली आता शांत आहे. किमान आमचे ऑफिस आज प्रथमच उघडले आहे. मी माझ्या खोलीत जाऊन बसलो. सारे काही विसरून काम करावयाचे ठरवतो. माझ्या तीन स्टेनोंपैकी फक्त निर्मल आलेली आहे. निर्मलला मी काही गोष्टी समजावून देतोय.

एवढ्यात एक शास्त्रज्ञमित्र माझ्या खोलीत येतो. आम्हा लोकांचा विनोदाचा सेन्स जरा जादाच आहे. जादा कसला, आमचा विनोद असतो अजागळ आणि क्रूर! मागे बलजीतला खोलीत रडताना पाहून मला रामदास भटकळांचा लेख आठवला होता! प्रकाशसिंगचा फोन आल्यावर मी पहिल्यांदा विनोदच मारला होता! बाईंच्या अंत्ययात्रेला गर्दी कमी पाहून पण आम्हाला विनोदच सुचला होता! माझा हा शास्त्रज्ञमित्र सहजपणे म्हणतो, 'निर्मल, आज तुझ्या अंगावर भलतीच उंची नवी साडी दिसते!' –त्याला सुचवायचंय निर्मल, तू खुशीत दिसते आहेस किंवा तुझ्या नवऱ्याने पण कोठे तरी हात मारून नव्या साड्या, सूट, बूट वगैरे घरात भरलेत! मी चमकून त्या मित्राकडे पाहतो आणि निर्मलकडे पण. –निर्मल आज अक्षरशः नवी ठेवणीतील साडी घालून आली आहे. नेहमी कधी फारशी न नटणारी निर्मल खूप नटली पण आहे.

काही तरी विचित्र घडलंय. निर्मल त्याला सडेतोड वर्मावर घाव करणारे एखादे उत्तर देणार असे मला वाटते. निर्मल ही एक हसतमुख, भांडकुदळ, सडेतोड पण प्रेमळ आणि संवेदनाक्षम मुलगी आहे. आणि होते वेगळेच. निर्मल ओक्साबोक्सी रडू लागते. निर्मल आत्तापर्यंत माझ्यासमोर कधी रडलेली नाही. ती कधी अतिशयोक्ती करेल असेही मला वाटत नाही. देवदत्त दाभोळकर दिल्लीला येतात त्या वेळी निर्मल त्यांचे नेहमी स्वागत करते. ते निर्मलला चांगले ओळखतात. निर्मल अतिशयोक्ती करू शकणार नाही हे ते सुद्धा सांगतील. निर्मल सांगते आहे. 'मॉडेल टाउनमधील त्यांच्या घराच्यामागे टॅक्सीस्टँड जाळला. मिळतील तेवढे सरदार ड्रायव्हर आणि इतर सरदार एका टँकरमधे ढकलले त्याला आग लावली आणि तो पेटवला दुकाने लुटताहेत आणि जळताहेत. पळालेला एक सरदार त्यांच्या घराच्या गोल चक्करपर्यंत आलाय. त्याला मारून बेशुद्ध केला. वर तेल ओतले. त्याला पेटवला आणि जवळपास बायका-मुलांना हसत बसावयास सांगितले! त्यांच्या घराजवळच्या तीन मजली प्रशस्त कोठीवर घोंगावणारा बेहोश जमाव चालून गेला. गच्चीवर जाऊन सरदाराने हवेत घाबरून किंवा लोकांना घाबरवण्यासाठी बंदूक उडवली. लोकांनी चारी बाजूंनी इमारत पेटवली. त्या सरदाराजवळ त्याची बायको आणि तिला चिकटून दोन छोटी चार–पाच वर्षांची मुले उभी राहतात. 'मला मारा; पण माझ्या बायकोला आणि या मुलांना सोडा!' म्हणून तो ओरडून सांगतोय; पण दोन मुले अंगाला बिलगलेल्या अवस्थेत ती बाई जळून मेली. निर्मल धुमसून-हुमसून सांगते आहे. त्यानंतर गेले दोन दिवस आपण काय केलंय, कसे वागलोय हे निर्मलला नीट आठवतही नाही आहे. हे सारे पाहून किंकाळ्या ऐकून, तिच्या पाच वर्षांच्या गौरवला न थांबणाऱ्या ओकाऱ्या सुरू झाल्यात. त्याला डॉक्टरकडे हलवलाय. आज सकाळी उठल्यावर आपण काय केलंय हे निर्मलला आठवतच नाही आहे. तिने खूप सौंदर्यप्रसाधन केले आहे. नटलीये आणि ठेवणीतील साडी घालून ऑफिसात आली आहे.

निर्मलचा एकूण तोलच पार ढळला आहे; पण माझ्या विभागातील तीस–चाळीस जण आलेत. दिल्लीच्या वेगवेगळ्या विभागांतून ते आलेत. इतर जण न येता हे लोक आलेत म्हणजे यांचे विभाग आता तसे शांत असावेत. हे सारेजण संशोधनक्षेत्रात काम करतात. समोरची गोष्ट, घटना, तोलून, मोजून, मापून, पारखून घ्यावी हे व्यवसाय म्हणूनही हे सारे जण ओळखतात. हे सारे जण सांगताहेत ते विचित्र आहे. गुडगाव, फरीदाबाद, गाझियाबाद या सरहद्दीवरील शहरांतून पण हे लोक आलेत. सगळीकडे हेच घडलंय. हजारो ट्रक्स आणि गाड्या जाळल्या, हजारो घरे आणि दुकाने लुटली, नारायणा व इतर ठिकाणी जाळलेल्या गुरुद्वारांवर येथे आता हनुमानमंदिर

उभारणार म्हणून पाट्या लावल्या आणि भिंतीवर गिचमीड अक्षरात 'पंजाबात एक हिंदू मारला तर दिल्लीत दहा सरदार कापू' म्हणून लिहिले, येथवरच ही दंगल मर्यादित नाही. या दंगलीत न समजणारा, न कळणारा एक वेगळाच प्रवाह आहे. हे सारेजण जे सांगताहेत त्यातून तो अजिबात समजत नाही. समजला तरी त्याचे नीट आकलन होत नाही. हे सारे जण तसे या क्षणी माझ्यासारखेच भयचकित आहेत. बधिर आणि सुन्न आहेत. यातील प्रत्येकाने विश्वास बसू नये असे एक प्रदीर्घ भयानक स्वप्न पाहिलंय !

आमच्या ऑफिसात एकूण तेरा सरदार आहेत. त्यापैकी दोन-जण बरबाद झालेत. संपूर्णपणे लुटले गेलेत. एक जण मारला गेलाय. आमच्या ऑफिसातील महेंदरसिंग छग्गर मला खूप आवडायचा. छग्गर दणकट, उमदा आणि हसरा तरुण होता. त्याला तीन छोटी मुले आणि बायको आहे. तीस तारखेला ऑफिस कामासाठी आम्ही छग्गरला ग्वालेरला पाठवले होते. तो अद्याप आलेला नाही म्हणून आम्ही ग्वालेरला फोन लावतो. तो एक तारखेला सकाळी 'उत्कल एक्सप्रेस' मध्ये चढलाय. त्याला स्टेशनवर आणून त्या गाडीत बसवलेल्या त्याच्या मित्रानेच आम्हाला तसे सांगितलंय. आम्ही निजामउद्दीन स्टेशनवर माणूस पाठवतो. स्टेशनमास्तर सांगतो त्या दिवशी त्या बाजूने येणाऱ्या पंजाब एक्सप्रेस, जयंतीजनता, जेहलम एक्सप्रेस या गाड्यांमधून आम्ही मोजता येणार नाहीत एवढी सरदारांची प्रेते काढलीत. त्यातील अजिबात ओळखता येणार नाहीत, कोणी मागितली नाहीत अशी सत्तावीस प्रेते तर आत्ताच पोलिसांनी जाळलीत. त्या प्रेतांचे फोटो तो बघावयास द्यावयाचे नाकारतो. ते फोटो अजून डेव्हलप केले नाहीत म्हणजे खरे सांगायचे तर त्यांनी त्यांचे फोटो काढलेलेच नाहीत हे आमच्या लक्षात येते. आमचा माणूस स्टेशनमास्तरला सांगतो माझा मित्र तर 'उत्कल एक्सप्रेस'मध्ये होता त्याचे काय झाले ?– स्टेशन मास्तर म्हणतो उत्कल एक्सप्रेसमधून एकही प्रेत येथे आलेले नाही. कारण ग्वालेरपासून ४५ किलोमिटर्स अंतरावर मोरीनाला त्या गाडीतील प्रत्येक सरदार जिवंत जाळलाय ! मोरिना हे ग्वालेरनंतरचे पहिले स्टेशन आहे. आशा चिवट असते. छग्गरचा मित्र अवनिशकुमार आम्ही विमानाने ग्वालेरला पाठवतो. तेथून तो टॅक्सीने मोरिनाला जातो. मोरिना स्टेशनवरचे लोक सांगतात त्या गाडीतील एकही सरदार सुटणे शक्य नाही. दहा हजारांच्या जमावाने गाडीतील प्रत्येक सरदार जिवंत पेटवलाय. त्याच गाडीतून त्याच डब्यातून प्रवास करणारा दिपक आम्हाला भेटतो. तो दिल्लीला 'अॅबोट लॅबोरेटरीचा' वैद्यकीय प्रतिनिधी म्हणून काम करतो. त्याने महेंदरसिंगला शेवटचे पाहिलंय. त्याच्याच समोर एकूण दहा सरदारांना मारलंय. त्यापैकी एक जण डब्याचा कंडक्टर होता दोन जण सेनादलातील अधिकारी होते. महेंदरसिंग छग्गरच्या बायकोला आणि तीन अजाण मुलांना जाऊन काय सांगावयाचे आम्हाला अजिबात समजत नाही !

त्याच दिवशी दुपारी मी लोधीरोडवर डॉ. कासिम यांच्या ऑफिसात जातो. अंटार्क्टिका मोहिमेबाबत काही ठरवायचे आहे म्हणून तेथे सैन्यदलातील अधिकारी भेटतात. अंटार्क्टिका मोहिमेत खूप मोठ्या प्रमाणावर सैन्यदलातील लोक असतात. ते अधिकारी सांगतात एक तारखेला रेल्वेगाड्यात मारले गेलेल्या लोकांत सैन्यदलाचे सर्वात अधिक लोक आहेत. कारण एक तारखेला सैन्यदलाचे सुट्टीवर जाणारे लोक सोडून आणखी फारसे कोणी प्रवासच करत नव्हते. तेथूनच परत येताना दुपारी बरोबर तीन वाजता मी रिंगरोडवर आहे माझी गाडी लालकिल्ला आणि निजमबोधघाट याच्या अधेमध्ये कोठे तरी आहे. जवळून पोलिसांचा एक ट्रक जातो. ड्रायव्हरने नाकावर फडके बांधलंय. गाडीत कचरा भरावा तशी प्रेते भरलीत. मी आणि माझ्याबरोबरचा माझा सहकारी सूद असे दोघेही हा ट्रक पाहतो. माझा गाडीच्या चाकावरचा ताबा सुटतो आहे असे वाटते. तीन दिवसांपूर्वी तीन ट्रक्स भरून प्रेते हरवल्याची वृत्तपत्रात बातमी होती. माझा त्याच्यावर विश्वास बसत नव्हता. आणि आजही भर दुपारी ट्रकमधून ट्रक भरून प्रेते हालवली जाताहेत !

ऑफिसात परत आलो आणि आमचे ऑफिस हे एकटे वा अपवादात्मक नाही हे समजले. जवळच्या दुसऱ्या आमच्या माहितीच्या प्रत्येक ऑफिसात हेच घडलंय. आमच्याजवळ 'पटेल चेस्ट इन्स्टिट्यूट मधील एक कारकून मारला गेलाय. 'सी. एस. आय. आर'च्या डॉ. जोहरींचा स्टेनो जाळलाय. 'हिमाचलप्रदेश एम्पोरिअम'च्या मॅनेजर शहांचा फोन येतो. त्यांचा एक संशोधनप्रयोग आम्ही सध्या करतोय. तो आता येणार होता. त्यांच्याकडे कोणी सरदार नाही म्हणून तो तरी यातून सुटला असावा असे वाटत होते. तो म्हणाला एक टॅक्सी आम्ही नेहमी ठरवत असू. त्या टॅक्सीचा मालक माझ्या खोलीत बसून रडतोय. त्याच्या जावयाचे आणि मुलाचे केस एकमेकास बांधून त्याच्याच टॅक्सीत घालून त्या दोघांना जाळलंय ! मला वाटते दिल्लीत चुकूनसुद्धा असे एखादे ऑफिस मिळणार नाही की जेथील एक तरी सरदार मारला वा लुटला गेलेला नाही. या सर्वात भर घालीत बाहेरून आलेला एक मित्र सांगतो की, सब्जीमंडी बर्फखान्याजवळ कुजलेली, सडलेली काही प्रेते पोलीस तेथेच आडोशाला जाळताहेत.

**तुम्हाला खलिस्तान नको होते; पण तुम्हाला ते हवे आहे अशी या देशातील जनतेची समजूत करून देण्यात आली होती.**

**तुमच्या मागण्या खलिस्तानशी संबंधित नाहीत हे तुम्ही आम्हाला पटवून देणे आणि आम्ही ते समजावून घेऊन तुम्हाला झुकते माप देत तुमच्या मागण्या मंजूर करणे हे या क्षणी फार जरुरीचे आहे.**

मी घरी येतो तर 'आर्मी पब्लिक स्कूल' चा फोन आलाय. मी अंटार्क्टिका प्रशिक्षणासाठी काश्मिरात गेलो त्या वेळी ब्रिगेडिअर बलवंतसिग रंधावा यांनी व त्यांच्या बायकोने माझे फार चांगले स्वागत केले होते. त्यांचा एकुलता एक मुलगा गोगी दिल्लीला आर्मी पब्लिक स्कूलमध्ये आहे. त्यांनी मला गोगीला भेटायला सांगितले होते. मी गोगीला भेटलो होतो. चौदा वर्षांचा कोवळा पण उंचापुरा घिप्पाड गोगी मला फार आवडला होता. तो मला म्हणाला होता, 'अंकल, मला गोगी नाही गौरव म्हणा! गोगी म्हटले की मुले चिडवतात.' मी गोगीला माझ्या घरी बोलावले होते. त्यामुळे माझा पत्ता आणि टेलिफोननंबर त्याच्या टेबलावर होता. आणि फोनवर आत्ता मला आर्मी पब्लिक स्कूलचा वॉर्डन सांगत होता, 'गोगी मारला गेलाय. त्याच्या कोणत्याच स्थानिक पालकांचा पत्ता मिळत नाही. तुम्ही घेताय त्याचे प्रेत ताब्यात ?'

मी हे सारे फार संयमाने लिहितोय. लेखणीसारखे भयंकर दुधारी हत्यार नाही. सावरकरांना श्रेष्ठ मानूनही 'लेखणी मोडा बंदुका घ्या' हे त्यांचे विधान मला अजिबात पटलेले नाही. लेखणीसारखे ताकदवान आणि भयंकर या जगात दुसरे आणखी काही नाही असे मी मानतो–लेखणी विकून अतिशयोक्ती करून भडकवणारे लिहून नाव वा चार पैसे मिळवावयाची मला अजिबात खाज नाही. मी लिहिलेली प्रत्येक गोष्ट नाव, पुराव्याने आहे व ती कोणत्याही आयोगासमोर सिद्ध करता येईल.

माझी अडचण थोडी वेगळी आहे. लेखणी संयमाने वापरावी हे माझ्यावरील संस्कार आहेत. मी मध्यमवर्गीय डरपोक माणूसही आहे. काही गोष्टी सांगावयाचीसुद्धा मला शरम वाटते! घडलंय ते मी लिहिलंय, त्यापेक्षा अधिक भयंकर आहे. नादिरशहानेसुद्धा अशी 'कतले आम' केली नव्हती! आणि त्रिलोकपुरी, मोगलपुरी येथे जे घडलंय ती नुसती 'कतले आम' नाही. ते ओंगळवाणे आणि बीभत्स आहे. या देशाच्या ज्ञात इतिहासात यापूर्वी असले काही घडलेले नाही.

रावणाने सुद्धा लक्ष्मणरेषा ओलांडली नव्हती. दुर्योधनानेसुद्धा सभ्यतेचे आणि संस्कृतीचे असे वस्त्रहरण केले नव्हते.

## सात : शरणार्थी शिबिरात

आज मंगळवार तारीख सहा नोव्हेंबर. कालचा दिवस अगदी अस्वस्थतेत पण शांत गेलाय. आज सकाळीच सहाच्या सुमारास माझ्या घरातील घंटा कर्कश वाजते. घंटा खूप वेळ वाजत असावी. नेहमी लवकर उठणारा मी अजून झोपेत आहे. झोपेत कसला गुंगीतच! त्रासलेल्या चेहऱ्याने, तारवटलेल्या डोळ्यांनी मी दार उघडतो. दारात आमच्या कॉलनीत राहणारी मिसेस गुरचरण कौर उभी आहे. गुरचरण कौर माझ्याकडे फारशी न येणारी, माझ्याशी फारसे न बोलणारी. ती भयंकर भेदरलेली आहे. माझी स्टेनो बलजीत कौर तिची मैत्रिण आहे. ती म्हणते बलजीतचे सारे काही लुटून नेलंय. ती, तिची आई तिचे वडील हे सारे प्रसादनगर पोलीसस्टेशनमधील शरणार्थी शिबिरात आहेत. ते सारे गेले चार दिवस तेथे आहेत. बलजीतला आईव-डिलांना घेऊन गुरुचरणाच्या घरी यायचंय; पण पोलिसांच्याकडे त्यांना आणून पोचवावयास वाहन नाही.

माझी झोप आता थोडी संपलीये. मेंदू थोडा तल्लख झालाय. विचार आणि चर्चा करावयास मी आता मोकळा आहे. मी गुरचरणला म्हणतो, 'तुझा काही तरी गैरसमज झालाय. तू सांगतेस ते मला अजिबात पटत नाही. बलजीत करोलबागमध्ये देवनगर विभागात राहते. दिल्लीत फक्त करोलबाग या एकाच विभागात दोन तारखेच्या सकाळपासून सैन्य गस्त घालते आहे. तेथील 'अजमल खाँ पार्क' मध्ये सैन्याच्या मोठ्या छावण्या लागल्यात. त्यातून बलजीतचे वडील सैन्यामधून सेवानिवृत्त झालेले सुभेदार आहेत. त्या सर्वांना काहीही होणार नाही. त्यातून चार दिवसांपूर्वीच ती शरणार्थी शिबिरात गेलेली असेल तर यापूर्वीच येथे आली असती. त्यातून तिला आज यावयाचे असेल तर ती एकटी पण सर्वांना घेऊन येऊ शकते. काल तर मी स्वतः दिल्लीतून हिंडून आलोय महत्त्वाचे म्हणजे सरकारी सूत्रांप्रमाणेसुद्धा दिल्ली आता अगदी शांत आहे!'

माझ्या तर्कशुद्ध विचारांकडे गुरचरणचे अजिबात लक्ष नाही. ती चिडते. ती म्हणते, 'बलजीत तेथे आहे हे मला नक्की माहीत आहे. मला तसा निरोप आलाय. तुम्ही तिला आणावयास तुमची गाडी देणार का ते फक्त मी विचारायला आले आहे. होय किंवा नाही काय ते सांगा! उगाच चर्चा करीत बसू नका!' मी माझ्या ड्रायव्हरला बोलावतो. काम कळल्यावर तो माझ्या चेहऱ्याकडे चमत्कारिक नजरेने पाहतो. सरळ नाही म्हणून सांगतो. गेले तीन चार दिवस त्याच्या पोटात दुखतंय.

गाडी घेऊन स्वतः जावयास हवे हे समजल्यावर परिस्थितीचे गांभीर्य माझ्या थोडे लक्षात येते. काल मी फक्त रिंगरोडवर गाडी चालवली होती. रस्त्यातही मला कोठे सरदार आढळले नव्हते. आता मला गाडी बर्फखाना, फिल्मिस्तान या असल्या रस्त्यावरून न्यावयाची होती. मी गुरचरणला म्हणतो, 'एक कर. बायांना सरदारीण म्हणून कोणी रस्त्यात ओळखत नाही हे खरे; पण तरीही तू साडी घाल. कुंकू लाव, माझ्या बायकोचे मंगळसूत्र गळयात घाल. आपण बलजीत आणि तिच्या आईला तरी घेऊन येऊ. तिच्या वडिलांचे काय करावयाचे ते तेथे गेल्यावर ठरवू. आम्ही लगेच निघालो. सारा रस्ता सुनासुना आहे. फिल्मिस्तानसमोर चार दिवसांपूर्वी पेटवलेली सरदारांची टायर विकणारी तेराही दुकाने अजून पेटलेली आहेत. म्हणजे ती अजून आतून धुमसताहेत. आत पेटते निखारे आहेत.

मी पोलीसचौकीतील त्या शरणार्थी शिबिरात शिरतो आणि सुन्न होतो. बधिर होतो, विमनस्क होतो! हे शब्द आता पुन्हा पुन्हा किती वेळा वापरू ? मला माहीत असलेले माझ्या भाषेतील सारे शब्द मी वापरून वापरून गुळगुळीत केलेत! खरे सांगायचे तर माझ्या साऱ्या भावना, संवेदना पण गुळगुळीत झालेल्या आहेत; पण तरीही आत पाऊल टाकल्यावर माझ्या पोटात कालवते. मी कोलमडतो. तोंडात ओकारी दाटून येते. अजून मी कोणतेच शरणार्थी शिबीर पाहिलेले नाही. ती सारी भयाण असणारच हे पण मला माहीत होते; पण हे पोलीसचौकीच्या प्रशस्त इमारतीमधील शिबीर आहे. म्हणजे शरणार्थी शिबिरामधील सर्वात अधिक सुव्यवस्था

असलेले भाग्यवान शिबीर ! सारे संडास तुडुंब भरून वाहताहेत. आणखी कसले सहन न होणारे वास सुटलेत. मिळेल त्या जागेत मिळेल ते अंथरूण घालून वा काहीही अंथरूण न घालता माणसे पसरलीत. पुरुष, स्त्रिया, म्हातारे, तान्ही मुले सारे जण ! माणसे फार दाटीदाटीने कोंबलीत. फारच थोडया लोकांना पांघरुणे मिळालेली आहेत. जवळपासच्या काही माझ्यासारख्या सज्जन दानशूर माणसांनी ती आणून दिलीत ! गेले चार दिवस सर्वांना भाकरतुकडा मिळतोय; पण चहा नावाची चैन यांच्या वाटयाला आलेली नाही ! किमानपक्षी बलजीत आणि तिचे कुटुंबीय यांना तरी त्याचे दर्शन झालेले नाही !

## मी भारावून पहात होतो

बलजीतला आणि तिच्या कुटुंबियांना हे सर्वात अधिक सुस्थितीत असलेले शिबीर मिळालंय यालाही कारण आहे. बलजीत फार सफाईने आणि सुंदर इंग्रजी बोलते आणि तुम्ही चांगल्या इंग्रजीत बोललात की, या देशातील सर्वसामान्य जनताच नव्हे तर नोकरशाहीसुद्धा तुम्हाला टरकते ! मी बलजीतकडे पाहतो. तिच्या डोळयातील समुद्र केव्हाच आटून गेलेत. ती अजिबात रडत नाही. गुन्हेगाराचा वाटावा असा तिचा चेहरा कठोर आणि दगडी बनलाय. मला तिच्याकडे पाहण्याचे अजिबात धैर्य होत नाही. बलजीत अगदी शांतपणे सांगत आहे. मी मान खाली घालून ऐकतो आहे. एक तारखेची सकाळ. दहा–अकरा वाजायची वेळ. बलजीत आपल्या घरात बसून दूरदर्शन पहात होती. अर्धांगाने अंथरुणाला खिळलेली तिची आई खिडकीजवळच्या पलंगावर झोपली होती. आई बलजीतला म्हणते, मला काही तरी जळल्याचा वास येतोय. बाहेर धूर दिसतोय. बलजीत आईकडे फारसे लक्ष देत नाही. आई दिवसभर असेच काही तरी बडबडत असते असे समजून. एवढयात बाहेर प्रचंड गलका होतो. 'ये सरदार का घर है. ये सरदार का घर है' म्हणून काहीसे जमाव ओरडत असतो. समजण्यापूर्वीच धक्के मारून दार फोडले जाते. प्रचंड थव्यांनी वावटळीसारखी माणसे आत घुसलीत. बलजीतला काही समजत नाही. काही दिसत नाही. डोळयांपुढे सारा अंधार. पायातील सारी ताकद गेलेली; पण ती तशीच आईला काखोटीला मारते. वडिलांचा हात धरते. जवळच्या हिंदू शेजाऱ्याच्या घरात शिरते. – भानावर येते तेव्हा आपले सारे काही लुटले गेलंय हे बलजीतच्या लक्षात येते. तिच्या घरात काही म्हणजे काही बाकी उरलेले नाही. गॅसचा सिलेंडर, कपाट, भांडी, सोफा, पंखा हे सारे नेलंय यात काही नवल नाही; पण कपडे, चपला, झाडू वगैरे काहीसुद्धा सोडलेले नाही. बलजीतच्या अंगावर फक्त नायटी आहे. बलजीत तशी व्यवहारदक्ष मुलगी आहे. वाढलेल्या वयाने आणि न पेलणाऱ्या जबाबदाऱ्यांनी तिला व्यवहारदक्ष बनवलंय. बँकेचं पासबुक, बँकेतील ठेवी यांचे क्रमांक ती वेगळया वहीत लिहून ठेवते. ठेवींच्या पावत्यांच्या फोटोकॉपीज काढते. जवळ असलेले थोडेफार दागिने काळजीपूर्वक पेटीत बंद करून ती पेटी गोदरेज कपाटाच्या आतल्या खणांत ठेवते. या देशात या कशालाच काहीं अर्थ नाही हे तिला आता समजलंय. ऑफिसात येण्यासाठी कपडे कसे विकत घ्यावेत ही या मुलीपुढील या घडीला एकमेव समस्या आहे ! धारदार आवाजात ती मला विचारते, 'सर, मी या कपडयांत ऑफिसात आले तर चालेल तुम्हाला ?'

पोलीस मला सांगतात, बलजीत आणि तिच्या आईला घेऊन जावयास हरकत नाही; पण तिच्या वडिलांना घेऊन जाणे धोक्याचे आहे. हा म्हातारा दाढी–मिशा काढत असेल तर गोष्ट वेगळी ! आकाशवाणी आणि दूरदर्शन घसा खरवडून राजधानी दिल्ली शांत असल्याचे सांगताहेत आणि येथे एका प्रमुख पोलीसस्टेशनमध्ये एक पोलीसअधिकारी मला हा सल्ला देतोय. बलजीत आणि तिची आई, वडिलांना सोडून यावयास अजिबात तयार नाहीत. मी पोलीसअधिकाऱ्याला म्हणतो, तुम्ही घरापर्यंत एक शस्त्रधारी पोलीस माझ्याबरोबर गाडीतून पाठवा ना. तो या गोष्टीला साफ नकार देतो. त्याच्याकडे फार कमी पोलीस बंदोबस्तासाठी आहेत. काय करावे हे मला क्षणभर समजत नाही; पण राजधानी दिल्लीचे 'शानोशौकत' आणि नखरे मी फार जवळून पाहिलेत. समोरच्या माणसाला कसे वाचावे आणि वावरावे हे समजण्याइतके माझ्याही कानामागचे केस आता पांढरे झालेत. महत्वाचे म्हणजे 'दिडक्यांसारखा मित्र नाही' हे रवींद्र पिंगेंचे सुभाषित मी मार्गदर्शक मित्रासारखे नेहमी माझ्याबरोबर ठेवतो ! खरोखर खिसा मोकळा करून खिशात घालावयास माणसासारखा दुसरा सरळ प्राणी या जगात नाही ! मी ते करावयाचे ठरवतो. मी कोपऱ्यात बंदूक घेऊन उभ्या असलेल्या एका हवालदाराकडे जातो आणि खिशामधून पन्नास रुपयांची नोट काढून त्याच्यापुढे फडकावतो.

–आणि मी हवेत उडतो ! माणसे अजून मेलेली नाहीत. कोपऱ्यातील तो मामुली फाटका पोलीस–उत्तरप्रदेशातील तो पृथ्वीपाल–माझ्यावर जाम उखडलाय. तो म्हणतो, 'साहेब, मी पैसे खात नाही असे नाही; पण मलाही बायका–मुले, आई, बहीण, वडील आहेत. हा कसला भयंकर प्रसंग आहे ! मला त्यांना मदत करावयाची आहे. तुम्ही त्यांना मदत करताय म्हणून मला तुमच्याबद्दल आदर वाटतोय; पण माणसे खरेच फार कमी आहेत. येथे आम्ही फक्त वीसजण आहोत. प्रत्येकजण दिवसातून किमान अठरा–वीस तास काम करतोय. आम्ही सारे फार थकलोय. दंगल फार विस्तृत आणि मोठी आहे. त्यातून सारे सरदार पोलीस आम्ही घरी बसवलेत, लोक त्यांनाच मारतील या भीतीने. दोन दिवसांपूर्वी आझादपूरला सरदार डी. एस. पी.ला जमावाने ठेचलाय आणि अजूनही परिस्थिती फारशी सुधारलेली नाही. अगदी बंदुकीसकट मी बरोबर असतानासुद्धा फिल्मिस्तानच्या रस्त्याने जाणे धोक्याचे आहे ! मी तुमच्याबरोबर येतो; पण आपण रिंगरोडच्या लांबच्या रस्त्याने जाऊ. तुम्ही मला परत पुन्हा येथे आणून सोडले पाहिजे !

मी भारावून स्तब्ध होऊन त्याच्याकडे पहात होतो. गेल्या सात दिवसात पहिल्यांदा मला पुन्हा एकदा माणूस भेटला होता. साक्षात्कार झाल्यासारखा मला आनंद झाला होता. स्वतःवरचाच पार उडालेला विश्वास थोडा परत आला होता. या देशात कोठेही जा. कोणत्याही घरात हिंडा. आमच्या भावना, आमचे संस्कार अजून सर्वत्र विखुरलेल्या स्वरूपात बाकी आहेत. मात्र या घडीला आम्हा सर्वांना एकत्र करणारा, एका सुसूत्रात गोवणारा, अमच्यात जान ओतून आम्हाला कार्यरत करणारा कोणी महात्मा मात्र या देशात नाही !

# आठ : चर्चा, मतभेद, बकवास

आपण बोलणारे, वाचणारे, लिहिणारे मध्यमवर्गीय म्हणजे एकूणच धमाल लोक आहोत. काही दिवस संघात किंवा राष्ट्रसेवादलात जाऊन कवायत करणे आणि जोरदार आवाजात क्रांतिगीते म्हणणे ही आपली राष्ट्रकार्याची कल्पना आहे ! अधीमधी कधीतरी आपण भलतेच फॉर्मात किंवा लाडात येतो. लष्करी शिक्षण घेतो किंवा रात्रीची गस्त घालणे अशा तुफान विनोदी गोष्टी करतो. मला बासष्ट सालची गोष्ट आठवते. त्या वेळी चीनचे आक्रमण झाले होते. त्या वेळी मी दादरच्या कीर्ती कॉलेजात डेमॉन्स्ट्रेटर होतो. आम्ही प्राध्यापकमंडळींनी लष्करी शिक्षण घ्यावयास सुरुवात केली होती. आम्हाला शिकवावयास सुभेदार पवार येत असत. आम्हा लोकांना शिकवताना त्यांच्या तोंडात अक्षरशः फेस येत होता. एक दिवस त्यानं विचारले, 'लहानपणी तुमच्यापैकी कोणी संघात, राष्ट्रसेवादलात वगैरे जावयाचे का ?' आम्ही सर्वांनी एका आवाजात हो म्हटले. तो म्हणाला, 'साहेबान, म्हणूनच मी तुम्हाला पुन्हा पुन्हा सांगून तुम्ही सारे जण ती बंदूक काठीसारखी धरताय !' नंतर पासष्ट साली गोरेगावच्या टोपीवालावाडीत रात्रीची गस्त घालण्याचे महत्कार्य मी केले होते. –आता सध्या आम्ही गेले सात दिवस आमच्या कॉलनीत रात्रीची गस्त घालतोय. आता या गस्तीचा सातवा दिवस आहे. म्हणजे हे प्रकरण लवकरच ढेपाळणार हे आम्हा सर्वांच्याच लक्षात आलंय ! या रात्रीच्या गस्तीचा एक फायदा असतो. यामुळे दुपारी घरी वा ऑफिसात सदसद्‌विवेक बुद्धीला त्रास न होता आपला हा हक्क आहे असे समजून झोपता येते ! कोणाच्या तरी घरी जाऊन रात्री एक–दोनदा चहा ढोसायचा, मन मानेल तशा सिगारेट फुंकायच्या आणि 'जागते रहो' म्हणून दंडा आपटत कॉलनीत फिरायचे असे या गस्तीचे स्वरूप आहे; पण गप्पा–मुक्त गप्पा, पोटभर गप्पा, गप्पांचे गुऱ्हाळ हा या गस्तीचा खरा प्राण आहे ! सारे रोम जळत असताना निरो सारंगी वाजवत होता. इकडे सारी दिल्ली पेटली असताना आम्ही आमच्या गप्पांचे आणि वादविवाद–कौशल्याचे तुणतुणं वाजवतोय !

या गप्पांमधून काही गोष्टी हळूहळू माझ्या लक्षात आल्या होत्या. दंगल होईल, एवढ्या मोठ्या प्रमाणावर आणि भयानक होईल हे केवळ मीच नव्हे तर इतर सर्वांनीच स्वतःच्या मनाशी फार पूर्वी ओळखले होते; पण मजेची गोष्ट अशी की, प्रत्येकाने आतापर्यंत ही गोष्ट स्वतःपाशीच गुप्त ठेवली होती ! सध्या प्रथमच आम्ही प्रत्येक जण ते मत दुसऱ्या कोणाला सांगत होतो ! –दंगल का झाली याबाबतही प्रत्येकाचे वेगवेगळे सिद्धांत होते. एका मित्राचा सिद्धांत फार जबरदस्त होता. तो म्हणाला, हे असेच होणार हे मला माहीत होते! प्रत्येक शहराला स्वतःचा म्हणून एक आत्मा असतो. दिल्ली पाच हजार वर्षे या देशाची राजधानी आहे. अठराशेसत्तावन्न साली राजधानी दिल्ली पुन्हा एकदा शंभर दिवस स्वतंत्र झाली होती. फक्त दिल्लीभोवती स्वातंत्र्यसैनिकांनी ब्रिटिशांच्या बाजूने लढणारे चार हजार सैनिक कापून काढले होते हे दिल्लीतील स्मारकस्तंभावर ब्रिटिशांनीच लिहून ठेवलंय; पण केवळ शीख सैन्याच्या गद्दारीमुळे हे स्वातंत्र्ययुद्ध फसले. मोजता येणार नाहीत एवढे स्वातंत्र्यसैनिक आणि लोक त्यानंतर ब्रिटिशांनी दिल्लीत मारले. हे सारे शीख सैन्याच्या गद्दारीमुळे घडले. राजधानी दिल्लीने शिखांच्या त्या देशद्रोहाची किंमत त्यांना आज चुकती केली आहे ! या महापुरुषाचे म्हणणे आम्हा कोणालाच पटले नाही. आम्ही म्हटले, शहराला आत्मा असतो हे समजण्याच्या अध्यात्मिक पातळीवर आम्ही अजून पोचायचोय; पण कोणी सांगावे हे सारे असेच सुरू राहिले तर माणसाला नाही तर फक्त शहरालाच आत्मा असतो असे आम्हालाही वाटायला लागेल !

पण आज आम्ही त्या मित्राची चेष्टा करायला विसरलो होतो. आजच्या गप्पांना एक वेगळी खुमारी आहे. आज वर्मा परत आलाय. तो एकतीस तारखेला इंदूरला होणाऱ्या 'अखिल भारतीय टेक्स्टाइल कॉन्फरन्स' साठी गेला होता. कॉन्फरन्स वगैरे काही झाली नाही. स्वतःच कसाबसा वाचून परत आलाय. तो आणि इतर प्रतिनिधी इंदोरला हॉटेल कांचनमध्ये उतरले होते. हॉटेल सरदाराचे म्हणून जमावाने हॉटेल पेटवले. पाठीमागून उड्या मारून पळताना एका प्रतिनिधीचा तर पाय मोडला. हा मात्र सुखरूप परत आलाय. तो म्हणतो इंदूर आणि भोवतालच्या खेड्यापाड्यात जवळजवळ दिल्लीसारखंच घडतंय. मी म्हटले, 'या गोष्टीचे मला मुळीच नवल वाटत नाही. किंबहुना हे असेच घडणार हे मला नक्की माहीत होते ! माझी तशी खात्री होती. या देशात अनेक वार अनेक ठिकाणी केलेल्या भ्रमंतीत मला तीन–चार गोष्टी नक्की समजल्यात. माझ्यापुरतेच म्हणाल तर या गोष्टी जवळजवळ सिद्धांत–पातळीवर पोहचल्यात. त्यापैकी एक सिद्धांत असा आहे की, या देशातील उत्तर भारतातील किंवा हिंदी विभागातील सारी जनता नेहमी भावनात्मक पातळीवर तरंगत असते. आपल्याला न कळलेल्या कोणत्या तरी अज्ञान माध्यमातून हे सारे लोक एका क्षणात एकमेकांशी संपर्क साधतात. एका लाटेवर आरूढ होतात. अठराशेसत्तावनचे स्वातंत्र्ययुद्ध, सत्याहत्तर साली बाईंचा झालेला पराभव. ऐंशी साली त्यांना मिळालेला विजय, आजची दंगल हे सारे या लाटेमुळे घडलंय. महत्त्वाचे म्हणजे धाकट्या भावाने थोरल्या भावाच्यामागे जावे तसे हे नंतर हळूहळू दक्षिण भारतात घडते. माझा सिद्धांत तुम्हाला पटत नसेल तर या सिद्धांतावर आधारलेले एक भविष्य तुम्हाला सांगतो. पुढील दहा वर्षांत केव्हाही एका क्षणात हा सारा विभाग शेतकरी आंदोलनाने पेटून उठेल. या देशाच्या इतिहासाला निर्णायक कलाटणी देणारी ती घडी असेल. खरे पाहता शेतकरी–आंदोलन महाराष्ट्र, कर्नाटक, गुजराथ, पंजाब अशा ठिकाणी सुरू न होता उत्तरप्रदेशात सुरू झाले असते तर हे कदाचित यापूर्वीही झाले असते; पण हे असे झालेच असते असे मात्र मी खात्रीपूर्वक सांगू शकणार नाही. कारण हे लोक एखाद्याला आपला नेता का मानतात किंवा का मानत नाहीत हे मात्र मला अजून अजिबात समजलेले नाही.'

पण माझ्या मित्रांना माझी बकवास ऐकावयाची नाही. त्यांना त्यांना स्वतःचीच सुनवायची आहे. ते म्हणतात तू उगाचच यावरून नाककान काढतोस. यात सिद्धांत वगैरे काही नाही. भावनात्मक पातळी पण नाही. हा साधा कायदा आणि सुव्यवस्था यांचा प्रश्न

आहे. साऱ्या उत्तरभारतात ती मामुली आहे. प्रथम थोडी दंगल सुरू झाली. ते तसे घडणे अटळ होते. दंगल पाहणाऱ्या प्रत्येकाने आणखी एक गोष्ट सांगितली आहे. प्रथम पोलिसांनी दंगलीला सहाय्य दिले किंवा किमानपक्षी प्रोत्साहन दिले किंवा त्याच्याकडे दुर्लक्ष केले. हे असे घडणे पण स्वाभाविक होते. मागे पंजाबात पोलीस आतंकवाद्यांच्याकडे दुर्लक्ष करतात असे आपणही म्हणत होतो; पण एका क्षणी ही दंगल पोलिसांच्या व शासनाच्या हातातून निसटली. वाघावर स्वार होण्याची हिंमत आणि ताकद नसलेल्यांनी वाघावर स्वार होऊ नये ही गोष्ट हे लोक विसरले होते. तुला सांगतो दिल्लीत त्या दिवशी, मोरारजी, वाजपेयी, चव्हाण, जगजीवनराम असे कोणी पंतप्रधान असते तर हे झाले नसते. बाईंनी आपल्याभोवती दुय्यम दर्जाचे, सुमार कर्तृत्वाचे लोक जमवले होते. बाईंचा नंबर एक धरला तर दोन ते दहा या क्रमांकावर येईल असा एकही नेता त्यांनी निर्माण होऊ दिला नाही. त्यांनी निर्माण केलेले नेते दंगल काबूत आणावयास नव्हे तर समजावून घ्यावयासही असमर्थ होते.

### प्रत्येकाचे स्वतंत्र मत

मी म्हटले तू म्हणतोस ते मला बरेचसे पटते; पण संपूर्णपणे पटत नाही. अगदी बाई जिवंत असत्या तरी त्यांना ही दंगल टाळता आली नसती. कारण बाईंनी आपल्याभोवती फक्त दुय्यम दर्जाचे नेतेच नव्हे तर दुय्यम दर्जाचे लाचार होयबा प्रशासक पण जमवले होते. शांतपणे विचार कर. या दंगलीपेक्षा बाईंचा खून ही अधिक भयानक गोष्ट आहे. जगभर राजकीय नेत्यांचे खून होत नाहीत असे नव्हे, ते तर तसे होणारच; पण बाईंच्या विश्वासू अंगरक्षकाने हा खून केलाय. दहा वर्षे सावलीसारखा हा माणूस बाईंच्या बरोबर होता. बाईंची घडणारी प्रत्येक गोष्ट, होणारी प्रत्येक चर्चा या माणसाला समजत होती किंवा छोटा टेपरेकॉर्डर बसवून त्याला समजावून घेता येत होती. ही हत्या करणारे लोक हे एवढे मोक्याचे प्यादे गमावू शकले म्हणजे ही माहिती द्यावयास, ही माहिती मिळवावयास त्यांच्याकडे आणखीही दुसरे मार्ग असले पाहिजेत. त्याहूनही महत्त्वाचे 'सी. बी. आय'च्या प्रमुखाने बाईंना हा माणूस, ही माणसे, येथे तुमच्या संरक्षणासाठी ठेवणे धोक्याचे आहे, चुकीचे आहे• म्हणून सांगितले होते. देशाची, स्वतःची निधर्मी प्रतिमा कायम ठेवण्यासाठी बाईंनी त्याला नकार दिला होता. या वेळी या 'सी बी आय'च्या प्रमुखाने आपण असे का सांगतोय ते बाईंना पटवून देऊन तसे करावयास भाग पाडावयाय हवे होते नाही तर त्यांच्यासमोर आपला राजीनामा फेकावयास हवा होता. आशियाडच्या वेळी सीमा सुरक्षा दलाचे इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलीस असलेल्या आमच्या जोगांनी हे करून दाखवलय. त्या वेळी दिल्लीची डेप्युटी कमिशनर ऑफ पोलीस असलेल्या किरण बेदीसारख्या जहांबाज बाईला त्यांनी केवळ निमंत्रणपत्रिकाबरोबर नाही म्हणून स्टेडियमच्या गेटवरून परत पाठवले होते. राजीव गांधींची गाडी वाटेत थांबवून संपूर्ण तपासली होती. वर ठणकावून सांगितले होते. 'मी आशियाडच्या संरक्षणाची जबाबदारी घेतलीये. तुमच्या मानापमानाची नाही. झेपत असेल तर बघा नाही तर हा माझा राजीनामा!' हे मी त्या वेळीही माणूसमध्ये लिहिलय. —हुकूमशाही वाईट; पण त्याहीपेक्षा लोकशाहीचा मुखवटा चढवून केलेली हुकुमशाही वाईट आहे. तो महाभयंकर प्रकार आहे. बाई तो प्रकार करत होत्या. आपला विश्वास बसणार नाही एवढ्या मामुली कुवतीची हांजी हांजी करणारी माणसे त्यांच्याभोवती निर्माण झाली होती. मोक्याच्या साऱ्या जागा अडवून बसली होती. 'सी बी आय'च्या प्रमुखाने मराठी जोगांसारखा राजिनामा हवेत भिरकावला नाही हे मी समजू शकतो. अशी हिंमत थोडी महाराष्ट्रीयन माणसे सोडून आज भारतात कोणाकडेच नाही! पण किमान पक्षी या सरदारांवर चोवीस तास पाळत ठेवावी एवढे समजण्याइतपत अक्कल पण याच्याकडे नसावी? त्यातून हा काही बाईंच्या खुनाचा पहिला प्रयत्न नव्हे. गेल्या चार महिन्यांत त्यांच्या खुनाचे दोन महत्त्वाचे प्रयत्न झालेत. ते वृत्तपत्रात आलेले नाहीत; पण मला माहीत आहेत.

मात्र मित्र माझे ऐकून घेण्याच्या मनःस्थितीत नाहीत. त्यांना वाटते मी आपले माझ्या मराठी माणसांचे घोडे पुढे दामटतोय! मित्र मला एकदम चिडवायला लागतात. ते म्हणतात, 'दाभोळकर, तू मुंबई सोडून कारण नसताना दिल्लीला नोकरीला आला आहेस. पाहिजे तसा भारतभर हिंडतोस. हवे त्या माणसाला भेटू शकतोस. वाटेल ते छापून आणू शकतोस. खरे पाहता तुझ्या विषयाच्या आणि अंटार्क्टिकावर होणाऱ्या संशोधनाचा अजिबात काही संबंध नाही तरी आता अंटार्क्टिकावर चालला आहेस. आम्हा सर्वांना असे वाटते की, तू खरा 'सी बी आय'चा माणूस आहेस. आपल्या साहेबांची नोकरी आता नक्की जाणार याची खात्री झाल्यावर त्याच्याविरुद्ध हवे ते बोलून घेतो आहेस.'

माझा एक मित्र माझ्या मदतीला येतो. तो म्हणतो, दाभोळकर, काही 'सी बी आय' माणूस वाटावा इतका बुद्दू नाही! या देशात आज गुप्तहेर, विचारवंत, शास्त्रज्ञ, पत्रकार हे शब्द शिवी देण्यासाठी वापरले जातात! या साऱ्या लोकांनी गेल्या वीस वर्षांत आपल्या कर्तृत्वाने ही कमाई केली आहे! पण हा माणूस म्हणतो ते मला पटते. बाई जिवंत असत्या तरी आता एकदा केव्हा तरी हे घडलेच असते; पण त्याचे कारण वेगळे आहे. बाईंनीच मुळी असे ठरवून ठेवले होते. आपण केंद्रीय मंत्रिमंडळाचे खाजगी सल्लागार आहोत अशा विश्वासाने तो सांगतोय! तो म्हणतो, 'बाईंनी दोन पर्याय पुढे ठेवले होते. एक शिखांना समजावून घेऊन आंजरून-गोंजरून जिंकून घ्यावयाचा. ज्या क्षणी ते जमणार नाही असे लक्षात येईल त्या क्षणी त्यांना चिरडून टाकावयाचा. कायमचा धडा शिकवायचा.

आम्हाला कोणालाच त्याचे म्हणणे पटत नाही. आम्ही म्हणतो, शीखांना समजून घेण्याचा प्रयत्नच झाला नाही किंवा झाला असेल तर अर्धवटपणे आणि गबाळेपणाने झालाय. शिखांना चिरडावयाचा प्रयत्न अगदी अशा गबाळेपणाने न करता अक्कलहुशारीने केला तरी जमणार नाही. आधी हे करणे चुकीचे. करावयाचे म्हटले तर प्रशासनाकडे एवढी कुवत नाही. सुवर्णमंदिरावरील हल्ल्याच्या वेळी पेटून उठलेले जवान या दंगलीची 'व्ही. डी. ओ. रेकॉर्डिंग' पाहिल्यावर शांत बसतील हा भ्रम आहे. ती व्ही. डी. ओ. रेकॉर्डिंग घेतली गेलीत. मोठ्या प्रमाणात घेतली गेलीत; पण या वेळी कदाचित माथे भडकावून हे लोक एकदम रस्त्यात येणार नाहीत. नीट आखणी करून येतील; पण केवळ दोन ट्रक करून डोके भडकलेले सैनिक दारूगोळा घेऊन सूड घेण्यासाठी दिल्लीवर आले तर भयंकर हानी होईल. फार मोठे यादवी युद्धपण त्यातून सुरू होईल. त्यातून मध्यंतरी 'इलस्ट्रेटेड

विक्ली' मध्ये लिहिलेल्या जगजीतसिंग अरोरांच्या लेखाप्रमाणे सेनादलात तीस टक्के सरदार आहेत. त्या सर्वांची शस्त्रे काढून घेणे तुम्हाला अजिबात जमणार नाही. अगदी तसे केलेत तरी त्यांच्याकडे आपली अनेक गुपिते आहेत. ती सारी ते शत्रुराष्ट्राकडे देतील. देशाच्या सुरक्षिततेला आणि एकतेला आज भयंकर धोका आहे. आपण खलिस्तानच्या उंबरठ्यावर उभे आहोत!

मात्र आमचा एक मित्र या आमच्या तात्त्विक चर्चेवर भलताच चिडतो. तो म्हणतो, 'देश गेला खड्डयात! इथे चायला आम्हाला दिल्लीत उद्या काय होणारे याची भ्रांत पडलीये! तुम्हाला देश सुचतोय! तुम्हाला माहीत आहे, दिल्लीत मोठ्या प्रमाणावर पळापळ सुरू आहे. सायकलरिक्षावाले, झोपडपट्टीवाले, बांधकामात कंत्राटावर काम करणारे लोक मोठ्या प्रमाणावर दिल्ली सोडून चाललेत. गेले दोन दिवस दिल्ली सोडून उत्तरेकडे जाणाऱ्या, इतरत्र जाणाऱ्या, साऱ्या गाड्या नुसत्या दुथडी भरून वाहताहेत. रेल्वेस्थानकावर पाय ठेवायला जागा नाही.' मी म्हणतो, 'रेल्वेगाड्यांत खूप गर्दी झालीय हे मलाही माहीत आहे; पण त्यालाही अनेक कारणे असू शकतात. साधे कारण असे की, गेले चार दिवस गाड्या सुरू नव्हत्या. हे तुंबलेले प्रवासी असतील. त्यातून या लोकांनी फार लूटमार केली आहे आणि घेतलेला माल घेऊन ते पळून जाताहेत, यावर तर माझा अजिबात विश्वास नाही. लोकांची संख्या या शहरात एवढी प्रचंड आहे की, लुटीत त्यांच्या वाट्याला फारच थोडे आले असेल. घरी जाऊन बसून खावे एवढे या सर्वांना कधी काही मिळणारच नाही. यांचे पोट कायमचे हातावर आहे. हे लोक मोठ्या प्रमाणावर बाहेर जात असतील तर त्याला फक्त एक शक्यता आहे. आता दंगल संपलीये. आता पोलिसांचा पुरुषार्थ सुरू होईल! पोलीस पाहिजे त्याला पकडून मारहाण करून त्यांना तुरुंगात ठेवतील. हे लोक पोलिसांइतके देवाला आणि कुणालासुद्धा घाबरत नाहीत. दंगलीला तर हे लोक अजिबात घाबरत नाहीत! अगदी सरदारांनी दंगल केली तरी यांचे काही बिघडणार नाही. त्यातून सरदार दिल्लीत दंगल करतील असे मला अजिबात वाटत नाही.

माझा मित्र माझ्यावर रागावतो. तो म्हणतो, तुला काही माहीत नाही. शरणार्थी शिबिरात हिंडून आतंकवादी 'हिंदू शेर हो गए, बदला लेता है' म्हणून सांगताहेत. त्यामुळेच तर आपण ही आपल्या रक्षणासाठी गस्त घालतोय!' ही गस्त मी गेले काही दिवस सरदारांचा हल्ला होईल या भीतीने घालतोय हे मला प्रथमच समजत होते! आधीच माझ्या डोळ्यांत झोप आणि जागरण दोन्ही दाटून आलीत. मी चिडचिडा बनलोय. मी म्हणतो, 'तसे असेल तर मी उद्यापासून गस्त घालावयास येणार नाही. न वाचलेल्या आणि वाचले असेल तर न समजलेल्या धर्मग्रंथासाठी युद्ध खेळून गाझी होण्याची माझी अजिबात तयारी नाही. माझा उपाय आता सोपा आहे. मी नाटककंपनीमधून दाढीमिशा घरी आणून ठेवतो. सरदार चालून आले तर त्या लावून 'वाह गुरुकी खालसा' म्हणून त्यांचे स्वागत करीन. हिंदू आले तर दाढीमिशा काढून डरकाळ्या फोडत त्यांना सामील होईन!'

माझ्या एका मित्राला मनापासून वाईट वाटते. तो म्हणतो, 'धर्म नावाची सुंदर आवश्यक गोष्ट विसाव्या शतकाच्या अखेरीस या प्राचीन सुसंस्कृत देशात या पातळीवर आणू नकोस; पण तू म्हणतोस ते मला पटते. सरदार संघटितपणे मोठ्या प्रमाणावर प्रतिकार करतील असे मला वाटत नाही. झालेला हल्ला एवढा आकस्मिक आणि भयंकर होता की, त्यातून सावरावयासही त्यांना काही महिने लागतील! त्यातून आपण थोडा जरी प्रतिकार केला तरी चिरडून जाऊ ही भीती आता त्यांच्या मनात कायमची बसली आहे. आतंकवादी, उग्रवादी काही मोठी विघातक कृत्ये करतील; पण सर्वसामान्य शीख त्याला सहानुभूती आहे असेसुद्धा दाखवणार नाही. रस्त्यात तर येणारच नाही. 'अपने गली मे शेर' म्हणून पंजाबमध्ये कदाचित काही तीव्र प्रतिक्रिया होतील; पण सैन्य तेथे असताना तसे होण्याची शक्यता कमी आहे. तेथेही बहुधा आतंकवादीच मोठ्या प्रमाणावर विघातक कृत्ये करतील. पंजाबात एक कोटी सरदार आहेत व सत्तर लाख हिंदू. दहा लाख सरदार परदेशात आहेत. उरलेले तीस लाख सरदार भारतभर पसरलेत. या दंगलीतील आणखी एक अगदी वेगळी गोष्ट लक्षात घे. भारतात कोठेही छोटी-मोठी जातीय दंगल झाली तर त्यात दोन्ही जमाती भाग घेतात. दोन्ही जमाती हात धुऊन घेतात! जामा मसजिदीपासून मालेगावपर्यंत सर्वत्र हे घडते; पण या वेळी सरदारांनी अजिबात संघटित प्रतिकार केलेला नाही. एखाद्याने मिठाई वाटली वा बंदूक उडवली हे खरे आहे; पण झालेल्या दंगलीच्या मानाने या फारच मामुली घटना आहेत. सरदारांनी सामुदायिक प्रतिकार केला नाही, कारण झालेला हल्ला फार मोठा व आकस्मिक होता हे म्हणणे थोड्याफार प्रमाणात खरे आहे; पण माझ्या मते महत्त्वाचे कारण वेगळे आहे. आज भारतातील बहुतेक सर्व सरदार मध्यमवर्गीय सुखवस्तू वा श्रीमंत सुखवस्तू आहेत. म्हणूनच ते घाबरट किंवा डरपोक आहेत. घडणाऱ्या साऱ्या गोष्टींकडे हताशपणे बघत बसतील आणि सहन करतील. हे सारे विसरून हसत हसत उद्याला सामोरे जातील. ते आता गुरुगोविंसिंगचे सरदार उरलेले नाहीत. ते पण लिबलिबीत कणा असलेले मध्यमवर्गीय बनलेत!

माझ्या या मित्राचे म्हणणे मला बरेचसे पटले; पण गस्त संपवून घरी परत आलो तर एक नवीन भानगड उपस्थित होती. डॉ. बलकारसिंगची बायको रडत होती. ते सारे जण गेले सात-आठ दिवस आमच्याकडे राहताहेत. म्हणजे आता कधी तरी माझ्या बायकोचे व हिचे फाटणार आणि वाजणार हे मी आणि बलकार दोघेही ओळखून होतो; पण हे सारे इतक्या लवकर होईल असे दोघांनाही वाटले नव्हते! पण तिच्या रडण्याचे कारण वेगळे आहे. ती म्हणते आता कलकत्त्याहून प्रोफेसर भट्टाचार्यांचा फोन होता. तो आमच्या यंदाच्या अंटार्क्टिका मोहिमेचा नेता आहे. त्याने तुम्हाला २२ नोव्हेंबरला गोव्याला पोचावयास सांगितलंय. सत्तावीस नोव्हेंबरला तुम्ही अंटार्क्टिकासाठी भारत सोडणार. मी म्हटले, 'वहिनी, यात घाबरण्यासारखे आणि रडण्यासारखे काय आहे? अंटार्क्टिका म्हणजे काही भारत नव्हे! तो खूप सुरक्षित आहे! त्यातून तेथे माणसे रहात नाहीत तर पेंग्विनसारखे सर्वांवर प्रेम करीत त्यांचे स्वागत करणारे सुंदर पक्षी राहतात. मी गोव्यात चार-पाच दिवस असणार याचीही काळजी करू नका. सारे धर्म भारतात फक्त तेथे हातात हात घालून आनंदाने राहताहेत. केवळ सभ्यतेवर आणि संस्कृतीवर प्रेम करणारा एवढा सुंदर प्रदेश आज साऱ्या भारतात कोठेच नाही!' पण त्यांच्या

रडण्याचे कारण वेगळेच आहे. त्या म्हणतात, 'एक-दोन दिवसात आम्ही हे घर सोडू. तुम्ही पण निघून जाल. नंतर पुन्हा दंगल झाली तर आम्ही कोणाकडे रहावयास जाणार?' आयुष्याची सर्व चाळीस वर्षे दिल्लीत काढलेल्या आणि भरपूर मित्र असलेल्या या मानसशास्त्रज्ञ बाईसमोर दुसरे कोणतेही सुरक्षित घर येत नाही! मी म्हणतो, 'वहिनी, तुम्ही उगाच घाबरताय. आत्ताही आणखी दोन सरदार कुटुंबे आम्ही कॉलनीत लपवली आहेत. तुम्हाला वा इतर कोणालाच सांगितलेले नाही.' मी त्यांना हे सारे सांगत होतो; पण माझाच माझ्यावर विश्वास नव्हता. परवा तीनऐवजी तीस माणसे घरावर चालून आली असती तर मी यांना घराबाहेर काढलेच नसते याची खात्री मी स्वतःलाच देऊ शकत नव्हतो.

— आम्ही सारेच मध्यमवर्गीय स्वतःवर आणि दुसऱ्यावर विश्वास नसलेले त्रिशंकू आहोत!

## नऊ : आक्रस्ताळेपणा — समजूत

आज बलकारसिंग ऑफिसात आलाय. काल गुरुनानकजयंती होती. शिखांचा हा शहिदी दिवस. काही तरी होणार अशी धास्ती सारेच जण बाळगून होते— अगदी पोलीससुद्धा; पण हा दिवस अगदी शांतपणे पार पडलाय. आणखी काही गोष्टी लक्षात आल्यात. आमच्या अगदी जवळचा, तसा मोकळचावर-उघडयावर असलेला दिल्ली विश्वविद्यालयाचा सारा भाग या दंगलीतून वाचलाय. या विभागातील मोकळयावर असलेले सरदार प्राध्यापकांचे बंगले वाचलेत. राजेंद्रनगरसारख्या काही भागातही दंगल अजिबात झालेली नाही; पण हे अपवाद आहेत. मात्र यांच्यातूनही एक गोष्ट लक्षात येऊ शकते. लोकांनी फार मोठ्या समृद्धीने भरून वाहणारे बंगले लुटलेत आणि जाळलेत. बाजार आणि बाजारपेठा लुटल्यात. त्या लुटल्यावर किंवा लुटताना तेथे जवळपास असलेली सरदारांची घरे लुटलीत; पण रस्ता वाकडा करून सरदारांचे घर म्हणून रस्ता मुद्दाम शोधत ते मध्यमवर्गीय सरदारांच्या वाटेला गेलेले नाहीत! संपत्तीची लूट हा या दंगलीतील एक प्रमुख आणि महत्त्वाचा प्रवाह आहे. झालेली कत्तल हा या दंगलीतील दुसरा प्रवाह आहे. हे खून, ही कत्तल कोणत्या संघटनेने वा गटाने सुरू केली हे नीटसे समजत नाही. सर्वांत प्रथम हे खून 'ऑल इंडिया इन्स्टिटयूट ऑफ मेडिकल सायन्स' समोर सुरू झाले. चिडलेला, प्रक्षुब्ध झालेला, तोल ढळलेला फार मोठा जमाव बाईंना उपचारासाठी तेथे आणल्यावर तेथे जमलेला होता. अमेरिका, पाकिस्तान, ब्रिटन, कॅनडा, भारतात असलेल्या साऱ्याच प्रमुख वकिलातींचे गुप्तहेर वा खबरे त्या वेळी त्या जमावात असणार. 'ऑल इंडिया इन्स्टिटयूट ऑफ मेडिकल सायन्स'मध्ये होणारी प्रत्येक गोष्ट अगदी त्या वेळीही, त्या क्षणी, 'बी. बी. सी.' आणि 'व्हॉइस ऑफ अमेरिकाला' समजत होती. माझ्या देशाने दिलेल्या अधिकृत माहितीप्रमाणे एकतीस तारखेला दुपारी अडीच वाजता माझ्या पंतप्रधानांचे निधन झाले; पण व्हॉइस ऑफ अमेरिकाने दुपारी एक वाजताच माझ्या देशाचे पंतप्रधान मरण पावल्याची बातमी दिली आणि दीड वाजता माझ्या देशाला शोकसंदेश पाठवण्याची प्रेसिडेंट रेगन यांची हिंमत झाली! अगदी त्याच वेळी व्हॉइस ऑफ अमेरिकाने भारतात फार मोठी गडबड होण्याची शक्यता असल्याने अमेरिकन प्रवाशांनी आपली भारतभेट पुढे ढकलावी म्हणून त्यांना विनंती केली आणि भारतात असलेल्या अमेरिकनांनी घरातच बसावे असा त्यांना सल्ला दिला. याच्यानंतर काही तासांनी ऑल इंडिया इन्स्टिटयूट पुढे जमलेल्या जमावातील काही लोकांनी सरदारांना त्यांच्या गाडीतून बाहेर काढून ठेचावयास आणि मारावयास सुरुवात केली. बाकीचे लोक प्रथम बघ्यांसारखे बघत राहिले आणि नंतर नकळत त्यात सामील झाले. हा गट त्यानंतर रिंगरोडवर आला. तेथेही गाडीतून वा ट्रकमधून सरदार बाहेर काढून त्याला जाळणे सुरू झाले. या दंगलीतील पहिला किंवा प्रमुख प्रवाह अजूनही फक्त जाळपोळ आणि लूटमार यातच गुंतलेला होता. या गोष्टीला विरोध करणाऱ्या एखाद्या सरदाराला यांनी ठोकले होते वा मारले होते; पण तो त्यांचा प्रमुख उद्देश नव्हता. रिंगरोडसारख्या प्रमुख रस्त्यावर जे घडत होते ते या लुटालूट करणाऱ्या जमावाला लगेच समजत होते. हे धर्मयुद्ध आहे आणि या भ्याडपणे केलेल्या हल्ल्यामध्ये पुरुषार्थ आहे असे त्या जमावाला वा त्या जमावातील काही लोकांना तरी त्या क्षणी वाटले. त्यानंतर काही वेळाने काही हत्या केल्यावर त्या जमावाच्या डोळयांवर खून चढला. आपण काय करतो आहोत याची अजिबात शुद्ध गमावून बसलेला जमाव त्या वेळी निर्माण झाला. या दंगलीत त्रिलोकपुरी, मोगलपुरी येथे जे झाले तो या दंगलीतील तिसरा आणि सर्वांत भयंकर प्रवाह आहे. आपण ज्याची कल्पनासुद्धा करू शकणार नाही असे काही तरी तेथे घडले. हा सारा कंगाल, बकाल, झोपडपट्ट्यांचा विभाग आहे. येथे जे घडले ते वर्गयुद्ध होते की धर्मयुद्ध होते याची छिनाल चर्चा आपण कोणीच न केलेली बरी! भारतातील कोणत्याही झोपडपट्टीत, कोणत्याही दोन गटात, कोणत्याही कारणाने, कोणत्याही क्षणी, झगडा सुरू झाला आणि त्या वेळी पोलीसयंत्रणा कोसळून पडली वा पोलिसांनी तिकडे संपूर्ण दुर्लक्ष केले तर नेमके हेच घडेल.

या दंगलीमधील हे तिन्ही प्रवाह एखाद्या स्वप्नाप्रमाणे आता संपून गेलेत. सारे कसे शांत शांत आहे. राजधानी दिल्लीची गाडी आता झपाट्याने रुळावर आली आहे; पण तरीही बलकारसिंग हा आज ऑफिसात आलेला एकमेव सरदार आहे. तोसुद्धा कॉलनीत राहतोय म्हणून आलाय. बलकारसिंग दिवसभर बावचळलेल्या किंवा बावरलेल्या मनःस्थितीत आहे. तो फक्त आठ दिवस घराबाहेर पडलेला नाही. आठ दिवसात बाहेरच्या जगाशी आम्ही त्याचा संबंध येऊ दिलेला नाही; पण या आठ दिवसांत त्याच्या भोवतालचे, त्याच्या परिचयातले जग पार बदललंय. त्याचा अगदी 'रिपव्हॅन विंकल' झालाय!

संध्याकाळी घरी परत आल्यावर बलकार मला म्हणतो, "मला ऑफिसात साऱ्या मित्रांशी बोलताना फार थंडगार वाटत होते! बहुतेक साऱ्या मित्रांची सहानुभूती माझ्याबरोबर नाही तर दंगलीबरोबर आहे असे मला वाटले.' मी म्हटले, 'बलकार' कोणी असे काही म्हणाले का?' तो म्हणतो कोणीच असे उघडपणे म्हणाले नाही. पण तुला आठवतंय आज ऑफिसात आपला मित्र डॉक्टर × × ×

त्याच्या डोळ्यांसमोर घडलेली घटना सांगत होता. सरदाराला व त्याच्या मुलाला बाहेर काढून जमावाने चोपले. अर्धमेले होऊन ते रस्त्यात पडले होते. पाण्यासाठी त्यांच्या जिभा बाहेर येऊन वळवळत होत्या. जमावाने त्यांच्याच दुकानातील सॉसची बाटली आणली. आणि हसत-खिदळत त्यांच्या जिभेवर ओतली.' किती अलिप्तपणे त्याने तो प्रसंग तुला आणि मला वर्णन करून सांगितला. मला वाटतंय माझ्या बहुतेक सर्व मित्रांची सहानुभूती दंगलीबरोबर आहे. झाले ते बरेच झाले. सरदार लेकाचे फार माजले होते. त्यांना एकदा कोणी तरी धडा शिकवावयास हवाच होता. थोडया जास्ती प्रमाणात झाले हे खरे.' असे काहीसे माझ्या बहुतेक साऱ्या मित्रांना वाटतंय असे मला अगदी प्रामाणिकपणे वाटतंय.

## सहावे इंद्रिय

मी म्हटले बलकारसिंग, या देशाच्या दुर्दैवाने तुझे म्हणणे बरोबर आहे. पण मला आणखी जे सांगावयाचे आहे ते ऐकून घे. माझ्यावर न रागावता समजावून घेण्याचा प्रयत्न कर. खूप काही गेले दोन वर्षे दररोज घडत होते. भिंद्रनवाले नव्या नव्या 'हिट लिस्ट' बाहेर काढत होता. दोनदा बसमधील उतारूंची निर्घृण भ्याड हत्या झाली होती. मनचंदा, खासदार तिवारी अशा भल्या देशप्रेमी माणसांचे नामर्द खून झाले होते. भिंद्रनवालेचा निषेध करावयाची हिंमत नसलेले धर्मगुरू संतासिंगला सुवर्णमंदिरात प्रवेश देण्यास नकार देत होते. आपण इंदिरा गांधींच्या खुनाचा निषेध केलेला नाही. त्याची निंदा केलेली नाही म्हणून स्वत:ला धर्मगुरु म्हणणारा माणूस निर्लज्जपणे सांगत होता. माझ्या कोणत्याच सरदार मित्राने याचे समर्थन केलेले नव्हते; पण माझ्या साऱ्या सरदार-मित्रांची—अगदी तुझीसुद्धा एक सहानभूती त्या सर्वांच्या बरोबर आहे असे त्या वेळी मला वाटत होते! —होते आहे ते थोडे जास्ती होते आहे पण सरदारांच्यावर होणाऱ्या अन्यायाला उत्तर द्यावयास दुसरा मार्ग नाही असे तुम्हाला वाटतंय, तुमची मूक सहानभूती या सर्वांबरोबर आहे, असे साऱ्या भारतभर सर्वांना वाटत होते.

खरे पाहता या प्रत्येक वेळी भारतात सर्वत्र त्याची काही हिंसक प्रतिक्रिया होणे अगदी सहज होते. या देशातील दुसऱ्या अल्पसंख्यांक जमातीने हे केले असते तर अगदी अटळपणे त्याच्या प्रतिक्रिया सर्वत्र उठल्याही असत्या; पण या प्रत्येक क्षणी एक अस्वस्थ शांतता केरळपासून आसामपर्यंत सर्वत्र बहुजन समाजाला वेढून उरली होती—या घटना घडवून आणणाऱ्या, हा कट करणाऱ्या परकीय शक्तींना हे असे का होते आहे हे समजत नव्हते. या परकीय शक्तींना आपला हा देश कधीच समजला नाही. स्वकीयांचे शंभर अपराध मोजण्याची आणि पोटात घालण्याची या देशाची परंपरा आहे! तो आपल्याला न कळत आपल्या स्वत:मधून पुढे आलेला आपला वारसा आहे, सरदार हे या देशात सर्वांना स्वकीय होते. पण नव्याण्णव अपराध मोजले गेले होते. इंदिराजींची हत्या वा इतर कोणत्याही छोटया मोठया गोष्टीतून हेच महाभारत घडले असते. कारण हा या संस्कृतीला मंजूर नसलेला शंभरावा अपराध होता. उंटाच्या पाठीवर चढवलेली ही शेवटची काडी होती. इतके दिवस मनात साचलेले, साकळलेले, ठसठसणारे बेभानपणे बाहेर पडले. मनात साठवत गेलेली साठवून ठेवलेली वेदना ज्वालामुखीसारखी बाहेर पडते. वेळच्या वेळी क्रियाप्रतिक्रिया अशा खुल्लमखुल्ला गोष्टी झाल्या असत्या तर हे कदाचित टळले असते.

बलकारसिंग म्हणाला, हे केवळ 'लोहारकी एक' असे झालेले नाही, बाकीच्या समाजाने आम्हाला क्षमेची जागा दाखवली आहे. दोन टक्के शिखड्यांनी अल्पसंख्य जमात म्हणून कोपऱ्यात बसावे असे सांगितलंय. १८५७ मध्ये 'बिहार रेजिमेंट' व बिहार यांच्याबाबत जे घडले ते आता आम्हा शीखांच्याबाबत घडणार आहे. १८५७ पर्यंत 'बिहार रेजिमेंट' व बिहारी लोक ब्रिटिशांचे आवडते होते. रणजितसिंगचा पराभव याच शूर बिहारी रेजिमेंटने केला होता. सरकारी नोकऱ्यांत त्यांना मानाचे स्थान होते; पण १८५७ मध्ये 'बिहार रेजिमेंट' स्वातंत्र्ययुद्धात उतरली. फसलेल्या स्वातंत्र्ययुद्धानंतर त्यांची दैना दैना झाली. चांगले सैनिक पुरविणारा हा बिहार एका पिढीत भारतभर फक्त घरगडी पुरवू लागला. बिहार बनला एक कंगाल आणि भिकार प्रांत! आम्ही जर लगेच खलिस्तान मिळवला नाही तर पंजाबचा आता बिहार होईल. आम्हाला मिळणाऱ्या सरकारी व खाजगी नोकऱ्या आता झपाटयाने कमी होतील. सैन्यात आम्हाला फार प्रचंड प्रमाणात असलेले स्थान जाईल. जगजीवनरामबाबूंचा कायदा झपाटयाने अंमलात येईल. दोन टक्के समाजाला सैन्यात जास्तीत जास्त फक्त दोन टक्के नोकऱ्या मिळतील. आमच्या सैन्यातील नोकऱ्या गेल्या तर पंजाबच्या शेतीवर त्याचा फार वाईट परिणाम होईल. तुला आठवते, गेल्या वर्षी पंजाबमधील शेतकऱ्यांचा पाहुणचार घेत त्यांच्या शेतीवर मनमुराद हिंडताना आपणाला एक गोष्ट जाणवली होती. पंजाबी शेतकरी तंत्रज्ञान आणि विज्ञान फार मोठया प्रमाणावर आणि सहजपणे वापरतो आहे. पण हे काही पंजाबच्या कृषिक्रांतीचे प्रमुख कारण नाही. साऱ्या भारताप्रमाणेच पंजाबमध्ये पण शेती हा आतबट्टयाचा व्यापार आहे. तेथेही शेतीत 'उतरत्या नफ्याचा नियम' (Law of diminishing return) थैमान घालतोय. पण या बुडल्या शेतीला सैन्यामधील नोकरीसारखा दुसरा पूरक जोडउद्योग नाही. सैन्यातील नोकऱ्या गेल्या तर पंजाबची कृषिक्रांती कोसळून पडेल.

मी म्हटले, 'बलकारसिंग, तू म्हणतोस तसे घडण्याची शक्यता मी नाकारत नाही; पण अजूनही, अगदी या शेवटच्या निसटत्याक्षणी, तू आणि मी, आपण सर्वांनी थोडा प्रयत्न केला तर ही परिस्थिती वा खलिस्तान या दोन्ही गोष्टी आपण टाळू शकू. हा प्रश्न आणि या प्रश्नांचे उत्तर शोधावयाचे असेल तर आपणाला भारतीय जनतेपासून सुरुवात करावी लागेल आणि सर्वांत भयंकर गोष्ट अशी आहे की, या आपल्या लोकांना आपण कधी आपले मानलेले नाही वा समजावून घेण्याचा प्रयत्न केलेला नाही. या जनतेने पण गेल्या पन्नास वर्षांत महात्मा गांधी सोडून आपल्यापैकी कोणाला त्यांचे मानलेले नाही व समजावून घेतलेले नाही!

मला या देशातून हिंडताना ज्या दोन—तीन गोष्टी जाणवल्या आहेत त्या तुला सांगतो. या देशातील सर्वसामान्य माणसाजवळ आहे तेवढे व्यवहारज्ञान आणि अक्कलहुषारी जगातील इतर कुठल्याच देशातील जनसमुदायाकडे नाही. या आपल्या लोकांची अक्कलहुषारी किंवा 'सहावे इंद्रिय' फार प्रबळ आहे. हे असे आहे त्याला दोन कारणे असू शकतील. हा शेकडो वर्षांच्या अतूट, प्रवाही संस्कृतीने दिलेला वारसा असेल. कदाचित् दुसरीही शक्यता आहे.—ज्याप्रमाणे आंधळया माणसाची इतर ज्ञानेंद्रिये न कळत आपोआप अधिक

तीव्र बनतात त्याप्रमाणे विसाव्या शतकाच्या अखेरीस विज्ञान,साक्षरता या किमान गोष्टींची साधी तोंडओळखही न होता जगावे लागत असल्याने या जनसमुदायाचे हे व्यवहारज्ञान किंवा सहावे ज्ञानेंद्रिय फार तीक्ष्ण झालंय !

मला आणखी एक गोष्ट जाणवली आहे. या साऱ्या जनसमुदायाच्या सुप्त मनात फक्त दोन प्रमुख मानबिंदू आहेत. एक म्हणजे या सर्वांचे एकत्र मोठ्या कुटुंबावर मनापासून प्रेम आहे. ते त्यांना मनापासून आवडते. त्यासाठी त्याग करणारे लोक आवडतात. ते कुटुंब मोडणाऱ्यांचा त्यांना राग येतो. —त्यांच्या धर्मग्रंथात आणि लोककथांमधूनच नव्हे तर आजच्या सिनेमामधूनही अजून हेच लोक नायक आणि खलनायक बनतात.

### फाळणीमुळे प्रश्न सुटत नाहीत

त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे या लोकांचे या देशाच्या एकतेवर, अखंडतेवर खूप प्रेम आहे. या देशात पूर्वीही वेगवेगळी राज्ये होती. राजपुतांचे, मोगलांचे, मराठ्यांचे, टिपूचे, रणजितसिंगाचे; पण खऱ्या अर्थाने अनेक राज्ये असतानाही हा देश अखंड होता.—हे एक वेगळ्या स्वरूपाचे अस्थिर संघराज्य होते. त्यामुळे देशाची पहिली फाळणी गळ्यात मारली गेली तेव्हा काय होतंय, आपण कोणत्या जाळ्यात सापडतोय हे या लोकांच्या लक्षात आलेच नाही; पण गेल्या सदतीस वर्षांत या देशातील सर्वसामान्य जनतेने एक गोष्ट हेरलीये. त्यांचे गेल्या सदतीस वर्षांतील बहुतेक सारे प्रश्न, दुःखे, लढाया, परावलंबन हे सारे या पहिल्या फाळणीतून निर्माण झालेत.

——वाटेल ती किंमत मोजून वा कोणताही धोका स्वीकारून या देशाची फाळणी टाळा असे म्हणणारे सावरकर आणि गांधी येवढे दोघेच बरोबर होते. फाळणीमुळे प्रश्न संपत नाहीत तर ते कल्पना करता येणार नाहीत येवढे वाढतात. आमची आणखी एक फाळणी झाली तर आम्ही आणखी गरीब बनू, अधिक कमकुवत बनू. कायमचे आपापसात भांडून आपले रक्त सांडून बसू. आम्हाला शस्त्रे विकून गबर होणाऱ्या देशांची शस्त्रविक्री मात्र शंभर टक्क्यांनी वाढेल. आमची अगतिकता आणि परावलंबन वाढेल. —— आपण ज्यांना अडाणी, अशिक्षित, अडाणी म्हणतो त्या जनसमुदायाने आपल्या मनाशी हे ओळखलंय !

—या लोकांच्या मनात सारा भारत हासुद्धा त्यांच्या एकत्र कुटुंबासारखा आहे. मोठे एकत्र कुटुंब टिकविण्याचे दोन मार्ग असतात. घरातील एखाद्याचे डोके फिरले, त्याने आक्रस्ताळेपणा केला तर इतरांनी त्या वेळी त्याच्याशी न भांडता त्याला समजावून घ्यावयाचे असते. तीस ऑक्टोबरपर्यंत सारा भारत शिखांबाबत हे करत होता— हे आम्ही अजूनही अधिक काळ अधिक आपुलकीने करावयास हवे होते असे मला वाटते; पण नेते हा प्रश्न अजिबात सोडविणार नाहीत. हा चिघळतच राहणार हे एकतीस ऑक्टोबर या दिवशी या देशातील जनतेला जाणवले किंवा त्यांना मंजूर नसलेला शेवटचा शंभरावा अपराध घडला आणि मग एकत्र मोठे कुटुंब टिकविण्याचा दुसरा एक अघोरी मार्ग असतो. घरातून वेगळे होणार म्हणणाऱ्या सुना या दिल्लीत दर दिवशी सहजपणे जाळल्या जातात ! सासरा, नवरा, सासू, नणंद, दीर या सर्वांकडून मिळून जाळल्या जातात !

माझ्या देशातील माझ्या सर्वसामान्य जनतेचे व्यवहारज्ञान फार चांगले आहे हे मी तुला सांगितले; पण ते व्यवहारज्ञान अठराव्या शतकातील आहे. भावनात्मकदृष्ट्या हे सारे लोक अजून अठराव्या शतकातच आहेत. विसाव्या शतकाशी त्यांची अजून तोंडओळखही झालेली नाही. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात सून जाळून एकत्र कुटुंब टिकवता येणार नाही आणि असले पाशवी अत्याचार करून देशाची दुसरी फाळणी वा खलिस्तान टाळता येणार नाही, हे या लोकांना समजावून देण्यास तू आणि मी अयशस्वी ठरलोय !

आता तरी आम्ही सर्वांनी झालेल्या साऱ्या भयानक गोष्टींबाबत सरदारांची खुलेआम आणि प्रामाणिकपणे अगदी मनापासून माफी मागितली पाहिजे. त्यांचे नुकसान दामदुपटीने दिले पाहिजे, झालेल्या केलेल्या घटनांबाबत काही प्रायश्चित्त भोगले पाहिजे; पण हे करण्याची अजिबात इच्छा आणि कुवत नसलेले नेते आज आपणासमोर आहेत. सारी दिल्ली पेटली होती त्या वेळी नौखालीतून हिंडणाऱ्या गांधीजींची हिंमत असलेला यांच्यात कोणी नाही हे आपणाला माहीत होते. आपल्या कोणाचीही त्यांच्याकडून तशी अजिबात अपेक्षा पण नव्हती; पण त्या वेळी दूरदर्शनवर येऊन लोकांना धीर देण्याची, दिलासा देण्याची, विनंती करण्याची, त्यांचे काळीज हलवणारे आव्हाने करण्याची, कुवत नसलेले भिकार नेते आपणासमोर असतील असे आपणाला वाटले नव्हते. फार उशीरा एक-दोनदा छापील ठोकळ्यासारखी चौकोनी चेहऱ्याने पाच मिनिटांचे भाषण देत राजीव गांधी आणि नरसिंहराव आकाशवाणी आणि दूरदर्शनवर आले. अशी मामुली भाषणे देणाऱ्या मुलाला आपण शाळेच्या वक्तृत्वस्पर्धेतसुद्धा उभा करणार नाही ! अगदी त्याही वेळी त्यांचे भाषण ऐकून काही दिलासा मिळण्याऐवजी आपणाला त्यांचीच कीव आली. कालची गोष्ट घे. खरे पाहता कोणत्याच वृत्तपत्रात ही गोष्ट आलेली नाही; पण या घटनेच्या खरेपणाबाबत तुझ्या आणि माझ्या मनात संदेह नाही. कारण त्यावेळी आपला मित्र राकेश तेथे उपस्थित होता. संध्याकाळी सहा वाजायची वेळ. माननीय श्री. भगत गांधीनगरातील गुरुद्वारामध्ये गेले होते. ते या विभागातून खासदार बनलेत. या विभागात आता हा एकच गुरुद्वारा उरलाय. गुरुनानकजयंती असताना त्यांनी तेथे जाणेही योग्य आहे. चिडलेल्या एका मुलाने आपला भाऊ या दंगलीत मारला गेलाय म्हणून त्यांना सांगितले. ते सहजपणे म्हणाले, 'तू हे आवेदनपत्र भरले की, तुला त्यासाठी दहा हजार रुपये मिळतील !' ही काय माणसाने माणसाची समजूत घालण्याची पद्धत आहे ? चिडलेल्या त्या मुलाने सारे पोलीस तेथे उपस्थित असताना भगतांच्या गाडीची काच फोडली ! अशा या दिवसात फक्त पाच मिनिटे दूरदर्शनवर आलेले वसंत साठे आपणा सर्वांच्या काळजाला हात घालून गेले. हिंदूंना, सरदारांना, सुशिक्षितांना, अशिक्षितांना ते पटून गेलेत. मनात घर करून गेलेत. त्यांनी सांगितले होते, 'ये तो साजीश थी दुश्मनों की जिसमें आप फस गये है, वो लोग तो खाली यही चाहते थे !' आपल्याला भेटणारा प्रत्येक जण त्यांच्याच त्या विधानाची आणि कळकळीची तारीफ करतोय. बलकार, आपणाला न कळत आपण फार अक्कलहुशारीने लावलेल्या एका जाळ्यात अडकलोय.

आपण जाळ्यात अडकलोय. आपली आता शिकार होणार आहे; पण ही शिकार होण्यापूर्वीचे काही तडफडते, निसटते, शेवटचे क्षण

आपल्या हातात आहे. अजूनही आपण काही करू शकतो. या असल्या पाशवी अत्याचारामुळे खलिस्तान टाळता येणार नाही. या असल्या प्रकारामुळे अपरिहार्य आणि अटळपणे आपण खलिस्तानच्या जवळ जाऊ. खलिस्तान टाळावयाचे असेल तर सरदारांना समजावून घेऊन त्यांना या घडीला सहन करून त्यांच्यावर खूप खूप प्रेम केलं पाहिजे हे मी ओळखले पाहिजे; इतरांना समजावून दिले पाहिजे; पण बलकारसिंग, आता तुलाही काही गोष्टी कराव्या लागतील. या देशातील जनतेला सरदार अजूनही आपले वाटतात. तीन-चार वर्षांपूर्वीपर्यंत तर साऱ्या भारतभर साऱ्या लोकांना, चेष्टा करावयास आणि प्रेम करावयास सरदारांच्याइतके इतर कोणत्याच प्रांतातले लोक जवळचे वाटत नसत ! सरदारांच्या उमदेपणाबद्दल आणि शौर्याबद्दल सर्वसामान्य माणसांच्या मनात अजूनही प्रेम आहे. तुम्ही मागत आहात ते सारे हा देश तुम्हाला देणार आहे; पण तुमच्या मागण्या दुरूनही, अप्रत्यक्षपणेही, खलिस्तानच्या मागणीशी जोडलेल्या आहेत असे या देशातील लोकांना वाटता कामा नये. तुम्हाला खलिस्तान नको होता; पण तुम्हाला तो हवा आहे, अशी या देशातील जनतेची समजूत करून देण्यात आली होती आणि या देशातील सर्वसामान्य जनतेने एक गोष्ट नक्की ठरवलेली आहे. या देशाची दुसरी फाळणी त्यांना मंजूर नाही, त्यासाठी सैन्याचे बंड मोडून काढावे लागले, फार मोठे प्रदीर्घ यादवीयुद्ध खेळावे लागले तरी त्यासाठी त्यांची तयारी आहे. कारण फाळणी टाळण्यासाठी पत्करलेला कोणताही धोका, मोजलेली कोणतीही किंमत कमीच असते हे त्यांना समजलंय. फाळणीमुळे प्रश्न सुटत नाही तर अधिक वाढतात, कधीच सोडवता येणार नाहीत इतके वाढतात हे त्यांनी अनुभवलंय. तुमच्या मागण्या खलिस्तानशी अजिबात संबंधित नाहीत हे तुम्ही आम्हाला पटवून देणे आणि आम्ही ते समजावून घेऊन तुम्हाला झुकते माप देत तुमच्या मागण्या मंजूर करणे हे या क्षणी फार जरुरीचे आहे !'

## दहा : मनावर ओरबाडलेले भेसूर चित्र

माझे आणि बलकारचे फार मोठे भांडणच व्हावयाचे; पण गोगी किंवा गौरव याच्यामुळे ते टळलंय. गेली सहा वर्षे माझी आणि बलकारची मते एकमेकांशी शंभर टक्के जुळत होती— म्हणून तर आम्ही जवळचे मित्र होतो ! पण या वेळी मी जे सांगितले होते त्यातील एकही शब्द त्याला पटला नव्हता. कदाचित तो म्हणतो तसा मी झोपेत किंवा तापात बरळत असेन किंवा झालेल्या घटनांमुळे बलकार कोलमडून पडलेला असेल. काहीही ऐकून घेण्याची, समजून घेण्याची, विचार करण्याची त्याची कुवत संपूर्णपणे संपलेली असेल—पण त्यामुळे त्याच्यावर प्रेम करत, अधिक प्रेम करत त्याला समजावून घेण्याची माझी जबाबदारी वाढलेली आहे.

बलकार म्हणतो ते खरे असेल. मी सांगितली तो या प्रश्नाची फक्त एक बाजू असेल. या घडलेल्या साऱ्या घटनांना आणखीही काही चेहरे असतील. किडलेली, सडलेली जिवत माणसे आज थव्याने आपणाभोवती घोंगावत आहेत आणि उडदामाजी काळेगोरे म्हणत आपणही त्यांच्यापैकीच एक आहोत. त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे आपण स्वत:साठी म्हणून जे जीवन जगतो, उपभोगतो त्याचा अपरिहार्य परिणाम किंवा त्याची किंमत म्हणून ही माणसे तयार होताहेत. आपल्याला वर्णनही करता येणार नाही एवढी विषमता आज या देशात आहे. झोपडपट्टीमधून हिंडताना माझे घर मला राष्ट्रपतिभवनापेक्षा अधिक अलिशान आहे असे वाटते आणि एखाद्या उद्योगपतीच्या घरी गेलो तर माझे घर मला झोपडपट्टीपेक्षा अधिक भिकार वाटते. कपड्यांना इस्त्री नसेल तर माझी मुलगी शाळेत जात नाही, तरीही माझी मुलगी साध्या शाळेत जाते म्हणून तिच्याशी न बोलणाऱ्या मुली आहेत आणि या देशातील बहुसंख्य मुलांना मात्र कोणतीच शाळा कधी पहावयास मिळत नाही— ही असमानता आणि किडलेले सडलेले आपण यातून या देशात मिळेल त्या प्रसंगामधून अशा घटना वारंवार घडणार आहेत.

झोपडपट्टीत राहणारी माणसे, गटारातील पाणी पिणारी मुले, कुंटणखान्यात लोटल्या जाणाऱ्या निष्पाप कोवळ्या पोरी या सर्वांना पाहताना माझ्या मनात कवितेच्या दोन ओळी दाटून येत. गेल्या काही दिवसांत माझ्या मनातून त्या ओळी हरवल्या होत्या. माझ्या मनात आता फक्त वडिलांच्या दुकानाचे रक्षण करीत शहीद झालेली ती छोटी मुलगी आहे. माझ्याच मुलीच्या वयाची. दूर कोपऱ्यात हिजड्याहून अगतिकपणे मी उभा आहे. मरेपर्यंत माझ्या मनावर ओरबाडलेले हे चित्र पुसता येणार नाही. माझ्यासाठी पेटवलेल्या चितेतूनसुद्धा न जळता ते चित्र कदाचित माझ्याबरोबर माझ्यापुढील अज्ञात प्रवासात माझ्या गाठीला असेल !

— पण आत्ता या क्षणी मात्र माझ्यासमोर पेटलेली गोगीची चिता आहे. आम्ही तीन चार जणांनी त्याला भडाग्नी दिलाय. चेहरा एवढा विद्रूप झालाय की हा गोगी आहे हे ओळखताच येत नाही. त्यामुळे कदाचित हा गोगी नसेल असा मनाला एक दिलासा आहे. — पण गोगीच्याच वयाच्या कोण्या एका निष्पाप मुलाचा हा देह आहे— आणखी अशीच तीन—चार विद्रूप भेसूर प्रेते जळताहेत. मी आणि बलकारसिंग स्तब्धपणे उभे आहोत— एकमेकांचा आधार शोधीत पुन्हा एकदा नकळत आम्ही एकमेकांच्या खांद्यांवर हात ठेवलाय ! त्या चिता आता भडकून पेटल्यात; अक्राळ-विक्राळ ज्वाला उठल्यात; पण माझ्या डोळ्यांसमोर मात्र लख्ख अंधार आहे. त्या अंधारात मला आधार देणाऱ्या त्या दोन ओळी मला अचानक सापडल्यात. त्या पेटलेल्या प्रेतांच्याकडे पहात, त्या भयाण अंधारात, त्या चितांना श्रद्धांजली वाहिल्याप्रमाणे मी त्या ओळी अगदी सावकाश म्हणतो.

'... तुमचा गुन्हा एवढाच की, तुम्ही या देशात जन्मलात त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे
आम्ही या देशात जिवंत असताना जन्मलात !'

**स मा प्त**

# कादंबरीची जन्मकथा

पुण्याच्या महाराष्ट्र साहित्य परिषदेने आयोजित केलेल्या शारदीय व्याख्यानमालेत शनिवार दिनांक १० नोव्हेंबर ते गुरुवार दिनांक २२ नोव्हेंबरपर्यंत 'कादंबरीची जन्मकथा' या विषयावर दहा कादादंबरीकारांची व्याख्याने झाली. पडघवली, ओंकार व महानगर या कादंबऱ्यांविषयी अनुक्रमे गो. नी. दांडेकर, भीमराव कुलकर्णी व रमेश मंत्री यांची व्याख्याने झाली. त्याचा वृतांत मागील अंकात दिला होता. या अंकात जोत्स्ना देवधर, वि. ग. कानिटकर व ना. सं. इनामदार यांच्या व्याख्यानांचा वृतांत दिला आहे. पुढील अंकात श्री. ज. जोशी, आनंद यादव, अरुण साधू व ह. मो मराठे यांच्या व्याख्यानांविषयी...

मंगला गोडबोले)

## घर गंगेच्या काठी – सहज अंकुरलेली

या व्याख्यानमालेत ज्योत्स्ना देवधर या एकाच लेखिकेचा समावेश केलेला होता. साहजिकच १५–११–८४ रोजी 'घरगंगेच्या काठी' या आपल्या कादंबरीची जन्मकथा सांगण्यासाठी त्या आल्या त्या वेळी श्रोत्यांनी गर्दी केलेली होती. आजवर त्यांच्या खात्यावर १५–१६ कादंबऱ्या आणि एकूण २५-३० पुस्तकं जमा असली तरी साहित्यक्षेत्रातली ही मुलुखगिरी सुकर केली ती याच कादंबरीनं. १९६७ मध्ये प्रसिद्ध झालेल्या या कादंबरीच्या चार आवृत्त्या निघाल्या. महाराष्ट्र सरकारचा ह. ना. आपटे पुरस्कार मिळाला. कर्नाटक, शिवाजी व पुणे विद्यापीठात ती अभ्यासक्रमात नेमली गेली व असंख्य वाचकांनी तिच्यावर अतोनात प्रेम केलं. प्रत्यक्ष ती लिहीत असताना ज्योत्स्नाबाईंना तिच्या कलास्वरूपाचा, भवितव्याचा नेमका अंदाज नव्हता, मराठी लेखनाचा सराव नव्हता, मराठी साहित्याची पार्श्वभूमीही फारशी परिचित नव्हती. हिंदी साहित्य–साहित्यिक यांची जवळून ओळख होती व हिंदीत थोडंफार लेखनही त्या करत होत्या. जैनेंद्र जैन या आपल्या आवडत्या लेखकाची 'त्यागपत्र' ही कादंबरी बी. ए. च्या परीक्षेसाठी वाचत असताना त्या फार प्रभावित झाल्या होत्या. त्या प्रभावामुळे घरगंगेचं पहिलं शीर्षकही त्यांनी 'मृत्युपत्र' असंच योजलेलं होतं. म्हातारपणी पुरुष मृत्युपत्र करतो; पण बाईच्या खात्यावर मात्र, आयुष्यभर सतत राबराबूनही काहीही शिल्लक नसते, देण्यासाठी काहीही बाकी नसतं हे एका प्रसंगातून जेव्हा जाणवलं तेव्हाच या कादंबरीचं बीज पडलं. नवऱ्यानं देह, मुलांनी कूस आणि कुटुंबानं मन–स्वभाव –वृत्ती यांचा इतका कबजा घेतलेला असतो की, स्वतःचं म्हणण्याजोगं त्या बाईजवळ काहीच राहिलेलं नसतं. म्हणून तर कादंबरीची नायिका जानकी सुरुवातीलाच सांगते की, फोलपटांचा ढीग साचलाहे तरी पातेल्यात दाणे काहीच नाहीत अशी एका अर्थानं माझी अवस्था आहे. एकत्र कुटुंबपद्धतीच्या पार्श्वभूमीवर, सर्वेसर्वा मोठा दीर गंगाधरभावजी, आयुष्यभर मूकपणे त्याचा जाच सोसणारी मोठी जाऊ, कणा नसलेला नवरा आणि जिवापाड प्रेम करणारा धाकटा दीर या सर्व नात्यांची ओझी ती वाहात असते आणि अखेरीस थकून–झिजून गेल्यावर जे निवेदन करते ती ही कादंबरी. एकत्र कुटुंबपद्धती हा आजही ज्योत्स्नाबाईंच्या जिव्हाळ्याचा, चिंतनाचा विषय आहे. कारण संस्कारक्षम वयामधली त्यांची सगळी जडणघडण याच संस्थेनं केली आहे. मारवाडामध्ये बालपण गेल्याने स्त्रीजन्माची अनास्था, उपेक्षा त्या सतत बघत होत्याच. तिथे मुलगी जन्मली तर 'भाटो हुवो' दगड झाला असं म्हणत. तिथे लहान वयात मुलींची लग्न होत. शाळेत गेल्याच तरी नोकराच्या रूपातसुद्धा पुरुष दृष्टीला पडत नसे आणि अशा या मुली पोरवयात सासरी एकत्र कुटुंबात पडल्या की, बहुतेक नाती त्यांची कुचंबणा करणारीच असत. अशा कुचंबलेल्या, विधवा परित्यक्ता, सोशिक स्त्रिया ज्योत्स्नाबाईंनी अगणित पाहिल्या. त्यात भर पडली ती हिंदी–बंगाली साहित्यामधल्या स्त्रीप्रतिमेची. दीरभावजयीच्या नात्याची ओढ मनात होतीच. त्यात बंगाली साहित्यातले हळवे, भावविवश नायक आणि बंडखोर, मनस्वी स्त्रिया यांचा प्रभाव पडला आणि जानकीची व्यक्तिरेखा जन्माला आली.

या कादंबरीची भाषा हे तिचं बलस्थान आहे असा अभिप्राय जाणत्यांनी दिलेला आहे. प्रभाकर पाध्यांसारख्या साक्षेपी टीकाकारानं 'केसरी' मध्ये स्वतंत्र लेख लिहून तिचा गौरव केला होता. यासाठी आपण जाणीवपूर्वक काही प्रयत्न केले असं आज ज्योत्स्नाबाईंना वाटत नाही. कुंवारभूमीवर पडलेलं बी फोफावतं तसाच काहीसा प्रकार आपल्याबाबतीत घडला असावा. कुठलाही आविर्भाव नसल्याने, जाणीव नसल्याने, त्या त्या पात्रांचे सहजोद्गार म्हणून तशी भाषा येत गेली असावी असं त्या म्हणाल्या. स्त्रीजीवनाशी इतकी समरसता आली की, सगळी भाषा, प्रतिमासृष्टी, शब्दकळा अगदी घरगुती होऊन गेली. साजूक तूप, केशरी शिरा, प्रसाद, खिरापत, समई, निरांजन, भरलेली घागर तळाशी जावी तसं यशोदावहिनींचं मरण किंवा दळतादळता जात्याचा दांडा हाती यावा तसं वाटणं यासारख्या कल्पना कादंबरीभर जागोजाग आढळतात त्या यामुळेच. आज हीच कादंबरी लिहिली तर ही प्रतिमासृष्टी, धार्मिक वातावरण, एकत्र कुटुंबाचा पगडा कदाचित राहणार नाही; पण त्यामुळे कादंबरीला जो एक निखळपणा, ताजेपणा, कोवळीक आलेली होती तीही नाहीशी होईल. या दृष्टीनंच कादंबरीच्या इतक्या आवृत्त्या निघाल्या तरी फेरफार करावेसे ज्योत्स्नाबाईंना वाटले नाहीत.

अर्थात कादंबरीत काहीच उणीवा नसतील असा त्यांचा दावा नाही. रेडियोच्या संस्काराचा, त्यामुळे अनेक धुरंधर कवी, लेखकांच्या सान्निध्यात आल्याचा त्यांनी कृतज्ञतापूर्वक उल्लेख केला; पण रेडियोच्या सवयीमुळेच एखाद्या श्रुतिकेमधल्याप्रमाणे प्रत्येक वेळी प्रत्येक पात्रानं दुसऱ्याला विशेषनामानं हाक मारण्याचा प्रकार कादंबरीत

आला. पायाला हात लावून नमस्कार करण्यासारखा अमराठी, खरं तर हिंदी प्रकार हिंदी साहित्याच्या संस्कारातून आला. रेडियोसाठी स्मृतिचित्रे, 'पण लक्षात कोण' घेतो इत्यादी कादंबऱ्यांची नाट्यरूपं सादर केल्याने चित्रदर्शी भाषा आली असे अनेकांचे अनेक संस्कार घेत कादंबरी आकाराला आली. त्या वर्षी तरुणभारतच्या दिवाळी अंकात ती प्रसिद्ध करण्याचं ठरलं म्हणून 'मृत्युपत्र' हे शीर्षक बदलून 'घरगंगेच्या काठी' हे शीर्षक आलं. अनेकांना या कादंबरीनं आनंद दिला. ज्योत्स्नाबाईंच्या मते त्यांना या कादंबरीनं एकच अमूल्य गोष्ट दिली. ती म्हणजे आपण लेखक असल्याचा शोध त्यांचा या कादंबरीने लागला आणि लेखनाची कायमची सोबत त्यांच्या आयुष्याला राहिली.

## धर्मांतराचा शोध 'होरपळ'

१६ नोव्हेंबरला वि. ग. कानिटकर यांचं त्यांच्या 'होरपळ' या कादंबरीवर व्याख्यान झालं. १९७१ मध्ये प्रसिद्ध झालेली ही कादंबरी धर्मानुभवावर आधारित होती. देशप्रेम आणि धर्मप्रेम यांच्या संघर्षातून माणसाच्या वाट्याला कशा प्रकारची होरपळ येते हे या कादंबरीत दाखवलेलं आहे. केवळ धर्मसंघर्षावर भर देण्याचा लेखकाचा प्रयत्न नाही. कारण आपला हिंदूधर्माचा अनभ्यास अनधिकार त्यांना जाणवलेला आहे. तरीही अशा प्रकारच्या विषयाला हात घालण्याची प्रेरणा त्यांना झाली ती एका अपघातानेच. ६५–६६ सालच्या सुमारास एक छोटे पुस्तक त्यांच्या हाती लागलं. गार्डनर नावाच्या एका मिशनऱ्याने नीलकंठ शिवराम गोऱ्हे नावाच्या एका कोकणस्थ ब्राह्मणाच्या धर्मांतराविषयीचा वृत्तांत त्यात लिहिला होता. हा माणूस मूळचा काशीचा, याचे वडील उपजीविकेसाठी धर्मकृत्य करणारे, हाही अठराव्या वर्षापर्यंत व्युत्पन्न ब्राह्मण झालेला, शैव आणि वैष्णवांचा संघर्ष वृथा आहे हे जाणलेला, स्वतःचं नाव नीळकंठ असून पत्नीचं लक्ष्मी ठेवणारा. याच्या कानी अँग्लिकन चर्चच्या मिशनऱ्यांचे धर्मसंवाद पडतात. दीडदोन वर्ष हिंदूधर्म व ख्रिश्चन धर्म यांची तुलना त्याच्या मनात होत (आणि मिशनऱ्यांशी त्याने घातलेल्या वादात) राहाते आणि कळत-नकळत तो हिंदु धर्मापासून दूर जातो. ईश्वराप्रत जाण्याचा सोपा मार्ग म्हणजे ख्रिश्चन धर्म असं त्याला वाटू लागतं. घर सोडून बनारस मिशनमध्ये, पुढे जोनपूर मिशनमध्ये जातो व अखेरीस १८४८ मध्ये तो बाप्तिस्मा घेऊन 'नेहेमिया' होतो. जेरुसलेमची राखरांगोळी झाली असताना याच नावाच्या ख्रिस्ती संतानं ते पुन्हा वसवलं होतं. हे धर्मांतर सामाजिक जाणिवेपोटी झालेलं नसतं तर ख्रिश्चन धर्म कमी गुंतागुंतीचा, जास्त तर्कशुद्ध वाटल्याने झालेलं असतं. अशा प्रकारे वयाच्या २३ व्या वर्षी १८४८ मध्ये, स्वेच्छेनं ख्रिश्चन झालेला नेहेमिया नीळकंठशास्त्री गोरे पुढे स्वतःची पत्नी अत्यवस्थ असताना, तिला प्रभूच्या पायाशी जाता यावं म्हणूनच केवळ तिचा बाप्तिस्मा करवतो व त्यानंतर अवघ्या २४ तासात ती मृत्यू पावते. त्या वेळी त्याला प्रश्न पडतो, प्रेताला धर्म असतो का? अवघ्या २४ तासांसाठी तिला ख्रिस्ती करून आपण काय मिळवले? यानंतर तो इंग्लंडला जातो. तिकडलं ख्रिश्चन धर्माचं भ्रष्ट स्वरूप पाहून तो अस्वस्थ होतो. त्याच्या मनातला धर्मसंघर्ष वाढतो. १८५७ च्या बंडात आणखी एक धक्का बसतो. ख्रिस्ताच्या हौतात्म्याची स्तोत्रे गाणारे इंग्रज मिशनरी बनारसमध्ये मोठ्या संख्येनं असतात; पण जिवाच्या भीतीने ते नेटिव्ह ख्रिश्चनांना टाळून पळून जातात व मागे राहिलेल्या नेहेमियाच्या मात्र मनातला गोंधळ वाढतो. ज्या धर्मासाठी आपण लोकापवाद सोसून आपल्या समाजापासून तुटलो तोच धर्म दुसऱ्या समाजातही आपल्याला अर्धांतरीच ठेवून गेला. 'नेहेमियांच्या मनातले काही कोसळले होते, जळत होते, धुमसत होते.' हे कादंबरीच्या अखेरचं वाक्य याच परिस्थितीचं चित्रण करणारे आहे. १८५७ पाशी कादंबरीचा विषय संपतो आहे.

अर्थात या ग्रंथगत सत्यावरून ललितकृतीच्या सत्याची उभारणी करताना कानिटकरांना गोऱ्हेशास्त्रीचं उत्तरआयुष्य समजून घेणं अगत्याचं वाटलं. त्यांच्या पुढच्या जीवनातही हा धर्मसंभ्रम वेळोवेळी दिसतो, तरीही पंडिता रमाबाईंचा येशूविषयीचा संशय त्याने दूर केला आयुष्याच्या अखेरीस [मरणभयाने त्याला ग्रासले व एकूणच संशयात जीवन घालवणाऱ्या या प्रज्ञावंतांची अखेरही धर्मविषयक अनिश्चिततेच झाली. अर्थात कानिटकर चरित्र लिहिणार नव्हते. कादंबरीची कल्पना पक्की होती. त्यामुळे नेहेमियाची मध्यवर्ती व्यक्तिरेखा वास्तवावरतीच ठेवून इतर प्रातिनिधिक काल्पनिक व्यक्तिरेखा त्यांना उभ्या कराव्या लागल्या. त्यासाठी नेहेमियाच्या १८५७ नंतरच्या आयुष्याची, तसेच आजपर्यंतच्या आपल्या सामाजिक, धार्मिक इतिहासाची ओळख त्यांना उपयोगी पडली. आजच्या वाचकाच्या दृष्टीनेही या मधल्या काळाचा दुवा जोडणं जरुरीचं होतं. नेहेमियांच्या अगदी विरुद्ध प्रवृत्तीचा वामन थत्ते, मैना बटकी, धर्मांतरित बेंझी, ब्राह्मो समाजवादी निरादबाबू या व्यक्तिरेखा अशाच आकाराला येत गेल्या. वातावरणनिर्मितीसाठी १८५७ च्या बंडाच्या पार्श्वभूमीचा अभ्यास केला गेला. धर्मविषयक विचारचिंतनासाठी बायबल, जुना करार, नवा करार, गीतारहस्य वगैरे वाचावं लागलं.

अर्थात या दीर्घ अभ्यासानंतरही कादंबरी निर्दोष उतरली आहे असा कानिटकरांचा दावा नाही. देशप्रेम की धर्मप्रेम या संघर्षात देशप्रेमाची बाजू फारशी रंगवली गेली नाही असा एक आक्षेप या कादंबरीवर घेतला गेला. वामनचं पात्र अवास्तव महत्त्व मिळवून जातं असं काहींना वाटलं. नेहेमियांना फारच संतसदृश केलं आहे असाही आक्षेप काही गटाकडून झाला; पण त्याबाबतीत आपण जाणीवपूर्वक संयम पाळला होता, असं कानिटकर म्हणतात. १८५७ नंतरचं नेहेमियांचं जीवनही नाट्यपूर्णच आहे; पण ललितकृती लिहिताना हेतूपूर्ण निवड करावी लागते. तशी करून, त्यांच्या उत्तर आयुष्यातल्या वृत्तीप्रवृत्तींचा उपयोग करून घेऊन पूर्वायुष्यावरच लक्ष केंद्रित करण्याचं त्यांनी ठरवलं व त्यातून नीळकंठशास्त्री गोऱ्हे या दुःखी प्रज्ञावंताची धर्मविषयक होरपळ चित्रित करणारी ही कादंबरी जन्माला आली.

'होरपळ' ही कादंबरी केवळ करमणुकीसाठी वाचून सोडून देण्याची कादंबरी नाही. तिची आशयघनता या व्याख्यानामुळे विशेषच जाणवून गेली. ज्यांनी ही कादंबरी

वाचली नसेल त्यांना वाचनाला प्रवृत्त करणारं आणि ज्यांनी एकदा वाचली असेल त्यांना या नव्या जाणिवांसकट पुन्हा वाचण्याची प्रेरणा देणारं असंच हे व्याख्यान झालं. धर्माविषयीचे आपले समज-गैरसमज आपली सगळी धर्मकल्पनाच या प्रकाशात तपासून बघायला हवी असं वाटलं.

## प्रतिमेच्या शोधातून मंत्रावेगळा

झेप, झुंज, मंत्रावेगळा, राऊ, शहेनशहा आणि शिकस्त या सहा कादंबऱ्या लिहून ना. सं. इनामदार यांनी मराठी इतिहासप्रेमी वाचकांच्या मनात स्वतंत्र स्थान मिळवलं आहे. यापैकी 'मंत्रावेगळा' या कादंबरीवर १७ नोव्हेंबर रोजी त्यांचं व्याख्यान झालं. इतिहास जुनाट असतो, त्याचं वाचन-चिंतन-मनन हा कालापव्यय आहे. या प्रचलित कल्पनेचा त्यांनी सुरुवातीलाच समाचार घेतला. अशा शिळ्या कढीला ऊत आणण्यापेक्षा समकालीन समस्या हाताळाव्यात असं म्हणणं म्हणजे इतिहासाचा अनादर करण्यासारखं आहे. कारण एक तर भूतकाल आणि वर्तमानकाळ यात एकच एक सीमारेषा दाखवणं अवघड आहे. त्यामुळे अमुक ठिकाणी इतिहास संपला, म्हणून त्या घटनांचं महत्त्वही संपलं असं म्हणता येणार नाही. दुसरी याहून महत्त्वाची गोष्ट म्हणजे मूलभूत मानवी समस्या सार्वकालिक असतात. माणसांचे चेहरे बदलले, देशकालपरिस्थितीचा संदर्भ बदलला तरीही प्रश्न निर्माण करणाऱ्या आणि ते सोडवणाऱ्या मानवी प्रवृत्ती एकच असतात. या दृष्टीने नारायणराव पेशव्यांचा त्यांच्याच गारद्यांकडून झालेला वध आणि त्यानंतर उसळलेला लोकक्षोभ आणि अगदी अलीकडे या देशाच्या पंतप्रधानांची त्यांच्याच 'गार्ड' कडून झालेली हत्या व त्यानंतर निर्माण झालेली अस्थिरता यांची तुलना करून बघण्याजोगी आहे. रुक्ष, तर्ककर्कश इतिहासतज्ज्ञापेक्षा सहृदय लेखकाच्या दृष्टीने इतिहासाचा परामर्श घ्यावा अशी प्रेरणा इनामदारांनी घेतली. बाजीरावाची जनसामान्यांच्या मनातली प्रतिमा भित्रा, पळपुटा, नादान, विलासी, चैनी, राज्यबुडव्या माणसाची आहे. बाजीरावानं स्वराज्याचं उदक टोपीकरांच्या हाती सोडलं हे तर खरंच; पण ही कृती क्षणिक उद्रेकापोटी होणं शक्य नाही. त्यामागचा तपशील अभ्यासला पाहिजे हे ध्यानात आलं. दुर्दैवाने आपल्याकडे इतिहासाचे अस्सल कागदपत्र फारच कमी आहेत. ३०,००० रुमाल उपलब्ध असले तरी १५० वर्षांच्या राज्याचा हा इतिहास अत्यल्पच म्हटला पाहिजे व त्याचाही अभ्यास पुरेसा झालेला नाही. उदाहरणादाखल इनामदारांनी बाजीरावाच्या सांकेतिक लिपीचा उल्लेख केला. बाजीरावाने सांकेतिक लिपीत लिहून ठेवलेल्या मजकुराचा अर्थ लागत नव्हता. अगदी रियासतकार सरदेसाईंपासून अनेक दिग्गज इतिहासतज्ज्ञांनी त्यापुढे शरणागती पत्करली किंवा हा काही तरी अशिष्ट व्यवहारासंबंधीचा मजकूर असावा असा दुराग्रह करून त्याच्याकडे दुर्लक्ष केलं. सुदैवानं या सांकेतिक लिपीची कळ इनामदारांना अचूक सापडली आणि मजकुराचा अर्थ लागला. इंग्रजांशी संघर्ष अटळ आहे हे जाणवल्यावर लढाईची तयारी करण्याच्या दृष्टीने दिलेल्या सूचना त्या मजकुरात होत्या. म्हणजे आजच्या भाषेत टॉप मिलिटरी सीक्रेटस् होती. अशा प्रकारे लढाईची तयारी करू बघणारा पेशवा बेजबाबदारपणे राज्य घालवेल कसा? असा विचार करताना, आनुषंगिक कागदपत्र वाचताना त्याची जी प्रतिमा इनामदारांच्या मनात आकारत गेली तिचं ललितरूप म्हणजे ही कादंबरी.

१८५१ मध्ये बाजीराव ब्रह्मावर्ती मरण पावले. त्याआधी चार वर्षे 'शतपत्रे' सुरू झालेली होती. लोकहितवादींसारखा ज्ञानी, विचारवंत, समाजशास्त्रज्ञही पेशवाई बुडण्याचा सर्व ठपका बाजीरावावर ठेवतो, बालविवाह-विधवांचा छळ-छापखाने नसणं-ग्रंथांचा अभाव अशी कारणं देतो, याचा अर्थ लावणं कठीण होतं. म्हणून 'मंत्रावेगळा'-मध्ये बाजीरावाची व गोपाळराव हरी देशमुखांची एक काल्पनिक भेट त्यांनी रंगवली व राज्य मिळवणं-टिकवणं-घालवणं यासारखा राज्यव्यवहार समजण्याची तेव्हाच्या लेखक-संपादकांची कुवतच नव्हती असं त्यांच्या संवादामधून दाखवलं. अशा प्रकारे ऐतिहासिक सत्याला पूरक ठरतील असे काल्पनिक प्रसंग ऐतिहासिक कादंबरीकाराला लिहावे लागतात ते खरोखरच तसे घडले का हा प्रश्न अप्रस्तुत असतो असं त्यांचं म्हणणं आहे.

३ जून १८१८ रोजी बऱ्हाणपूरपासून १० किलोमीटर अंतरावरच्या धूळकोट या गावी बाजीरावानं शरणागती पत्करली. त्या वेळी बाजीरावानं दिलेलं बाणेदार उत्तर माल्कमच्या इंग्रजी इतिहासात नमूद केलेलं आहे. प्रत्यक्ष धूळकोट या गावी जाऊन तो प्रसंग मनःचक्षूंनी पाहण्याचा प्रयत्न इनामदारांनी केला. हा प्रयत्न बरोबर असेल, अचूक असेल असा त्यांचा दावा नाही. कारण सामग्री अपुरी आहे. अथांग समुद्राच्या किनाऱ्यापाशी वाहात येणाऱ्या तुटक्या-मोडक्या फळकुटावरून बुडलेलं जहाज किती बुलंद होतं याचा अंदाज घेण्यासारखाच हा प्रकार होता; पण तो कोणी तरी करणं जरुरीचं होतं. अज्ञानाच्या, गैरसमजुतीच्या अंधःकारातून वाट काढत त्यांच्यामधला ललितलेखक बाजीरावापर्यंत पोहोचण्याची धडपड करीत होता. एका अर्थानं हा बरबादीचा इतिहास! पण तोही इतक्या ऐश्वर्याचा होता की, इनामदार त्यात रंगत गेले. इतिहास 'भोगण्याचा' आनंद त्यांनी किती लुटला असावा हे त्यांच्या त्या दिवशीच्या व्याख्यानावरून सतत जाणवत होतं; पण इतिहासप्रेमाच्या ओघात प्रत्यक्ष ह्या कादंबरीच्या जन्मकथेचा तपशील मागे पडल्यासारखाही वाटत होता. 'मंत्रावेगळा' हे शीर्षक का दिलं हा प्रश्नही एका वाचकालाच अखेरीस विचारावा लागला. 'मी मूळ मंत्रावेगळा तुम्हाकारणे झालो' असं खुद्द बाजीरावानंच इंग्रज अधिकाऱ्याला म्हटलं आहे. तो त्याच्या तोंडचाच शब्द शीर्षकासाठी वापरला असा खुलासा इनामदारांनी केला. प्रत्यक्ष कादंबरीशी संबंधित असे काही इतरही खुलासे व्याख्यानाच्या ओघात राहून गेले असतील की काय अशी शंका घेऊनच श्रोते बाहेर पडले.

## गारांचा पाऊस

**शोभा भागवत**

# न्याय–अन्याय

**ती** बातमी ऐकून पंधरा दिवस होऊन गेले; पण धक्का अजून ओसरलेला नाही.

एका शाळेतल्या पहिलीतल्या मुली. एका मुलीचा वर्गात नेहमी पहिला नंबर यायचा. एक दिवस शाळा सुटल्यावर पाच–सहा मुलींनी या मुलीला घेरलं. दोघींनी हात धरले, दोघींनी पाय धरले, एकीने तोंड दाबून धरलं, एकीनं डोळे झाकले आणि एकीनं वॉटरबॅगमधल्या पाणी पिण्याच्या नळ्या तिच्या नाकात घातल्या. नाकातपण पाणी घातलं. ही मुलगी गुदमरून काळी–निळी झाली होती, तेवढ्यात तिची आई तिथे पोचली. तिनं लगेच तिला डॉक्टरांकडे नेलं. मुलीच्या नाकाच्या पडद्याला दुखापत झाली होती. ती खूप घाबरली होती. आता ती बरी आहे. हे सगळं ऐकून पहिली प्रतिक्रिया होते, 'पहिलीतल्या' मुलींनी हे केलं? 'मुलींनी'? कठीण आहे अगदी!

ह्या मुलीचे पालक लगेच ज्या मुलीला त्रास दिला तिच्या आईला भेटले. त्यांनी मदत केली. मुलींना समजावून दिलं. हवा नाही की, कसं गुदमरायला होतं हे सांगितलं. आता त्या मुलीच्या आईच्या मनात काही राग नाही. लहान मुली आहेत खेळताखेळता हे झालं. कदाचित कुणी तरी डोक्यात भरवलं असेल काहीतरी, असं त्या बोलताना म्हणाल्या.

हे सगळं ठीक असलं तरी माझ्या डोक्यातून हा विषय जायला तयार नाही. ५-६ वर्षांच्या मुलींना हे कुठून सुचलं असा एका मुलीला त्रास देणं? घरात कुणी मोठ्या भावंडानं म्हटलं असेल का की पहिला नंबर येतो काय तिचाच नेहमी? चांगली पिटून काढा एकदा. का अलीकडे मुलं टी. व्ही., चित्रपट पाहतात त्यातल्या मारामाऱ्या, छळ पाहतात त्यामुळे त्यांना असं करणं ही परिचित गोष्ट वाटते? कुठून येतो हा क्रूरपणा?

ह्या घटनेमध्ये आपण पालकांनी विचार करण्याजोग्या अनेक गोष्टी आहेत. दोन गोष्टी मला विशेष महत्त्वाच्या वाटतात. एक म्हणजे वर्गातल्या एकाच मुलीचा नेहमी पहिला नंबर येतो याबद्दल मुलींना जर राग येत असेल तर ह्या घटनेकडे कसं पहायचं? अशी असूया निर्माण होऊ नये म्हणून नंबर, मार्क, स्पर्धा, चढाओढ, बक्षिसं यांचा काही नव्यानं विचार करायचा का?

यावरून एक घटना आठवली. मी १९६४ साली अकरावीत होते तेव्हाची. आमचा निरोपसमारंभ होता. काही मुलींनी भाषणं केली, कविता म्हटल्या. ह्या शाळेनं, ह्या सरांनी, बाईंनी आम्हाला खूप छान शिकवलं, प्रेम दिलं, पुढच्या प्रवासासाठी शिदोरी दिली, याबद्दल भरभरून कौतुक केलं. तुम्ही आम्हाला विसरू नका. आम्ही तुम्हाला विसरणार नाही. हे ऋण जन्मभर बाळगू. आमचं काही चुकलं असलं तर क्षमा करा. अनेक प्रकारे मुलं आपल्या भावना व्यक्त करत होती. त्यात एक ड तुकडीतला मुलगा बोलला. तो म्हणाला, 'माझा सर्वांच्यावर राग आहे. अ तुकडीतल्या मुलांचं कायम सगळ्यांनी कौतुक केलं. आम्ही ड तुकडीवाले म्हणजे डफ्फड! आम्ही सगळे ढ. आम्ही शाळेला नाव मिळवून देत नाही. त्यामुळे आमच्या वाट्याला नेहमी तिरस्कार. मला हे वागणं मुळीच पसंत नाही. सरांनी, बाईंनी आमच्यावर अन्याय केलाय. आमचा अपमान केलाय, आम्हाला मुद्दाम मागं ठेवलंय. अ तुकडीवाल्या मुलांइतकं लक्ष आमच्याकडे दिलं असतं तर आम्हीपण काही करून दाखवलं असतं. अ तुकडीतल्या मुलांबद्दल माझ्या मनात संताप आहे!'

त्याचं हे बोलणं ऐकून सगळेच अस्वस्थ झाले. मुख्याध्यापक एरवी अतिशय शांत माणूस; पण ते पण रागावले. ते म्हणाले, पुढच्या वर्षापासून मुलं काय बोलणार आहेत ते आधी लिहून घेतलं पाहिजे. असं वाटेल ते बोलून पाहुण्यांसमोर लाज घालवणं बरोबर नाही. आम्ही अ तुकडीतली मुलंही रागावलो. मी त्या मुलाशी बोलले. असा गुरुजनांचा अपमान करणं चूक आहे, असं त्याला म्हटलं. तू आजच्या इतक्या छान समारंभात मिठाचा खडा टाकलास म्हटलं. त्याला पण नंतर वाईट वाटलं. त्यानं माफी मागितली.

आता इतक्या वर्षांनंतर या घटनेचा विचार करताना वाटतं तो मुलगा फार अर्थपूर्ण बोलला होता. त्याचा आवाज असा दडपायला नको होता. त्या वेळी तिथे असलेल्या शिक्षकांना त्याच्यावरचा अन्याय बोचला नाही का? ही पद्धत सुधारायला हवी असं त्यांच्या मनात आलं नाही का? तेव्हा जर एखाद्यानं हा विषय लावून धरला असता तर आज वीस वर्षांनंतर काही तरी बदल घडला असता!

शाळांमधल्या तुकड्या, नंबर यांनी लहानपणापासून मुलांवर हा संस्कार आपण करून ठेवतो की माणसं सारखी नसतात. काही श्रेष्ठ काही कनिष्ठ. काहींना सुविधा मिळतात काहींना नाही. शालेय दृष्टिकोनातून ज्या गुणांना मान आहे ते गुण असलेली मुलंच लाडकी. इतर नाहीत. मग ती निवडक मुलंच वक्तृत्वस्पर्धांना पाठवली जातील, तीच मुलं भाषणं करणार, तीच नाटकात, तीच खेळात, तीच स्पर्धांत पुढे, ती अध्यक्षांना गुच्छ देणार, आभार मानणार आणि मागे राहणारी मुलं मागेच राहतात नेहमी. त्यांना कधी पुढं यायची संधीच मिळत नाही आणि कायमचा न्यूनगंड ह्या मुलांच्या मनात पेरला जातो आणि मार्क मिळवणारी मुलं उगाचच एक अहंगंड घेऊन वावरतात.

शाळेच्या संमेलनाच्या नाचात घेतलं नाही म्हणून मूल जेव्हा एवढासा चेहरा करून घरी येतं तेव्हा वाटतं असे कार्यक्रम वर्षभर का नसावेत? प्रत्येक वर्गाचा कार्यक्रम एका तरी आठवड्याला एक तासभर का नसावा? सगळ्या मुलांना सगळ्या अनुभवांतून जाऊ देण्यासाठी काही पद्धती नाही का शोधता येणार?

आपल्याला अन्याय टोचत कसे नाहीत? करणाऱ्यांनाही आणि ज्यांच्यावर तो होतो त्यांनाही? आपल्याला माणुसकी कळते, कर्तव्य कळतं, निष्ठा कळते, प्रामाणिकपणा कळतो. त्याग कळतो, दान कळतं पण न्याय

अन्यायाचा विचार आपण कितपत करतो ?

म्हणूनच मग शाळेत बाई भर पालक-सभेत अभिमानानं सांगतात ही गणितं फक्त अ तुकडीतल्या मुलांना यावीत अशी अपेक्षा आहे. ब क ड च्या मुलींना नाही आली तरी चालेल. असं एखादं गणित आम्ही पेपरात घालतो ते अ च्या मुलीच सोडवू शकतात. ब क ड चे पालक हा अपमान मुकाटयानं गिळतात.

दुसरा मुद्दा मारामारीचा, क्रूरपणाचा. आपण पालक मुलांना मारतो तेव्हा आपली कल्पना अशी असते की मारल्याशिवाय त्यांना वळण कसं लागेल चांगलं ? पण मारण्यातून मुलाला आपणच हा क्रूरपणा शिकवत असतो. त्याचा अपमान करत असतो तुझ्यात बळ आलं की तू पण दुबळयांना, लहानांना मार असा संदेश देत असतो. पालकांनी मुलांना मारणं, शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मारणं, नवऱ्यानं बायकोला मारणं, मोठया भावंडांनी लहानांना मारणं, हे तर मुलं सर्रास पहात असतातच. त्यातच चित्रपट, नाटक, साहित्य यातल्या मारामाऱ्यांची भर. मग क्रूरपणा ही काही भयानक गोष्ट वाटत नाही. वडील आईला मारतात हे लहानपणापासून पाहून मुलगा मोठा झाला की आईवर हात टाकतो हेही आपण पाहतो, ऐकतो. आपल्या मुलांना आपण याबाबतीत काय शिकवतो आहोत ?

जागतिक पातळीवर 'युद्ध नको' म्हणताना ह्या कौटुंबिक पातळीवरही हिंसा नको, मारामाऱ्या नकोत, अत्याचार नकोत, अन्याय नको हे ठामपणे म्हटलं पाहिजे, मुलांच्या मनात रुजवलं पाहिजे. नाहीतर हिंसा चोरपावलांनी आपल्या चिमण्या, गोड, छोटया मुलीच्या मनातही शिरते आहे याकडे आपलं दुर्लक्ष होईल !

पुस्तके

# संघकार्यकर्त्यांची 'आत्मकथा-मंजूषा'

**स्वा**तंत्र्यआंदोलनाचा, विशेषत: २० व्या शतकाच्या सुरुवातीपासून ते स्वातंत्र्य मिळेपर्यंतचा काळ भारताच्या दृष्टीने विलक्षण अशा घडामोडींचा काळ होता. स्वातंत्र्यासाठी सुरू असलेल्या चळवळी, नवे विचार, राजकीय आर्थिक तत्त्वज्ञान यामुळे समाजात काहीसे चैतन्य, गतिमानता आली होती. या वेळी निर्माण झालेल्या निरनिराळ्या प्रवाहांमध्ये ज्याप्रमाणे गांधीजींची चळवळ आणि तत्त्वज्ञान, क्रांतिकारकांचे बलिदान, रॉयवाद, मार्क्सवाद, सर्वोदय अशा निरनिराळ्या विचारांचा आणि आंदोलनांचा समावेश होता त्याचप्रमाणे राष्ट्रवादी विचार–संघटना याही याच काळात प्रभावी होत होत्या. सावरकरांची हिंदुमहासभा आणि १९२५ साली डॉ. हेडगेवारांनी स्थापन केलेला राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांनी हा हिंदुत्ववादी–राष्ट्रवादी विचार मांडायला सुरुवात केली.

यापैकी हिंदुमहासभा सावरकरांच्या मृत्यूनंतर निष्प्रभ झाली; पण रा. स्व. संघ मात्र चांगलाच विस्तारत गेला. सुरुवातीला प्रसिद्धीपासून चार हात दूर रहाण्याचे संघाचे धोरण होते; पण आता मात्र वैचारिकदृष्टया जास्तीत जास्त प्रकट होण्याची आवश्यकता संघाला भासू लागली आहे. त्याचबरोबर संघउभारणीमध्ये जीवन व्यतीत केलेले कार्यकर्तेही आपल्या आठवणी प्रकाशित करून या संघटनेविषयी अधिकाधिक सांगू लागले आहेत. वैचारिक साहित्यामध्ये हिंदुराष्ट्रवादाचा सिद्धांत, भारतीय परंपरा इत्यादींविषयी लिहिले जाते; पण या विचारांइतकेच संघाची कार्यपद्धती, संघटनकौशल्य आणि गेल्या ५० वर्षांत वाढविलेला कार्याचा विस्तार हेही वैशिष्टयपूर्ण आहे आणि संघाच्या पूर्णवेळ कार्यकर्त्याने लिहिलेल्या आठवणींमधून नेमका त्यावर प्रकाश पडतो. १९४२ पासून संघकार्याला वाहून घेतलेल्या दिनकर दातार यांनी 'आत्मकथा मंजूषे'मधून अशा अनेक बोलक्या आठवणी लिहिल्या असून ४२ नंतरच्या संघकार्याच्या प्रवासाचे चांगले चित्रण त्यांनी या पुस्तकातून केले आहे.

स्वातंत्र्यआंदोलनाच्या भारावून टाकणाऱ्या काळात दातारांसारख्यांना स्वस्थ बसणे अशक्य होते. गांधीजींनी सत्याग्रहाची चळवळ सुरू केली होती, सावरकर लष्करात सामील होण्याचे आवाहन करीत होते, तर गुरुजींनी हिंदूंमध्ये शिस्त व ऐक्य निर्माण होण्याची आवश्यकता प्रतिपादन केली. मातृभूमीवरच्या प्रेमाने त्यागासाठी सिद्ध असलेल्या दिनकर दातारांना 'देशासाठी काय करावे ?' या प्रश्नाचे उत्तर मिळाले. राष्ट्रामध्ये कायम स्वरूपाचे चैतन्य टिकवण्याची आकांक्षा असलेली रा. स्व. संघाची संघटना हे त्यांनी आपले कार्यक्षेत्र मानले आणि संघाच्या प्रचारकाचे जीवन पत्करले. वास्तविक कौटुंबिकदृष्टया त्यांच्यावर मोठी जबाबदारी होती. 'चार पैसे घरी हा मुलगा आणेल' अशी साहजिकच घरच्या लोकांची अपेक्षा होती. त्यामुळे एकीकडे ही जबाबदारी, तर दुसरीकडे संघकार्याची–देशकार्याची ओढ यामुळे त्यांच्या मनात संघर्ष निर्माण झाला. चिखलवाडी येथील सरकारी नोकरी अत्यंत नाइलाजाने स्वीकारली; पण त्यांच्या स्वाभिमानी वृत्तीला तिथले वातावरण मानवले नाही आणि त्यांनी वडलांना पत्र पाठवून कळवले की, 'मी १॥ वर्षं इंग्रजांची गुलामी केली; पण यापुढे हे जिणे मला असह्य झाले आहे, त्यामुळे मी ही नोकरी सोडत आहे.'

अशा रीतीने एकदा घर सोडून बाहेर पडल्यानंतर सार्वजनिक कामांमध्ये काय काय अनुभव येतात, कोणकोणत्या प्रसंगांना तोंड द्यावे लागते याचे सुरेख वर्णन यापुढील आत्मकथांमध्ये लेखकाने केले आहे आणि

पूर्णवेळ प्रचारकाचे जीवन सांगतानाच त्या वेळच्या राजकीत इतिहासाची नोंदही त्यांनी घेतली आहे. त्यामुळे वैयक्तिक अनुभवांबरोबरच या देशातील मुसलमानांचा प्रश्न, हिंदु समाजाची स्थिती, त्या वेळच्या राजकीय नेत्यांची भूमिका याचीही चर्चा या पुस्तकात आली आहे. किंबहुना व्यक्तिगत अनुभव हे राष्ट्राच्याच सुखदुःखांशी निगडित झालेले असले की, आपोआपच 'आत्मकथा 'सुद्धा देशाचा इतिहासच सांगत असते आणि दातारांच्या या पुस्तकाच्या बाबतीत हेच घडले आहे.

## संघ आणि राष्ट्रजीवन

एकदा एखाद्या कार्याची बांधिलकी स्वीकारल्यानंतर आपले उपजत गुण, बुद्धिमत्ता, कला हे सर्व त्या कार्यासाठीच समर्पित करावे लागतात. हाडाच्या कार्यकर्त्याकडे असलेली सर्व गुणवैशिष्ट्ये ही साधने बनतात आणि मूळ कार्य हेच 'साध्य' असते. लेखन काय, वक्तृत्व काय किंवा काव्य काय अशा एकेक कलेमध्ये आयुष्यभर रमणारे अनेकजण असतात; पण या गोष्टींकडे 'साधन' म्हणून बघण्याची किमया फक्त दातारांसारखे कार्यकर्तेच करू शकतात आणि हाच केवढा मोठा त्याग नव्हे काय? या त्यागाचा प्रत्यय पुस्तकाचे प्रत्येक प्रकरण वाचताना येतो.


प्रतिकूल निसर्ग
जीवघेणी उपासमार
सहकाऱ्यांचे मृत्यू
भयाण एकाकीपणा, त्यावर
मात करून, चार हजार मैलांची
पायपीट करून ते कैदी
भारतात पोचले.
कसे?
दुसऱ्या महायुद्धातील
एक चित्तथरारक पलायन कथा.

मला
निसटलंच
पाहिजे!

अनुवाद : श्रीकांत लागू
वीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०


शालेय जीवनात शाळेपेक्षा संघाने आपल्याला संस्कार दिले. बौद्धिक विकास घडवणं, चरितार्थ मिळवण्याइतपत लायक बनवणं, इतपर्यंतच शाळा आपल्याला काही देऊ शकते; पण आपल्या 'स्व' कोशातून बाहेर पडून समाज आणि राष्ट्र यांच्यापर्यंत आपल्या जाणिवा रुंदावण्याचे संस्कार फक्त संघच करू शकतो हे लेखकाचे निरीक्षणही विचार करण्यासारखे आहे. अर्थात ह्याबरोबरच ते ज्या शाळेत शिकले त्या नूमविबद्दल अभिमानानेही त्यांनी लिहिले आहे. 'शिक्षण, खेळ, सहली, कलागुण या सर्व बाबतीत नूमवि महाराष्ट्रात नावाजलेली होती. मी नूमविमध्ये होतो असे सांगताच एक आदराची वेगळीच भावना ऐकणारांकडून व्यक्त होत असे' अशा शब्दात लेखकाने शाळेचे ऋण व्यक्त केले आहे.

शालेय जीवनानंतर सुरू झाले ते त्यांचे संघमय जीवन. चोपडे या जळगाव जिल्ह्यातील गावात दातारांची प्रचारक म्हणून योजना झाली आणि अगदी सुरुवातीपासूनच त्यांना सार्वजनिक क्षेत्रात काम करताना येणाऱ्या अडचणी जाणवू लागल्या, आव्हाने स्पष्ट होऊ लागली, समाजस्थितीचे खरे दर्शन होऊ लागले. १९३० नंतर ब्राह्मणेतर चळवळ फोफावली होती. त्यामुळे जातीजातींमधील वैमनस्य सगळीकडेच धुमसत होते. धर्म-राष्ट्र यांच्यापर्यंत कोणाची दृष्टी पोचत नव्हती. जातीय विचारांना जास्त महत्त्व होते आणि हेसुद्धा स्वातंत्र्य चळवळीच्या त्या भारून टाकणाऱ्या वातावरणात. ह्या अनुभवांतून दातारांनी संघकार्याची गरज नेमकी मांडली आहे. एकीकडे जातीच्या संकुचित कोशात राहणारे दुसऱ्या बाजूला निधार्मिकतेच्या भोंगळ घोषणा करीत होते. प्रचारक म्हणून काम करायला सुरुवात करताना लेखकाला पहिले वर्ष सामाजिक परिस्थितीचे आकलन करून घेण्यातच गेले आणि एक गोष्ट त्यांना स्पष्टपणे जाणवली की, संघाचे कार्य सर्वस्पर्शी असल्याने समाजजीवनाच्या ज्ञानाखेरीज त्याची उभारणी होणे अशक्य आहे. यातूनच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने विविध क्षेत्रात कामाच्या आघाड्या उघडाव्यात याची आवश्यकता त्यांना वाटू लागली. संघर्ष करण्याचे धाडस असलेल्या त्यांच्यासारख्या स्वयंसेवकांना इतरही संकटे खुणावू लागली. त्यामुळे एकीकडे संघाचे काम करीत असतानाच भारतीय जनसंघ या राजकीय पक्षाचे काम, गोवा मुक्तीआंदोलनात उडी, शेतकरी परिषदेचे सूत्रचालन, ग्रंथप्रकाशन, पत्रकारिता, शिक्षण अशा विविध क्षेत्रात त्यांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला. या वेळी संघानेच स्वतःहून समाजजीवनात सर्व तऱ्हेचे काम करायला सुरुवात करावी असे दातारांना वाटत होते. त्यांच्या जबरदस्त इच्छाशक्तीला संघकार्याची चौकट अपुरी वाटू लागली होती; पण 'वैचारिक मतभेद आहेत म्हणून अंगीकृत कार्याचा त्याग केला' असं म्हणण्याची सर्वसाधारण वृत्ती दातारांची नाही. ४८ सालापासूनच संघाने सर्व क्षेत्रात हिरीरीने भाग घ्यावा असे वाटत असूनही संघटनेच्या आपल्या कामावर त्यांनी त्याचा परिणाम होऊ दिला नाही. मतभेदांची परिणती निष्क्रियतेत होणारे बरेचजण असतात. पण संघाचे संस्कार ग्रहण केलेला स्वयंसेवक असे कधीच होऊ देत नाही हेच दातारांनी या ठिकाणी दाखवून दिले. त्यांनी लिहिलेल्या प्रत्येक प्रकरणात जाणवत राहतो तो त्यांचा प्रचंड उत्साह! आणि या उत्साहामुळेच असामान्यत्वाचे वलय निर्माण न होताही मोठेपण मिळवलेली दातारांसारखी माणसे संघाचा एवढा मोठा व्याप वाढवू शकली.

## इथेही स्वकीयांशी संघर्ष

त्यांनी स्वीकारलेल्या अनेक आव्हानांमध्ये याचा प्रत्यय येतो. उदाहरणच द्यायचे तर गोवा मुक्तीसाठी दातारांनी केलेल्या प्रयत्नांचे देता येईल. गोवा–दीव–दमण नगर हवेली–दादरा या वसाहती मुक्त करण्याची चळवळ स्वातंत्र्य सुरू झाल्यापासूनच सुरू झाली होती. नगरहवेलीच्या मुक्तीचळवळीमध्ये दातारांनी भाग घेतला. पुणे–मुंबई येथून १००–१५० सशस्त्र कार्यकर्त्यांची जमवाजमव करण्यात आली, त्यांच्यासह सेल्व्हास येथे दातार पोहोचले. चळवळीच्या मुख्य केंद्राच्या ठिकाणी अनेक दारुगोळे, शस्त्रास्त्रे साठवून ठेवण्यात आली होती. त्याच्या रक्षणाचे काम दातारांनी आपल्या अंगावर घेतले. पोर्तुगीज अधिकारी आणि

पोलीस यांची प्रतिक्रिया उमटवण्याऐवजी तिथल्या कम्युनिस्टांच्या मोर्चालाच त्यांना तोंड द्यावे लागले. त्या गर्दीला थोपाविण्यात ते यशस्वी झाले ते केवळ निर्भय खंबीरपणा आणि त्याबरोबर असलेल्या ध्येयवादामुळेच. आणि त्यांनी मोर्चाच्या पुढाऱ्यांनाच निःशस्त्र केले आणि तो प्रचंड जनसमुह निष्प्रभ केला. शेवटी अथक संघर्षानंतर गोवा मुक्त झाला. संघर्षमय अनुभवांची दातारांची ही शिदोरी खूप मोठी आहे. त्यातूनच त्यांचे व्यक्तित्व घडत गेले आहे.

दिनकर दातार हे जेवढे उत्साही कार्यकर्ते आहेत तेवढीच–किंबहुना त्यामुळेच देशस्थिती विषयी प्रचंड कळकळ त्यांच्या मनात आहे. आपल्या आठवणी लिहिताना दातारांनी ती वेळोवेळी व्यक्त केली आहे. समाजातील दांभिकतेवर कोरडे ओढले आहेत आणि त्या वेळच्या राजकारणाचे आणि समाजकारणाचे त्यांच्या दृष्टिकोनातून मूल्यमापनही केले आहे. हिंदूधर्म आणि हिंदुत्ववाद यांच्या-विषयी जी 'प्रतिगामी' 'जुनाट' आणि 'जातीयवादी' अशा तऱ्हेची प्रतिमा निर्माण केली गेली होती आणि आजही केली जाते त्याबद्दल लेखकाने तीव्रपणे आपली प्रतिक्रिया नोंदवली आहे. एके ठिकाणी ते लिहितात, 'हिंदुत्ववाद्यांना तुच्छ लेखण्याची वृत्ती त्या वेळीही होती, एवढेच काय स्वातंत्र्यवीर सावरकराना इंग्रजांचे हस्तक समजण्यापर्यंत काहींची मजल गेली. ('सैन्यात भरती व्हा' या त्यांचा आदेशाचा लावलेला विपर्यस्त अर्थ) अॅटलीचा समाजवादी पक्ष इंग्लंडमध्ये आल्यावर भलेभले पुढारी भारावून आणि भांबावून गेले. न भांबावून गेले ते दोनच एक स्वातंत्र्यवीर सावरकर आणि दुसरे बॅ. जीना! सावरकरांनी फाळणी यशस्वी होऊ नये म्हणून जीवापाड प्रयत्न केला; परंतु जीनांचा कावा सफल झाला आणि देशाचे दोन तुकडे झाले.' दातारांच्या राष्ट्रवादी लेखणीने केलेले हे मूल्यांकन वस्तुस्थितीवर नेमके बोट ठेवणारे आहे यात शंकाच नाही. पण ते केवळ राजकीय परिस्थितीवरच भाष्य करतात असे नाही तर ज्या समाजा-साठी आयुष्य खर्च करून काम करायचे त्या हिंदूसमाजाच्या दोषांकडेही त्यांनी लक्ष वेधले आहे. जे आपल्यात दोषास्पद आहे, वाईट आहे त्याचा विचारच करायचा नाही किंवा अशा वस्तुस्थितीला सामोरे जायचेच नाही असे म्हणणारांपैकी दातार नाहीत. आपले अनुभव मांडताना वेळोवेळी हिंदुच्या अंगभूत दोषांबद्दलही त्यांनी लिहिले आहे. मात्र हा समाज आपलाच आहे या भूमिकेनेच लिहिले आहे. एका प्रकरणात ते लिहितात, एक हजार वर्षांच्या इतिहासाचा अनुभव असूनही हा समाज राष्ट्र म्हणून तेजाने उभा राहिला नाही. हजारो वर्षे अंगात मुरलेली दुर्बलता हिंदूंना एकदम कशी सोडता येणार? त्यांच्या योग्यतेचे नेतेच त्यांना मिळणार!

अशा रीतीने त्या वेळच्या राजकीय सामाजिक इतिहासाचेही दर्शन त्यांच्या वैयक्तिक आठवणीप्रमाणेच या पुस्तकातून घडत राहते. त्यामुळेच हे पुस्तक वाचनीय झाले आहे. पण लेखकाने जर या आठवणी काहीशा सलग मांडल्या असत्या, विशिष्ट प्रकारचे अनुभव निवडून ते एका प्रकरणात लिहिले असते व त्यावर आपले भाष्य अशा रीतीने निरनिराळ्या विषयांचा परामर्श घेतला असता तर वाचकाच्या दृष्टीने ते अधिक समाधान देणारे वाटले असते.

हे पुस्तक वाचल्यानंतर प्रकर्षाने जाणवते ते हे की, संघाच्या वाढत्या विस्ताराचे रहस्य खंबीरपणे पाय रोवून उभे राहणाऱ्या दातारां सारख्या कार्यकर्त्यांच्यात आहे, त्या त्या समाजात मिसळण्याच्या वृत्तीमध्ये आहे. संघविस्ताराचे हे रहस्य ज्यांना जाणून घ्यायचेय त्यांच्यासाठी हे पुस्तक बरीच माहिती देईल. आणि कोणत्याही ध्येयासाठी का होईना पण संघटना उभी करण्याची ज्यांची इच्छा आहे त्यांनाही हे पुस्तक मार्गदर्शक ठरेल.

असं हे अनेक घटनांनी भरलेले जीवन दिनकर दातार जगले. कालाच्या प्रवाहाबरोबर स्वतःही गतिमान राहिले आणि आपली सगळी शक्ती, सर्वस्व समाजपुरुषाच्या चरणी वाहून मोकळे झाले. 'आत्मकथा मंजुषेच्या' शेवटी लिहिलेल्या कवितेत त्यांनी म्हटले आहे, 'कालचक्राच्या गतीला आदि नाही अंत नाही' तरीही या कालप्रवाहात आपले आयुष्य झोकून देण्याचे धाडस त्यांनी दाखविले. प्रत्येक सच्च्या कार्यकर्त्याने हे पुस्तक वाचले पाहिजे.

**— निरंजन आगाशे**

आत्मकथा मंजूषा
लेखक–प्रकाशक
दिनकर घनःश्याम दातार
पृष्ठे–२७७ मूल्य ६० रु.


एका बाजूने
रशियन रणगाडे
झेपावत असताना,
कोणत्या जीवनमूल्यांना
आवाहन करून वालेसाने
पोलिश जनतेचा
लढा उभा केला?

त्या लढ्याचे चित्रण –
मराठीत प्रथमच.

**लेक वालेसा**
डॉ. श्रीकांत मुंदरगी
बावीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे – ३०.

श्याम बेरकी आहे
तसाच मिश्किल.
तो मध्यम आकाराचा,
मध्यम विकारांचा, मध्यम
वर्गातला, मध्यम बुद्धीचा आहे.

त्याच्या संसार कथा.

**काही दिवस श्यामचे काही राधाचे**
फिरोझ रानडे
पंचवीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे – ३०.

# एक लोभस व्यक्तित्व : प्रभाकर पणशीकर

पृष्ठ ११ वरून

झालं. खरं तर कंपनी मुळापासून हादरलेली. बाकीचे सहकारी चिंताग्रस्त; पण पंत मात्र स्थिरचित्त ! त्यांचे सहकारी सांगतात की, गाडीला अपघात झाल्यावरही हा माणूस विचलित झाला नाही. इतरांना म्हणाला, ' कितपत नुकसान झालंय बघा, पलीकडं सतरंजी टाकून पत्त्याचा डाव टाका! ' सारंच विचित्र. आत्ता काही दिवसांपूर्वी नाट्यसंपदाच्या ट्रकनं एका टॅक्सीला धडक दिली. टॅक्सीचं अर्थातच मोठं नुकसान झालं. कित्येक हजारांचा फटका पणशीकरांना बसला. विचारणाऱ्यांना काळजी वाटते; पण हे महाराज शांतपणानं काय घडलं ते सांगतात. जणू काही घडलंच नाही. वेळ पडली तर कंपनीच्या सामानाच्या ट्रकमधून प्रवास करतात. आपण मालक आहोत याची भीती सामान्य कामगार किंवा कलाकार दोघांच्याही मनात ठेवीत नाहीत. ते पाहून हे रसायन काही वेगळंच आहे असं सतत जाणवतं !

या निराळेपणाची जाण आपल्याला येते ती या माणसाला रंगमंचावर पाहताना. गेली अनेक वर्षे त्यांना आपण विविध भूमिकांमध्ये पाहात आहोत. ' अश्रूंची झाली फुले ', ' मला काही सांगायचंय ', ' इथं ओशाळला मृत्यू ', ' तो मी नव्हेच ', ' महाराणी पद्मिनी ', ' बेईमान ' आणि ' थँक्यू मि. ग्लाड ' अशा अनेक नाटकांतून आपण त्यांना पाहात आलेलो आहोत. त्या त्या वेळी पणशीकरांची भूमिका लक्षवेधी ठरलेली आहेच. प्रत्येक वेळी असं वाटत आलेलं आहे की, हा कलाकार भूमिकेचं नवं आव्हान घेऊन आपल्यासमोर आलेला आहे. ' अश्रूंची झाली फुले 'मधला विद्यानंद, 'तो मी नव्हेच' मधल्या पंचरंगी भूमिका ( लखोबा लोखंडे, दिवाकर दातार, दाजीशास्त्री–राधेश्याम-महाराज, कॅ. अशोक परांजपे ), ' इथं ओशाळला मृत्यू 'मधील औरंगजेब, 'बेईमान' मधील उद्योगपती चंदर, ' महाराणी पद्मिनी' मधील अल्लाउद्दीन खिलजी, ' थँक्यू मि. ग्लाड ' मधील जेलर ग्लाड ह्या आणि अशा प्रकारच्या आणखी काही भूमिका पाहिल्या की, जाणवतं पणशीकर हे एकाच प्रकारच्या भूमिकांमध्ये गुंतून पडलेले नाहीत. सामान्यतः असं घडतं की, व्यवसायात एका विशिष्ट प्रकारच्या भूमिकांना लोकमान्यता मिळाली म्हणजे तो नटही तशाच भूमिका स्वीकारतो, नाटकवालेही तशाच भूमिका त्या नटाला द्यायला उत्सुक असतात,प्रेक्षकही बराच काळ तेच तेच पाहण्यात धन्यता मानतात. प्रेक्षकांची मागणी म्हणून मग तो नट तेच आणि तसंच काहीबाही करीत राहतो. त्या आवर्तांचा केव्हा ना केव्हा कंटाळा येतोच. पणशीकरांच्या संदर्भात अद्याप तसं घडलं नाही. याचं कारण ' तो मी नव्हेच ' च्या अमाप यशात ते वाहून गेले नाहीत. गेली वीस–बावीस वर्षं ' तो मी नव्हेच ! ' चे प्रयोग ते करताहेत; पण केवळ तेवढेच करीत राहिले नाहीत तर वेगवेगळ्या भूमिका स्वीकारीत राहिले, त्यातही तितकाच जीव त्यांनी ओतला. याचं उत्तम उदाहरण म्हणजे ' इथं ओशाळला मृत्यु ' मधली त्यांची औरंगजेबाची भूमिका. पणशीकरांनी केलेली ही भूमिका एक ' चिरंजीव भूमिका ' आहे. तसं पाहिलं तर हे नाटक संभाजीच्या शोकात्म जीवनाचं दर्शन घडवणारं आहे; पण यात जितका संभाजी स्मरणात राहतो त्याहीपेक्षा अधिक किती तरी पटींनी औरंगजेब ध्यानात राहतो. धीरगंभीर, निर्विकार चेहऱ्याचा औरंगजेब नमाज पढताना नाटकाच्या आरंभी आपल्या समोर असतो. तो मध्येच काही मजकूर लिहिताना दिसतो. टोप्या शिवताना दिसतो. त्याच्या मनात निर्णय पक्का आहे की, मरगठ्यांचे राज्य बरबाद होईपर्यंत दिल्लीच्या लाल किल्ल्यात पाऊल टाकायचं नाही ! एक तर सारे मराठेलोक तरी संपवीन नाही तर दक्षिणेच्या मातीत माझी कबर तरी खोदली जाईल, अशा निश्चयानं संभाजीचा विनाश करायला निघालेला औरंगजेब संभाजीला बंदिवान–अवस्थेत पाहतो. प्रथम मग्रुरी आणि नंतर खोटा आव आणून केलेली सलगी, सहानुभूती, त्यानंही संभाजी बधत नाही म्हटल्यावर त्याच्या डोळ्यात तापती सळई घाला, हातपाय तोडा असे अनेक आदेश देतो. त्या-त्याप्रमाणं यथावकाश घडतं आणि तरीही संभाजीचा पीळ सैल होत नाही याचा औरंगजेबाला वरून येणारा राग; पण आतून संभाजीविषयी वाटणारी वेगळीच करुणा असे किती तरी भाव कानेटकरांनी शब्दात व्यक्त केलेत ते पणशीकर शतपटींनी जिवंत करतात. संभाजीला एकेक शिक्षा अंमलात येत असताना ते सारं निवेदन औरंगजेबाला होत असतं, ते ऐकताना पणशीकरांचं थरथरणारं, अस्वस्थ होऊन येरझाऱ्या घालणं, अखेरीस संभाजी न ओरडता, किंचाळता, शरण न येता मृत्यु पावला हे ऐकताच पणशीकर जो मुद्राभाव करतात तो दीर्घकाल स्मरणीय आहे. थिजलेल्या चेहऱ्यानं, दुःखावेगानं ते एका अर्थानं संभाजीच्या वीर मरणाला नतमस्तक होत असतात. त्या अवस्थेतच ते म्हणतात, ' अखेरीस ताठ मानेनं मरून जिंकला तो–हार आली आमच्या तकदीरमध्ये......जी मिट्टी असले पहाडी राजे पैदा करते ती भूमी आम्हाला कदापि, कदापि जिंकता येणार नाही ! ऐकून ठेव आसद, संभाजी मेला एवढ्यानं जंग संपला नाही-अखेर या दख्खनच्या मिट्टीतच आमची कबर बांधली जाणार...! ' असं रडत रडत म्हणत असताना ताठ, निर्भीड, निर्विकार औरंजेब जेव्हा मोडतो, कोसळतो तो विलक्षण नाट्यानुभव आहे. पणशीकर जेव्हा हा अनुभव आपल्याला देतात तेव्हा आपल्या मनात औरंजेबाची एक वेगळीच प्रतिमा निर्माण करतात. नाटक पाहून आपण प्रेक्षागृहातून बाहेर पडतो तेव्हा थरारक अस्वस्थता, एक प्रकारची उद्विग्नता घेऊन बाहेर पडतो. जितका संभाजी आपल्या मनात राहतो तितक्याच तोलानं औरंगजेबही राहतो. ही किमया जितकी नाटककाराच्या शब्दांची आहे तितकीच पणशीकरांच्या अभिनयाचीही!

अशीच किमया ' तो मी नव्हेच 'मधल्या पाच भूमिकांची सांगता येईल. हे नाटक पाहताना लखोबा लोखंडे, दिवाकर दातार, दाजीशास्त्री, राधेश्याममहाराज आणि कॅप्टन अशोक परांजपे ह्या पाचही भूमिका करणारा नट एकच आहे असं सांगूनही खरं वाटणार नाही कारण प्रत्येक वेळी रंगभूषा, वेशभूषा, बोलण्या–चालण्याच्या लकबी वेगळ्या; त्यामुळं खरंच वाटत नाही. एका भूमिकेतून दुसऱ्या भूमिकेत जाताना जो बाह्य बदल करण्यासाठी पड्द्याआड जी

# पणशीकरांची 'नाट्यसंपदा'

## नाट्यसंपदा या संस्थेने केलेली नाट्यनिर्मिती

### ( नवीन नाटके )

१. १९६४ – मोहिनी
२. १९६५ – अमृत झाले जहराचे
३. १९६६ – अश्रूंची झाली फुले
४. १९६७ – कट्यार काळजात घुसली
५. १९६८ – इथे ओशाळला मृत्यू
६. १९६९ – म्हैस येता माझ्या घरा
७. १९७० – मला काही सांगायचंय
८. „ – वीज म्हणाली धरतीला
९. १९७१ – विकत घेतला न्याय
१०. „ – महाराणी पद्मिनी
११. १९७२ – देव जागा आहे
१२. „ – अंधार माझा सोबती
१३. १९७३ – बेइमान
१४. १९७४ – प्रश्न थोडा नाजूक आहे
१५. १९७५ – आनंद
१६. १९७६ – तो राजहंस एक
१७. „ – तीन लाखाची गोष्ट
१८. „ – थँक्यू मि. ग्लाड
१९. १९७७ – त्या कातर वेळी
२०. १९७८ – तुझी वाट वेगळी
२१. १९८० – पुत्रकामेष्टी
२२. १९८२ – मी मालक या देहाचा
२३. १९८३ – निष्पाप ( नाट्यसंपदा + नाट्यसुमन )

### पुनरुज्जीवित केलेली नाटके

१. १९६५ – मदनाची मंजिरी
२. „ – सुवर्णतुला
३. १९६७ – गारंबीचा बापू
४. १९७० – तो मी नव्हेच
५. १९७३ – होनाजी बाळा
६. „ – संत तुकाराम
७. १९७८ – राजसंन्यास
८. १९८० – भटाला दिली ओसरी
९. १९८४ – सौभाग्य

### भूमिका

१. भाई टोळ ( मी उभा आहे )
२. रावबहादूर ( साष्टांगनमस्कार )
३. पराग ( लग्नाची बेडी )
४. बचंभट ( विचित्र लीला )
५. रावसाहेब ( हाच मुलाचा बाप )
६. ढेरेसाहेब ( अंमलदार )
७. दावा ( देवमाणूस )
८. कर्णिक ( राणीचा बाग )
९. सोपएजंट ( कुलवधू )
१०. नारायण ( माझे घर )
११. नंबर दोनचा भाऊ ( वहिनी )
१२. गावकरी ( देवाघरची माणसे )
१३. नवकवी ( भटाला दिली ओसरी )
१४. लखोबा आणि चार भूमिका ( तो मी नव्हेच )
१५. औरंगजेब ( इथे ओशाळला मृत्यू )
१६. मेजर सौमित्र ( मोहिनी )
१७. विद्यानंद ( अश्रूंची झाली फुले )
१८. देवकीनंदन ( मला काही सांगायचंय )
१९. अल्लाउद्दीन खिलजी ( महाराणी पद्मिनी )
२०. चंदर ( बेइमान )
२१. कर्नल ( प्रश्न थोडा नाजूक आहे )
२२. ग्लाड ( थँक्यू मि. ग्लाड )
२३. बी. के. ( पुत्रकामेष्टी )

### अन्य भाषांतील नाटकांतून भूमिका

१. गुजराथी 'आ तमने ओळख मा रखमा'
( ६६ प्रयोग ) ( अश्रूंची झाली फुले )
२. कानडी 'अव्हानु न नल्ला'
( १० प्रयोग ) ( तो मी नव्हेच )

### दिग्दर्शित केलेली नाटके

अंमलदार, देवमाणूस, साष्टांग नमस्कार, भ्रमाचा भोपळा, मेलाचा दगड, नया जमाना ( हिंदी ), महारथी कर्ण, पुण्यप्रभाव, झुंझारराव, सोन्याचे देव ( सहकार्याने ), तो मी नव्हेच.

¤ 'वासुदेव बळवंत' या चित्रपटासाठी विश्राम बेडेकरांना सहकार्य – १९४९

¤ 'अश्रूंची झाली फुले' नाटकाच्या निमित्ताने सरकता रंगमंच मराठी रंगमंचावर नाट्यसंपदाने प्रथम आणला. तसेच 'तो मी नव्हेच' च्या निमित्ताने फिरता रंगमंच ( सर्व ठिकाणी घेऊन जाता येण्याजोगा ) मराठीत प्रथम आला.

¤ मराठी, कानडी, गुजराथी नाटके सादर करणारी एकमेव मराठी नाट्यसंस्था. ¤

जय्यत तयारी सज्ज असते तीही एक चमत्कार वाटावा अशी आहे. ती सारी धावपळ मी अतिशय काळजीपूर्वक अनेकदा पाहिली आहे. ती धावपळ चालू असताना पणशीकर इतके शांत असतात की, पाहणाराला आश्चर्य वाटावे. भल्याभल्यांना या नाटकातील भूमिकांचा मोह पडावा अशी परिस्थिती आहे. आतापर्यंत काहींनीः आपापल्या ताकदीनं त्या भूमिका करण्याचा यत्न केला; पण या नाटकानं पणशीकरांनी जी मुद्रा रसिकांच्या मनात प्रस्थापित केली ती अन्य कुणी करू शकलं नाही, यातच नटाचं नटत्व असतं! अशाच प्रकारानं त्यांच्या 'थँक्यू मि. ग्लाड'-मधील 'जलर ग्लाड'बद्दल सांगता येईल किंवा 'अश्रूंची झाली फुले'मधील विद्यानंद-बद्दल बोलता येईल. तिथंही दुहेरी भूमिकेत पणशीकर वावरतात. आरंभाला एक गणितज्ञ, प्राचार्य म्हणून डॉ. विद्यानंद अशी त्यांची भूमिका आहे आणि परिस्थितीनं त्याचं रूप पालटल्यावर तो वेगळ्याच वेशभूषेत येतो. फ्रेंच पद्धतीची दाढी, काळसर भिंगांचा चष्मा, नाजूक-रेखीव मिशा, संपूर्ण सुटामध्ये वगैरे. तो तुरुंगातून नुकताच सुटून आलेला, डोळे, चेहरा उदासीन वाटणारा. पणशीकरांची ही दोन रूपं आपल्यालाही थक्क करतात. यातला खरा विद्यानंद कोणता हे ओळखणंही अवघड! असंच आणखी 'मला काही सांगायचंय'मधल्या देवकीनंदनबद्दल किंवा 'बेईमान'मधल्या चंदरबद्दल तपशिलात सांगता येण्यासारखं आहे!

गेल्या पंचवीस-तीस वर्षांचं पणशीकरांचं रंगभूमीवरचं रूप लोकमान्य झालेलं आहे. स्वच्छ वाणी, प्रभावी मुद्रादर्शन, रंगमंचीय प्रसन्न व्यक्तिमत्त्व आणि जन्मजात नाटकाची-भूमिकेची समज या बळावर ते सतत रसिकमान्य झालेले आहेत. काही वेळेला काम करणाऱ्या नटाला जरी उत्साह असला तरी त्याच्या अभिनयातल्या तोचतोचपणामुळं किंवा चेहऱ्याच्या-वाणीच्या जूनपणामुळे रसिकांच्या मनातून तो कलाकार उतरतो; पण पणशीकरांच्या संदर्भात अद्याप तरी असं घडलेलं नाही! काही वेळेला तर त्यांचा रंगभूमीवरचा आणि बाहेरचाही उत्साह पाहून त्यांनी जुनी कात टाकून नवीन कात धारण केली आहे की काय असं वाटत राहतं!

असे हे 'पंत'-प्रभाकरपंत-पणशीकर आता येणाऱ्या नागपूरच्या नाट्यसंमेनासाठी अध्यक्ष म्हणून अविरोध मान्य झाले आहेत. सामान्यतः अध्यक्षपद वगैरे गोष्टी आयुष्याच्या निवृत्तीनंतर मिळणाऱ्या गोष्टी. किंबहुना तो मान देऊन काहींना निवृत्तीबद्दल अप्रत्यक्ष सूचना करण्याची रीत आहे; पण पंतांच्याबाबतीत अजून पंधरा-वीस वर्षे तरी निवृत्तीचा प्रश्नच येत नाही. कारण अथकपणानं रंगभूमीची वाटचाल करणारा हा एकांडा वारकरी आहे. जे येतील त्यांना बरोबर घेऊन जाणारा (आणि बहुधा खूप लोक येतातच), आपल्या मस्तीत ऐटीत जाणारा माणूस आहे. आपण पायांखाली तुडवलेली वाट किती काटेरी होती याची पुरेशी जाण आहे. नव्या वाटसरूला त्या काट्यांनी रक्ताळलेपण येणार नाही यासाठी जेवढं करण्याची शक्यता आहे ते जिद्दीनं, आपुलकीनं, शहाणपणानं करण्याची तयारी आहे. त्यामुळंच अशी माणसं लोककार्यातून सहजी निवृत्त होतही नाहीत आणि त्यांच्या भोवतालचे लोक त्यांना निवृत्त करूही इच्छित नाहीत. उलट अधिक कार्याची अपेक्षा करतात.

पंत आज अशा वेळी अध्यक्ष झालेत की, रंगभूमीमध्ये-विशेषतः व्यावसायिक रंगभूमीमध्ये प्रश्नांचं मोहोळ आहे. त्याला दगडानं किंवा हातानं उठवावं तर आपल्याला आपणच धोका पत्करण्यासारखं आहे. व्यवसायात राहून त्यातले प्रश्न सोडविण्यासाठी एका पदावरून काही भूमिका घ्यायची, अंमलबजावणी करायची ही कामगिरी आव्हानात्मक असते. ती ताकद पणशीकरांकडं आहे. कारण ते नव्या आणि जुन्या मंडळींना जोडणारे आहेत.. आवश्यक त्या ठिकाणी परखडपणानं सडेतोड आपली मतं मांडणारे आहेत. ते कुजबुजले तरी दूरवर ऐकू जाईल इतका भला मोठा, खणखणीत आवाज आहे. आवाजाला साजेलसा विचारही खणखणीत आहे. मुख्य म्हणजे ते कोणत्या एका बाजूचे-पक्षाचे नाहीत. तरीही त्यांची म्हणून त्यांना एक 'रंगभूमिका' आहे. अशा माणसाकडं केवळ संमेलनाचंच नव्हे तर रंगभूमीतील अनेक प्रश्नांचं धुरीणत्व जाणं ही आजही निकड आहे! पाहू या काय काय घडतंय ते! □

---

## ग्रामीण भागात स्थानिक प्रश्नांवर अभ्यास करू इच्छिणाऱ्यांना

### दोन वर्षांसाठी शिष्यवृत्ती

आदिवासी भागातील खालील विषयांवर स्थानिक सामाजिक संघटनांच्या सहाय्याने अभ्यास करू इच्छिणाऱ्यांसाठी शिष्यवृत्ती.

(१) वनौषधी आरोग्यविज्ञान : पारंपारिक वनौषधीवर आधारित आरोग्यपद्धती समजावून घेऊन सामाजिक आरोग्ययोजना बनविणे.

(२) पाणी : अवघड भागात लघुपाटबंधारे, पाझर तलाव, लहान धरणे इ. च्या सहाय्याने पाणीपुरवठा कसा करता येईल ह्यासंबंधी राबविण्यालायक योजना बनविणे.

(३) वनीकरण : सरपण, पशुखाद्य, इमारती-लाकूड, औषधी व इतर दृष्टीने निवडलेल्या गावांकरिता सामाजिक वनीकरणयोजना तयार करणे.

(४) तंत्रज्ञान : स्थानिक साधनांच्या उपलब्धते व गरजेनुसार योग्य तांत्रिक प्रक्रियांचा अभ्यास करून एखादा उद्योग सुरू करता येईल काय ह्यासंबधीचा अभ्यास.

(५) जमिनीचे प्रश्न : जमिनीसंबंधात जमीनहस्तांतर, नावावर नसणे, नावावर असून कबजात नसणे, आदिवासींच्या जमिनीची विक्री इ. संबंधी अभ्यास.

(६) लोककला : स्थानिक लोककला इतिहास व सद्यःपरिस्थिती समजावून घेऊन लोककलाविकासाची दिशा सुचविणे.

संपर्क :
चिटणीस,
**ॲकेडमी ऑफ डेव्हलपमेंट सायन्स**
मु. पो. करोळे, ता. कर्जत
जि. रायगड ४१० २०१

# नाट्यपंढरी



## □ वारसा दिनकर कामण्णाचा ?

वसंत शिंदे एक गुणी विनोदी नट. आता बहात्तर उलटून त्र्याहत्तर–चौऱ्याहत्तर करीत पंचाहत्तरीची वाटचाल सुरू आहे. वसंतरावांनी एक काळ मराठी रंगभूमी गाजविली; पण आज रसिक त्यांना ओळखतात, ते एक चित्रपटातील, विशेषतः ग्रामीण चित्रपटातील एक विनोदी नट म्हणून. आजही त्यांचे अनेक चित्रपटांचे शूटिंग सुरू आहे. गेली साठपासष्ट वर्षं नाटक–सिनेमात हा माणूस उभा आहे. शिवाय अनेक लोकनाट्यात, 'विनोदमूर्ति' नाही तर 'विनोदाचा बादशहा' म्हणून हे नाव झळकत आहेच. वसंतराव एक कलावंत म्हणून जितके थोर तसेच एक माणूस म्हणूनही मोठे गोड, रसीले आहेत. जुन्या नाटकांच्या गोष्टी निघाल्या की, अगदी रंगून जाऊन किती तरी मस्त आठवणी सांगतात.

'नाटक नि सिनेमात लहान असूनही (तशी आमची बालबुद्धीच म्हणा !) दिनकररावांच्या (दिनकर कामण्णा) जागी आमची स्थापना झाली. 'राजाराम संगीत मंडळी'ने 'प्रेमसंन्यास'ने सुरुवात केली. तिथे मामा (चिंतामणराव कोल्हटकर) होते. त्यांनी 'गोकुळ'साठी मला खास बोलावून घेतले होते. 'भावबंधन' खास दिनकररावांसाठी सुरू झाले. मग दिनकरराव गेले. त्यांच्या जागी 'कामण्णा' म्हणून उभा राहिलो. या नाटकांचे खूप खेळ झाले. माझी दोन्ही कामे पाहून खुद्द दिनकररावांनी पाठीवर हात थोपटून शाबासकी दिली. इतकेच काय पण त्यांनी 'गोकुळ' करावा म्हणून त्यांना खूप आग्रह झाला. त्यांचं नावच तसं खूप मोठं होतं. फार मोठे अॅक्टर ! पण म्हणाले, 'नाही. त्यालाच करू दे गोकुळ. फार छान काम जमवलंय त्यानं !'

वसंतरावांच्या कामण्णा नि गोकुळचे खूप कौतुक झाले. चित्रपटात तर ते दिनकर कामण्णाचे वारसदार म्हणूनच आले. भालजी पेंढारकरांचा 'सूनबाई' बोलपट खूप गाजला. त्यात कामण्णाची 'सुभान्या'ची भूमिका बेगालूम झाली होती. त्यानंतर या चित्रपटाच्या दुसऱ्या भागाची 'सासुरवास'ची भालजी जुळवाजुळव करीत होते. त्या वेळी दिनकर कामण्णा कालवश झाले होते. त्यांच्या तोडीचा माणूस डोळ्यांसमोर दिसत नव्हता. भालजी फिकिरीत होते. इथेही चिंतावणरावांनीच शिंद्यांचे नाव सुचविले. भालजींना पटले. वसंतराव आले. सुभान्याचा मेकप झाला. पहिल्या शॉटलाच भालजींनी 'ओके' म्हटले. दिनकररावांचा 'सूनबाई' गाजला. वसंतरावांचा 'सासुरवास' गाजला. वसंतराव तसे फार हळवे ! दिनकरराव, चिंतामणराव, भालजी यांचा उल्लेख करताना, 'त्या सगळ्यांची पुण्याई' या भावनेने त्यांना भरून येते.

## □ ग्रहण सुटल्यावर जा !

विनोदी नटांना प्रसंगविशेषी पदरची वाक्ये घुसडण्याची लहर येते. प्रसंगावधान राखून चांगले चार शब्द टाकले, तर तो प्रसंग अधिक खुलतो. नाही तर त्या प्रवेशाचा, नाटकाचा विचका होतो; पण हे भान वसंतराव छान राखतात. तो गुण, त्यांनी आपल्या गुरूंकडून–दिनकररावांकडूनच उचलला आहे.

अगदी अलीकडची गोष्ट. शरद तळवलकरांच्या एकसष्ठीसमारंभाला 'संशयकल्लोळ'चा प्रयोग होता. त्या दिवशी नेमके ग्रहण होते. फाल्गुनराव–कृत्तिकेचे भांडण होऊन ती माहेरी जायला निघते. भादव्या (वसंतराव) हा त्यांचा घरगडी. तो म्हणाला, 'बाईसाहेब, ग्रहणात नका हो जाऊ. ग्रहण सुटल्यावर जा !' कडकडून टाळ्या नि हशा !

वा. र. शोटि

---

मला या लेखासाठी खूप परिश्रम घ्यावे लागले. माझे दोन विद्यार्थी सोबत घेऊन मला जंगलातून कांदारी खोरे मार्गे रत्नागिरी जिल्ह्यातील खेडला उतरावे लागले. कारण एकटचालो हा प्रवास अवघड होता. तेथून चिपळूणमार्गे अलोरे, पोफळी, कोयनानगर, पाटण येथे यावे लागले. तसेच कोयना पुनर्वसनाची सर्व ऑफिसेस धुंडाळावी लागली. जंगल विभाग व डोंगरातून पायपीट असल्यामुळे सोबतीला दोघे घ्यावे लागले.

–प्रा. पुरुषोत्तम शेठ

'माणूस' दिवाळी अंकातील वासोटा या लेखाच्या लेखकाचा आणखी एक लेख.

**कोयना धरणग्रस्तांचे प्रश्न पुढे मांडणारा....**

**पुढील अंकी....**

# कोयना बांध फुटतो आहे !

---

MANOOS WEEKLY ( Licensed to post without prepayment of postage No-11 ) Regd. No. PNCW-28

**श्रीग्रामायन**

**बलसागर**

या पूर्वीच्या दोन पुस्तकांप्रमाणेच

**निर्माणपर्व**

या प्रस्तुत पुस्तकाचा विषय आहे विकसनशील, स्वावलंबी भारत.
एका खळबळजनक कालखंडातील हे चिंतन. चळवळीतील प्रत्यक्ष सहभागाची पार्श्वभूमी लाभलेले – शहादे चळवळ, जेपींचे बिहार आंदोलन, आणीबाणी, जनता पक्षप्रयोग, ग्राहकचळवळ, म्हैसाळप्रयोग . . .

★

श्रीग्रामायन या पुस्तकाबद्दल एका तरुण वाचकाने लिहिले होते – ' ग्रामीण भारताच्या वाटांचा शोध घेणाऱ्या कोणाही कार्यकर्त्याला ' श्रीग्रामायन ' मध्ये रेखाटलेली या ग्रामजीवनाची चित्रं आजच्या काळात आणि संदर्भात तितकीच ताजी वाटावीत, अशी आहेत. कदाचित त्यांना वाट पुसतच एखादा पुढली चित्रं चितारू शकेल. '

याच वाचकाने ' बलसागर ' बद्दल लिहिले होते – ' विविध विचारधारांना खुल्या मनाने लेखक येथे सामोरा जात आहे. त्यांचे सुस्पष्ट व तर्कसंगत विश्लेषण येथे आहे। आणि आजच्या संदर्भात भारतीय राष्ट्रवादाची नवी मांडणी करण्याचा प्रयत्नही आहे. '

या पुस्तकात, या ' निर्माणपर्वा ' तही हा प्रयत्न आहे.

एक नवी मांडणी आहे. समन्वयाचे पूर्वसूत्र आणखी पुढे नेले आहे . . .

★

**हा समन्वय कोणत्या शक्तींचा ? कोणते प्रवाह एकत्र यायला हवेत ?**

# ॥ निर्माणपर्व ॥

हे पुस्तक याचा शोध घेणारे आहे.

**लेखक : श्री. ग. माजगावकर**

**राजहंस प्रकाशन**

**मूल्य चाळीस रुपये**

पुस्तक नुकतेच प्रसिद्ध झाले आहे.